........

या
शिफारसपत्रांचा
अर्थ एकच.
रंगदेवता
केशवरावांना
वश होती.




# माणूस

शनिवार
२५ सप्टेंबर
१९७१
पन्नास पैसे

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | २५ सप्टेंबर १९७१ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | सतरा | पंचवीस रुपये | पंचेचाळीस रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## सप्रेम नमस्कार...

### अनिल बर्वे आणि लेखन स्वातंत्र्य

□ अनिल बर्वे नामक कुणा प्राण्याला मी स्वतः कधी भेटलो नाही. त्याची प्रत्यक्षात कधी ओळखही झाली नाही. (पोलिसांचा ससेमिरा मागे लागेल म्हणून हे मी स्पष्ट लिहीत आहे असा गैरसमज न व्हावा. झाल्यास नाईलाज आहे.)
त्याने आंध्रमधील नक्षलवाद्यांच्या अड्ड्यात जाऊन 'रोखलेल्या बंदुका...' ही थोडीशी भडक नावाची लेखमाला लिहिली यावरून त्याचे मनात उभे राहिलेले चित्र 'डॉन क्विझोट' टाईप झाले. नंतरच्या लिखाणात तो नक्षलवाद्यांच्या संप्रदायाशी मानसिक नाते जुळलेला, त्यांचा सहप्रवासी वाटण्याऐवजी तो एक स्वप्नाळू, आदर्शवादी अँग्री यंग मॅन असावा अशीच धारणा झाली. पण त्याचे सर्वच लिखाण वाचताना वॉल्ट डिस्नेच्या मिकी माऊसचे व्यंगपट पाहाताना जो आनंद प्रेक्षकांना मिळतो त्याचाच प्रत्यय, अनुभूती येत होती. मला तर त्याने लिहिलेल्या 'प्लासी ते डाक्का' व 'रोखलेल्या बंदुका' या दोन्ही लेखमाला वाचताना पानापानातून हा 'मिकी माऊस' दर्शन देऊन गेला होता.
एक गोष्ट मात्र निश्चित खरी की, नक्षलवाद्यांचे जे चित्र वृत्तपत्रांतून मनात उभे राहात होते, जो काळाकुट्ट अत्याचारी रंग त्यांना फासला जात होता तो पुसून काढण्याचे आवश्यक कार्य त्यांच्या लेखांनी प्रभावीपणे केले आहे.
मला वाटते, बर्वे–पायगुडे केसमध्ये लेखनस्वातंत्र्याचे अतिशय मूलभूत प्रश्न उभे राहिले आहेत. आता लेखनस्वातंत्र्य आणि भाषणस्वातंत्र्य यांची निश्चिती आपण

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

प्रथम केली पाहिजे. या संदर्भात डॉ. लोहियांचे पुढील विचार अधिक मननीय आहेत. ते म्हणतात, 'भाषणस्वातंत्र्यात चुकीचे भाषण करण्याचेही स्वातंत्र्य अभिप्रेत आहे. आज जी मते सरकारला किंवा समाजाला चुकीची वाटतील, ती भविष्यकाळात उचित ठरण्याची शक्यता असते. म्हणून आपणास उचित, परंतु समाजास मान्य नसलेल्या मताचा म्हणजेच सत्याचा कोणी प्रचार केला तर ते घातक ठरणार नाही.' [ अंतहीन यात्रा, पृष्ठ ८०. ]

याच पुस्तकात डॉक्टरांनी विरोधकांच्याबद्दलचे केलेले विवेचन आजच्या परिस्थितीत अधिक मूलग्राही वाटते. ते म्हणतात, 'विरोधकांच्या बाबतीत असहिष्णुता हा एक भयंकर रोग आहे. कदाचित विरोधकांचे मत मान्य करणे आपणाला कठीण असेल, परंतु ते ऐकून व समजून घेणे जरूर आहे. तथापी ही प्रवृत्ती आधुनिक जगातून पार नाहीशी होत आहेसे दिसते. स्वतःच्या मताग्रहामुळे आपण इतके विकृत बनलेले असतो की, त्या मतातील दोष दुसरा कोणी दाखवीत असला तर त्याचे आपण ऐकूनही घेत नाही. जणू फक्त स्वतःचेच म्हणणे स्वतःच ऐकायची आपणाला सवय लागलेली असते.' (पृष्ठ ३१).

अनिल बर्वे यांनी सातत्याने समाजातील आंदोलनांची एक बाजू मांडण्याचा प्रयत्न केला होता. फार तर त्यावर 'एकांगी' असा शिक्का मारण्याचा अधिकार वाचकांचा, जनतेचा राहील. राज्यसत्तेने लेखकांच्या लेखणींची धारदार टोके मोडीत काढण्याचा प्रयत्न करता कामा नये.

शेवटी महाराष्ट्रातील जनतेला, वाचकांना एकच प्रश्न विचारावासा वाटतो. ६० लाखांची चोरी करणाऱ्या नगरवालाला आपली बाजू मांडण्याचा न्याय्य हक्क उपभोगता येतो. मग अनिल–पायगुडेसारख्या, फार तर चुकलेल्या म्हणा, व्यक्तींना समाजापुढे त्यांची बाजू मांडण्याची संधी आपण उपलब्ध करून देणार नाही काय?

१० सप्टेंबर, १९७१ — रतनलाल भंडारी, दाभोळ

□ 'ऑपरेशन उमरी बँक' (माणूस दि. ११ सप्टेंबर) या लेखात छपाईत काही दोष राहून गेले ते येणेप्रमाणे : पान २२ वर श्रीनिवासराव बोधनकर असे नाव पडले आहे. ते श्रीनिवासराव बोरीकर, श्यामराव बोधनकर असे हवे. पान २८ वर ऑपरेशनची तारीख सोमवार दिनांक ३० जानेवारी १९४८ आहे. तेथे शुक्रवार हवा. खेरीज रांजणीकरऐवजी रांचणीकर, अनंतराव ऐवजी आनंदराव, गोधाजीराव मुखरे ऐवजी मुखदे अशा किरकोळ चुका झाल्या आहेत.

पान पस्तीसवर 'कटदार रक्कम' व 'हाजी रक्कम' असे छापले आहे. कल्दार रक्कम व हाली रक्कम असे हवे. कल्दार म्हणजे भारतीय चलन व हाली म्हणजे हैद्राबादी चलन.

माझ्या मानधनाची रक्कम मला पाठविण्याची आवश्यकता नाही. ती सातपुडा सर्वोदय मंडळ व बर्वे-पायगुडे निधीत माझ्यातर्फे निम्मी निम्मी जमा करावी.

११ सप्टेंबर, १९७१ — सुधाकर डोईफोडे, नांदेड

# शापाकली

रवींद्र पिंगे

## भीष्मपर्व

नटवर्य दाते हा एक अस्सल कोकणी वाण होता. कोकणी नग हा नेहेमीच शंभर नंबरी असतो. त्याचे आणखी काही विशेष आहेत. कोकणी नाणं नेहेमीच उत्कृष्ट आवाजात वाजतं, केशवरावांचा आवाज अगदी थेट तीरापलीकडचं आमंत्रण येईपर्यन्त तसाच बेंबीच्या देठापासून निघत असे. कोकणातच तयार होणाऱ्या सुंभाच्या पीळासारखा कोकणी माणसांना एक पीळ असतो, जो विसविशीत होत नाही. केवळ दात्यांनाच नव्हे तर त्यांच्या सगळ्याच घराण्यात एक पीळ होता. त्यांचा एक भाऊ कोकणात होता. जेवीत असताना भांड्याला भांडं लागलं; तेवढ्यावरून तो जो भरल्या ताटावरून उठून चालता झाला तो पुन्हा म्हणून कसा तो कुणाला दिसलाच नाही. कुठे गेला असेल तो ? काय क्लेश भोगले असतील त्याने ? जीवतीने कुठला अतर्क्य ललाटलेख त्याच्या भाळी कोरला होता ? उंबरठ्यावर त्याचं पाऊल का अडखळलं नाही ? केशवरावांना कोडं कधीच उलगडलं नाही. तेव्हापासून ते सर्वांना सांगत, ' रे, पानावर बसलेल्या कुणालाही टाकून बोलू नका; हिडीसफिडीस करू नका. ' तडकाफडकी नाहीसं होणं, मायापाश झटक्यात तोडून टाकणं हे जसं पीळाचं लक्षण आहे, तसंच हा असा हृदय हळुवार करून कातर स्वरात उपदेश करणं हाही कोकणी विशेषच आहे. केशवरावांच्या दुसऱ्या भावाच्या पीळाची वातही अशीच विलक्षण होती. त्याचं नाव रामकृष्ण. तो आजन्म ब्रह्मचारी राहिला. मुंबईहून दक्षिण रत्नागिरीतल्या आडिवऱ्याला घाटचा तुडवीत तरातरा चालत गेला. कधी गाडीत म्हणून कसा तो बसलाच नाही. वाहान वर्ज्य करून तो थांबला नाही. त्याने विजेच्या दिव्याचा प्रकाशही अंगावर घ्यायचं नाकारलं. जन्मभर तो आडिवऱ्याला गोड्या तेलाच्या समईच्या संथ प्रकाशात वावरला. दुनिया ढीग पुढे गेली असेल, केशवरावांच्या ह्या भावाने लामणदिव्याच्या प्रकाशात महांकाळी मंदिरात किर्तनं केली. दुसरं काही एक केलं नाही. हा पीळ नव्हे तर

काय ? खुद्द केशवरावांचा पीळ तरी काय कमी होता ? ते दरवर्षी पाच नोव्हेंबर-च्या रंगभूमी दिनाला सांगलीला हमखास हजेरी लावीत असत. सांगली ही मराठी रंगभूमीची गंगोत्री. तिथून प्रकटलेल्या गंगेचं पाणी ते जन्मभर प्यायले होते. म्हणून सांगलीच्या फ़ेरीचं व्रत. सांगलीला ते नाटयपंढरीच म्हणत. अशा ह्या नाटय-पंढरीत एके वर्षी त्यांनी काणेकरांचा ' घर ' हा खेळ घातला. त्याचवेळी त्यांना दम्याचा जबरदस्त अॅटॅक आला. सर्वांनी सांगितलं, ' नाना, तुम्ही आराम करा. आपण खेळ रद्द करूया. ' केशवराव हे ऐकणार म्हणता ? नाव सोडा. त्यांनी डॉक्टर बोलावला. दम्यावरचं इंजेक्शन हातात घेऊन डॉक्टर नाटयगृहाच्या विंगेत बसला. प्रत्येक एन्ट्रीला केशवराव डॉक्टरकडून इंजेक्शन टोचून घेत नि आपले संवाद बोलत. संवाद संपले की पुन्हा विंगेत जाऊन खुर्चीवर विश्रांती घेत. परत काम आले की सुई टोचून घेऊन रंगमंचावर आवाज लावायला हजर ! असं करीत करीत त्यांनी प्रयोग तडीस नेला. पिळाविना हे घडेल ?

कोकणी माणसाचं दुसरं ठळक वैशिष्टय म्हणजे त्याचा अर्धा जीव त्याच्या कोकणातल्या मखमली गावात गुंतलेला असतो. दाते अडिवऱ्याचे. म्हणजे ऐन कोकणी परिसरातले. ह्या अडिवऱ्याच्या महांकाळीदेवीसमोर नवरात्रात दशावता-राचे खेळे नाचतात. केशवरावांनी वयाच्या सातव्या वर्षी रंगमंचावर पहिलं पाऊल टाकलं ते ' त्रिपुरासुरवध ' ह्या गावकीच्या दशावतारी खेळात गणपतीचे सोंग काढून. गणपतीचा रंगीत मुखवटा लावून ते गावकऱ्यांसमोर प्रथम नाचले. नंतर जन्मभर ते प्रेक्षकांच्यासमोरच वावरले. ज्या अडिवऱ्यात त्यांनी रंगभूमीच्या सेवेचा श्रीकार टाकला त्या अडिवऱ्याबद्दल त्यांच्या मनात सदाची भक्ती वसत होती. दाते पुण्याला प्रभात कंपनीत असतानाची गोष्ट. ते अप्पाबळवंत चौकात राहात. तिथे त्यांच्या कानावर अशुभ बातमी आली की महांकाळीसमोर गावकीचे दशावतारी खेळ घालणाऱ्या लिंगायत पुजाऱ्यांची घरं आगीत जळली. दाते हे कळल्याबरोबर तसेच मुंबईला जगन्नाथाच्या चाळीतल्या अडिवऱ्याच्या रामचंद्रपंत पराजप्यांकडे गेले नि म्हणले, ' आम्ही अडिवरेकर, तुम्ही अडिवरेकर, आपल्या गावकऱ्यांची घरं जळली हे वाईट झालं. आता गुरवांना आपणच परत घरं बांधून देऊया. यापुढे गुरवांच्या घरांवर झापं दिसता कामा नयेत. सर्वांची घरं कौलारू झाली पाहिजेत. आपण फंड काढूया. मदतीसाठी सिनेमा लावूया. मिळतील त्या पैशातून रत्ना-गिरीच्या भागोजी कीरांना स्वस्तयात मंगलोरी कौलं पाठवायला सांगूया. ' परांज-प्यांना प्रस्ताव मंजूर झाला. ' अग्निप्रलय निवारण फंड ' दात्यांच्या प्रेरणेने उभा राहिला. एक एक रुपयाची तिकिटं विकली गेली. त्या पैशातून भागोजी कीरांकडची मंगलोरी कौलं अडिवऱ्याला रवाना झाली. लिंगायत पुजाऱ्यांची नवी वस्ती मंग-लोरी कौलांचीच झाली. दात्यांचं एक स्वप्न पुरं झालं. पोटासाठी चारी दिशांना पांगलेल्या अडिवरेकरांनी वर्षातून एकदा कधीतरी गावात एकत्र जमावं आणि

जमल्यास गावकीचा खेळ घालावा, अशी त्यांची दुसरी इच्छा होती. पण शहरवासीयांना कुठे सापडते एवढी सवड? ते भाबडं स्वप्न जागच्या जागीच गाडुटलं. गांधीवधानंतरच्या जाळपोळीनंतर एकदा ते आपली वास्तू पाहायला अडिवऱ्याला गेले होते. नंतरही नातवाला घेऊन कुलदेवतेला नमस्कार करायला बारा वर्षांपूर्वी गेले होते. अलीकडे म्हणे त्यांच्या मनात फार यायचं की आपल्याला जरा आर्थिक स्वास्थ्य लाभलं आहे तेव्हा आपण थोडा खर्च सोसून व गावकऱ्यांनाही थोडासा खर्च उचलायला लावून, कृतज्ञतेने गावाकडेच्या देवळाची दुरुस्ती करून घ्यावी. तोही बेत अधांतरीच लोंबकळला. आठवणीतलं महांकाळीचं अडिवरं आठवीत दाते दादरच्या विजयनगरमध्ये दम्याने दुभंगत राहिले.

–दाते सर्व सोडून रंगभूमीकडे कसे आकृष्ट झाले तोही एक किस्साच आहे.

हे अडिवऱ्याचे भटजी. म्हणजे दैवपरत्वे ह्यांच्यापुढे फक्त दोन व्यवसाय होते. एक, गावाचं जोशपण करणं, पंचांग सांगणं, जान्हवी मंत्रून देणं, आणि प्रसंगपरत्वे श्राद्धाला दर्भाच्या काड्या घेऊन धावणं किंवा सत्यनारायणाची पोथी वाचणं! दुसरा मार्ग म्हणजे शाळाखात्यात किंवा पोष्टात चिकटणं. पाऊणशे वर्षांपूर्वीच्या ब्रिटिशांच्या त्या रामराज्यात कोकणस्थ ब्राह्मणाने पोष्टखात्यात स्टँपासारखं घट्ट चिकटलंच पाहिजे असा महाराणी व्हिक्टोरियांचा गुप्त फतवाच होता! पण अडिवऱ्याचे हे पाणी तऱ्हेवाईक निघालं. भिक्षुकी, शिक्षकी किंवा कारकुनकी ह्यांपैकी एकाही कुंडातलं तीर्थ न घेता दाते एका डॉक्टरकडे दवाखान्यात औषधं कुटायला पुढ्यात खलबत्ता घेऊन बसू लागले. ही औषधं कुटताना त्यांचा असंख्य व्याधिग्रस्त रोग्यांशी संबंध आला आणि त्यांना एकसारखं वाटू लागलं, की औषध-पाण्याने हे लोक कदाचित बरे होतीलही, पण ह्यांची अरमाळलेली मनं कशी काय तजेलीत येणार? जीवनाचा आनंद हे रोगी लोक कसा काय भोगणार? त्यांना अडिवऱ्याचं गावकीचं नाटक आठवलं, पाठोपाठ त्यांना वाटलं की आपण रंगभूमीवर एक सोंग काढावं आणि एकाच वेळी हजारो माणसांना खिळवून ठेवील अशा नाटकात काम करावं; संवाद म्हणावेत; गाणी गावीत म्हणजे माणसं आनंदित होतील. हा विचार त्यांच्या मनात डोकावला आणि मागोमाग ते स्वतः कम्पौंडरची नोकरी लाथाडून महाराष्ट्र नाटक मंडळीत हरकामे नट म्हणून चिकटले. ही गोष्ट सात सालची आहे. बालगंधर्वांनी पाच साली पहिलं सोंग काढलं. म्हणजे दाते गंधर्वांना रंगभूमीवर दोन वर्षांनी धाकटे होते. मात्र बालगंधर्वांची नट म्हणून अवतारसमाप्ती पंचावन्न साली झाली. बालगंधर्व बरोबर अर्धशतक मराठी रंगभूमीवर वावरले. त्यातली पहिली पंचवीस वर्षं तर त्यांनी अक्षरशः भोगली. शेवटच्या पाच-दहा वर्षांत बालगंधर्वांचा जो अवतार आपण पाहिला ते त्यांचं भूत होतं. रूप नव्हतं. दाते बालगंधर्वांच्या नंतर दहा वर्षं तोंडाला रंग लावीत होते. जरेने दात्यांचाही कबजा घेतला होताच. पण त्यांचं

भूत झालेलं कुणी पाहिलं नाही. पाऊणशे वयमान झालेलं असतानाही रंगभूमीवर टाळी घ्यावी तर केशवरावांनीच. मुद्राभिनय आणि शब्दांची फेक ह्यांचं त्यांचं सामर्थ्यही अमोघ होतं. फक्त एकदाच, आणि तेही निव्वळ नाईलाजाने त्यांना आपला जराजर्जर देह चमत्कारीक अवस्थेत प्रेक्षकांसमोर न्यावा लागला. त्रेसष्ट साली दात्यांचा अमृतमहोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा झाला. दिल्लीला त्यानिमित्त काकांच्या 'सवाई माधवरावांचा मृत्यू'चा प्रयोग आयोजित झालेला होता. दात्यांच्या डोळ्यांवर मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेली होती. ती इतकी ताजी होती की त्यावर धड आठवडाही उलटलेला नव्हता. आणि दात्यांच्या नावाच्या जाहिरातींचे गरूडपक्षी तर जिकडे तिकडे भिरभिरत होते. दात्यांनी खेळात उभं राहायचा निर्णय घेतला. डोळ्यांना चक्क काळा गॉगल लावून केशवशास्त्री त्या रात्री दिल्लीच्या रंगमंचावर प्रकट झाला! मूळ नाट्याशी डोळ्यावरचा काळा गॉगल फारच विसंगत होता. धैर्यधराने पंचा लावून एन्ट्री करण्यासारखं किंवा शेवटच्या अंकात सिंधूने भरजरीची पैठणी नेसून सुधाकराच्या हातचा मार खाण्यासाठी प्रकट होण्यापैकीच तो प्रकार होता. पण तशा त्या विकलांग अवस्थेतही केवळ आवाजाच्या करामतीवर केशवरावांनी खेळ सोळा आणे यशस्वी करून दाखवला. अहो, कितीही म्हटलं तरी आपल्या आवडत्या कलावंतावर मराठी माणूस जीव ओवाळून प्रेम करतो. ज्या कृतज्ञ प्रेक्षकांनी नारायणरावांची रुक्मिणीच्या शालूच्याआडून दिसणारी खाकी हाफपॅन्ट चालवून घेतली, त्याच कृतार्थ रसिकांनी पाऊणशे वर्षांच्या केशवरावांचा काळा गॉगल ऐतिहासिक खेळात कौतुकाने गोड करून घेतला. अर्थात, हा एकापरीने जसा कलावंताच्या सामर्थ्याचा भाग आहे, तसाच दुसऱ्या बाजूने तो काळपुरुषाच्या थट्टेखोरपणाचाही आहे. ज्या केशवरावांनी दिल्लीच्या रंगमंचावर 'भाऊबंदकी'चा खेळ करून मराठी रंगभूमीला अखिल भारतात पहिला क्रमांक आपल्या समर्थ कर्तबगारीच्या जोरावर मिळवून दिला, त्याच दिल्लीतल्या रंगमंचावर काळा गॉगल लावून आलेल्या केशवरावांच्या कानात काळपुरुष कुजबुजला, 'महाराज, म्हटलं आवरा. मी कब्जेदार आलो आहे!' अर्थात दात्यांनाही माहीत होतं, 'Age conquers all.'

दात्यांच्या अभिनयाची सगळी जादू त्यांच्या शुद्ध, जोरकस आणि समतोल शब्दोच्चारात आणि प्रवाही मुद्राभिनयात होती. तो त्या काळाच्याच शिकवणीचा महिमा होता असं सांगण्यात मजा नाही. दात्यांच्यापूर्वी आणि नंतरही अनेक पांडूगुंडू रंगभूमीवर आले नि आल्या-आल्याच गेले. दाते एकटेच अंगुळभर उंच राहिले. एकदा ते मूकचित्रपटाला गेले होते. तो चित्रपट पाहाताना त्यांच्या लक्षात आलं, की नटाने एक अक्षरही न उच्चारता सर्व काही निव्वळ मुद्राभिनयाच्या जोरावर रसिकांच्या हृदयांपर्यंत भिडवलं होतं. मूकचित्रपट पाहून ते बाहेर आले ती हीच दृढ श्रद्धा घेऊन की उत्तम नटाला नाटकातल्या पल्लेदार संवादांची

सुतराम आवश्यकता नाही. त्याची मुद्रा बोलली पाहीजे; त्याच्या डोळ्यांनी प्रेक्षकांच्या काळजाला कुरवाळलं पाहिजे. ही श्रद्धा दृढ व्हायला आणखी एक कारण झालं. दाते लहान वयात असताना गिरगावातल्या चौपाटीवर एकदा मॉर्निंग वॉकसाठी गेले होते. वीर सावरकरही नेमके त्याचवेळी तिथे वाळूवर प्रभात–फेरफटका करीत होते. थोडं बोलणं चालणं झालं. सावरकरांनी विचारलं, 'काय करतोस? काय वाचतोस? काय बोलतोस? हे वाचलं आहेस? ते वाचलं आहेस? नाही! मग केव्हा वाचणार? जागं केव्हा होणार?' दाते विरघळून गेले. सावरकरांना आंग्रेवाडीत भेटले. तिथपासून सावरकरांविषयी दात्यांच्या मनात जो प्रेमाचा पान्हा फुटला तो अखेरपर्यंत कायम होता. वीरांकडे त्यांचं येणंजाणं होतं- सावरकरवादी नसले तरी ते प्रखर सावरकरभक्त होते. सावरकरांच्या पडत्या काळातही दात्यांची सावरकरभक्ती अम्लान होती आणि चिन्यांनी पाठीत गुलाबी रट्टा हाणल्यापासून सावरकरभक्तीचा पोकळ उमाळा संधी मिळताच उगाळून दाखवण्याची जी नवदेशभक्तप्रणीत फॅशन आली तेव्हा त्या संधीसाधूपणापासून दोन पावलं दूर राहून दात्यांनी आपल्या सावरकरप्रेमाचं अवमूल्यन करणं सूज्ञपणे टाळलं. सावरकरांच्या नजरेतल्या पाण्यावर आणि पाण्यासारख्या त्यांच्या प्रवाही वाणीवर दाते लट्टू होते. दात्यांनी मुद्राभिनयाचा आणि वाचाशुद्धीचा जो आग्रह आजन्म धरला, त्याचं मूळ हे असं सावरकरप्रेमात सापडतं. इथे चिंतामणराव कोल्हटकरांची आणि केशवराव दात्यांची कुंडली पटते!

हे आग्रह घेऊन दात्यांनी स्वतःच्या भूमिका बेतल्या आणि इतरांच्या बसवून दिल्या. दात्यांनी ह्यातीत जवळजवळ पन्नास भूमिका केल्या. त्यातल्या बहुतेक काकांच्या नाटकातल्याच होत्या. खाडीलकर तर त्यांचे देवच होते. दाते Drama आणि Play ह्यात सूक्ष्म फरक करीत असत. नाटक आणि खेळ असं आपण त्यांचं ढोबळ आणि अपूर्ण भाषांतर करूया. काकांची, गडकऱ्यांची, देवलांची, वर्तकांची ती सारी नाटकं. शिरपूरच्या शं. प. जोशींची, औंधकरांची, ताम्हणकरांची, साठ्यांची, मुक्ताबाईंची, ते सगळे खेळ. नाटकांना उच्च वाङ्मयीन मूल्य असतं, भावनांचा खेळ त्यात केलेला असतो असं ते म्हणायचे. खेळ म्हणजे मनोरंजनप्रधान कथावस्तूवर जिच्यात भर असतो ती. उदा० ना. धों. ताम्हणकरांचे 'उसना नवरा' किंवा शं. प. जोशींचं 'विचित्र लीला'. मात्र काका खाडीलकरांपासून अण्णा कारखानिसांपर्यंत सर्व यती–महायतींची वाङ्मयीन मूल्यांकित नाटकं करून कंपनीच्या डोक्यावर कर्जाचे डोलारे साचल्यावर ते उतरवायला अफाट लोकप्रियता मिळवून देणाऱ्या आणि वाङ्मयीन मूल्यांकडे डोळेझाक करून रंगभूमीवरच्या रंगतीकडे अधिक लक्ष देणाऱ्या विनोदप्रचूर खेळांकडेच त्यांना वळावं लागलं हा, आज बेफाम खेळ करून दाखविणाऱ्या मधुसूदन कालेलकर, बाळ कोल्हटकर,

पृष्ठ ६६ वर

# अंबरसिंग

अनिल अवचट

युवक क्रांती दलाने त्यांची सभा ठरवली.

कोण बुवा हे अंबरसिंग ?

ते रे ते, माणूसच्या १५ ऑगस्टच्या अंकात आलेले, ते...

म्हणजे तो आदिवासी महाराज ?

हां, हां, तोच.

सकाळी माजगावकरांना फोन...

अहो, अजून ते पुण्यात आलेले नाहीत. सर्वोदय ऑफिसवर जाऊन बघतो आता.

पुन्हा फोन...

अहो, ते आले असावेत. कारण त्यांचे मला माहीत असलेले कपडे तिथं वाळत घातले आहेत.

पुन्हा फोन..

रहस्य गूढ होत चालले...ते कपडे त्यांचे नाहीत. त्यांना कुणीतरी मुंबईत पाहिलं. ते तर इकडून येणार होते...वाट बघू, नाहीतर कुणाला तरी अंबरसिंग बनवावं लागेल...

शेवटी एकदाचे अंबरसिंग आले.

साधनेचा जिना चढताना माजगावकर दिसले. त्यांच्या मागोमाग मिशावाला, खादीच्या पँट, मॅनिल्यातील एक अगदी साधा माणूस होता. मी तर्काने ताडले, तेच अंबरसिंग.

आमच्यातल्या एका क्रांतिकारक तरुणाने विचारले,

काय रे, कुठं आहेत तुझे अंबरसिंग ?

गेलेत की आत्ताच आत, माजगावकरांबरोबर.

ते होय ? मला वाटलं, आदिवासी नेता म्हणजे त्या वेशात येईल, डोक्याला पिसं, मागे तिरकमठा...हा तर आपल्यासारखाच आहे...

सभेला तरुणांबरोबर वजनदार श्रोत्यांनीही गर्दी केली होती. आपापले चिंतन काही वेळ बाजूला ठेवून या डोंगरातल्या माणसाला बघायला, ऐकायला, सगळे आले होते. दि. के. बेडेकर, आचार्य भागवत, शिरूभाऊ लिमये, प्राचार्य भा. शं. भणगे, विनायकराव कुलकर्णी, वसंत पळशीकर, रा. म. बापट, शंकरराव खरात... असे कितीतरी.

अंबरसिंग बोलायला उठतात. सुरुवात विलंबित. खर्जात सूर लावतात.

पाटीलवाडी, म्हसावद प्रकरण एकदम सांगून टाकण्याऐवजी मी कसा नाशिकच्या सर्वोदय संमेलनाला निघालो होतो, एस्. टी. त कसा बसलो, बरोबर कोण होते, मला कुठं कळलं, अशा थाटाने राग खुलवायला सुरुवात केली.

बुवा मोठे दमाचे निघाले.

म्हसावद प्रकरणात एक भिल्ल गुजरांच्या गोळीने मरण पावला. तेव्हा सगळी आदिवासी मंडळी जमली होती. पोलिसांनी सांगूनही हलायला तयार नव्हती. आमच्यातला एक त्यांनी मारला, आता त्यांच्यातला एक मारल्याशिवाय आम्ही कसं परत जायचं हे तिथं असलेल्या पोलिसांनाच विचारीत होती.

अशा परिस्थितीत अंबरसिंगनं तिथं जायचं म्हणजे स्वत:स अडकवून घेण्यासारखंच होते. त्यांच्यावर कुठलेही आरोप ठेवून अडकवता आलं असत. पण ते तिथं गेले; कारण त्यांचं आयुष्य त्यांच्या लोकांशी बांधलं गेलेलं होतं.

त्यांनी पोलिसांना झाला प्रकार विचारला. आदिवासींपैकी कोण लोक हवे आहेत त्यांची यादी मागितली. ती यादी घेऊन ते आदिवासींच्या जमावात गेले. पोलिसांची तिथं जायची छाती नव्हती. पण अंबरसिंगांनी यादीप्रमाणे माणसं काढून पोलिसांच्या हवाली केली आणि सांगितले, आता गुजरांची यादी काढून त्यांना अटक करा.

पोलीस म्हणाले, आम्ही गुजरांना अटक करणार नाही.

हा खासा न्याय आहे. ज्यांनी गोळ्या खाल्ल्या, ज्यांच्यातला एक मेला, त्यांना अटक. आणि जो गुन्हेगार आहे तो मोकळा...

अशा विदारक, पक्षपाती वर्तनाच्या निर्घृण अत्याचारांच्या कित्येक हकिगती एका विशिष्ट तऱ्हेच्या अलिप्ततेने अंबरसिंग सांगत राहतात. कोणावरही ते भडकत नाहीत. पोलीसही चांगले आहेत. विश्राम हरी पाटील आमचेच आहेत. गुजरांनाही आमचे प्रेम हवे आहे, आम्हालाही त्यांचे प्रेम हवे आहे...अशीच भाषा. पण बोलायचे काही सोडतही नव्हते.

अंबरसिंगांनी सांगितले, मी आदिवासींना सांगितले, आपसातल्या भांडणांसाठी कोर्टात जायचे नाही. आपण इथं बसून न्याय करू. तुम्ही तुमच्या बाजू इथं सांगा.

आणि मॅजिस्ट्रेट तरी दुसरं काय करतो. यांना विचारतो, खरं काय झालं. त्यांना विचारतो, खरं काय झालं. आणि त्यातनच निवाडा देतो. तो पदरची नवी माहिती तर काही आणत नाही ना ? मग जे तिथं सांगता ते इथं सांगा...यावर सभेत बराच हशा.

नंतर प्रश्नोत्तरे.

का हो, विश्राम हरि पाटलांचं येवढं गुणगान करता. भिल्लांना तर धान्य स्वत: दिले आणि मग उलटा खटला का भरला ?

ते मी कसं सांगू ? पण येवढं सांगतो. की, खटला त्यांनी भरला नाही, त्यांच्या मुलानं भरला. आता मुलाचं आणि त्यांचं कसं आहे हे आपण कसं सांगणार ?

पुढचा प्रश्न, खास शहरी क्रांतीकारक.

का हो, गुजरांविरुद्ध वर्गयुद्ध का पुकारीत नाही ? दुसरा एक प्रश्न, जमिनीचे वाटपाची मागणी का करीत नाही ?

अहो, जमिनी द्या, आमचे लोक कसतील. काम द्या, काम करतील, तुम्ही भाकरी दिली तरी आम्हाला काय नकोय ?

अहो, आमचं पोट भागल्याशी कारण !

पुढचा एक प्रश्न. अगदी खास, नेहमीचा बालीश.

तुमच्यात हजारो अंबरसिंग का निर्माण होत नाहीत ?

ते मी कसं सांगणार ? पण अंबरसिंग काय आपसुक तयार होतात काय ? मी खस्ता खाऊन खाऊन तयार झालो. ते सोसण्याची तयारी इतर लोकांची झाली तर अंबरसिंग तयार होतील.

प्रश्न संपेनात. शेवटी सभा संपवावी लागली. तरी नंतर तासभर त्यांना मुलांचा गराडा पडलाच होता.

लोकहो, सुरुवातीस म्हटल्याप्रमाणं ही काही बुवांची मैफल समजू नका. हा अंबरसिंग सातपुड्यातून पुण्या-मुंबईच्या शहरटांची करमणूक करायला आला नव्हता. आज त्याची माणसं रोज मार खातात. त्यांच्या ओल्या बाळंतीणीही बलात्कारातून सुटत नाहीत. प्रश्न आहे की आपण केवळ ' दाद ' देणारे बघे आहोत, की पाशवी अत्याचारांची चीड असणारी संवेदनाशील माणसे आहोत.

अंबरसिंगांची आणि त्यांच्या मित्रांची आपल्याकडून अपेक्षा आहे की आपण त्यांच्या मदतीला जावं.

गुजरांपाशी पैसा आहे, ते बडा वकील देऊ शकतात. यांना वकील नाही. त्यासाठी दहा हजार रुपये खर्च आहे. त्याची काही व्यवस्था करा.

तिकडे येऊन प्रत्यक्ष परिस्थिती पाहा, इत्यादि.

◻ ◻ ◻

स्टॅलिनचा दहशतवाद क्रुशोव्ह यांनी घालवला
ही त्यांची भरीव कामगिरी.
पण त्या पुढचा टप्पा गाठण्यात ते यशस्वी झाले का ?

# निकिता क्रुशोव्ह

**वा. दा. रानडे**

स्टालिननंतर अकरा वर्षे रशियावर सत्ता गाजविणारे निकिता क्रुशोव्ह गेल्या ११ सप्टेंबरला निधन पावले. पण पदच्युत नेत्याची रशियात काय किंमत असते हे त्यांच्या निधनाची व अंत्यविधीची ज्या पद्धतीने दखल घेण्यात आली त्यावरून चांगल्याप्रकारे दिसून आले. क्रुशोव्ह यांच्या निधनाचा मॉस्को रेडिओवर एका शब्दाने उल्लेख करण्यात आला नाही. क्रुशोव्ह यांना क्रेमलिनमधल्याच खास हॉस्पिटलमध्ये ठेवले होते. त्यांच्या निधनाची बातमी लोकांमध्ये पसरली. मंत्रिमंडळाकडे चौकशीचे फोन येऊ लागले, पण फोनवर उत्तर दिले जाई, 'आम्हाला काही माहिती नाही.' निधन शनिवारी झाले पण त्याची अधिकृत दखल 'प्रावदा' या कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रात सोमवारी पहिल्या पानावर खालच्या कोपऱ्यात फोटोशिवाय टाकलेल्या चार ओळींच्या निवेदनाने घेण्यात आली. क्रुशोव्ह यांच्या निधनाबद्दल मंत्रिमंडळाला व कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीला खेद होतो एवढेच त्यात म्हटले होते. निधनाची वेगळी बातमी दिली नव्हती. अंत्यविधीची वेळ दिलेली नव्हती.

लेनिन व स्टालिन यांचा अंत्यविधी लाल चौकात झाला होता. त्यांच्या अस्थी क्रेमलिन भिंतीत पुरल्या होत्या, पण क्रुशोव्ह यांना हे स्थान मिळाले नाही. दुय्यम दर्जाच्या नेत्यांसाठी असलेल्या दफनभूमीत त्यांचा अंत्यविधी अगदी साध्या पद्धतीने झाला. जवळचे नातलग, मित्र, काही पत्रकार असे दोनशे लोक उपस्थित होते. रशियाच्या प्रमुख नेत्यांपैकी कोणीही उपस्थित नव्हते. त्यांनी फक्त एक पुष्पचक्र पाठवून दिले होते. दफनभूमीवरील क्रुशोव्ह यांच्या शिळेवर त्यांचे नाव व जन्म-मृत्यूच्या तारखा एवढीच नोंद राहाणार आहे. हा नेता रशियाचा पंतप्रधान होता, कम्युनिस्ट पक्षाचा पहिला चिटणीस होता, याचा काहीही उल्लेख असणार नाही.

आपल्याला नको असलेला इतिहास पुसून टाकण्याची स्टालिनच्या काळापासूनची

प्रथा रशियात अजूनही चालू आहे, असाच याचा अर्थ आहे. पण इतिहास असा राज्यकर्त्यांच्या लहरीप्रमाणे पुसून किंवा दडपून टाकता येत नाही. स्टालिनच्या काळातील अमानुष दडपशाहीचे व दहशतीचे अंगावर शहारे आणणारे प्रकार क्रुशोव्ह यांनी विसाव्या काँग्रेसपुढील भाषणात चव्हाट्यावर आणले. अन्याय झालेल्या अनेकांचे पुनर्वसन केले. क्रुशोव्ह यांनाही इतिहासात त्यांचे योग्य स्थान मिळवून देणारा नेता पुढे निर्माण होईलही.

क्रुशोव्ह एका गरीब शेतकऱ्याचा मुलगा. (जन्म १७ एप्रिल, १८९४). कुर्स्क प्रांतातील कालिनोव्हका हे त्यांचे जन्मगाव. प्राथमिक शाळेत दोन वर्षे शिकल्यावर या मुलाने शाळा सोडून दिली व तो गुराखी म्हणून काम करू लागला. सहा वर्षांनी त्याचे कुटुंब डोन्साब कोळसाखाणी भागातील युझोव्हका (आता डोनेस्क)येथे आले. क्रुशोव्ह तेथे कारखान्यातून व कोळसाखाणीतून निरनिराळी कामे करू लागला. तो एक कुशल फिटर बनला. पहिले महायुद्ध सुरू झाले. क्रुशोव्ह वास्तविक सैन्यात सक्तीने भरती व्हावयाचा, पण कारखान्यात तो ज्या स्वरुपाचे काम करीत होता ते आवश्यक स्वरुपाचे मानले गेल्याने त्याला लष्करी नोकरीतून सूट मिळाली.

## पक्षप्रवेश

क्रुशोव्ह १९१८ साली कम्युनिस्ट पक्षाचे सभासद झाले, पण त्यांच्या कम्युनिस्ट पक्षातील कार्याला खरी सुरुवात १९२५ साली झाली. त्या वर्षी त्यांना युझोव्हका-जवळच पेट्रोव्हस्की–मरीनस्की जिल्हा पक्षसमितीचे चिटणीस नेमण्यात आले. याच वर्षी डिसेंबरात मॉस्को येथे भरलेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या चौदाव्या काँग्रेसला क्रुशोव्ह प्रतिनिधी म्हणून प्रथमच उपस्थित होते. मॉस्कोला त्यांची ही पहिलीच भेट. क्रेमलिनला कोणत्या ट्रामने जावयाचे हे त्यांना माहीत नव्हते. ट्राम चुकली तेव्हा दुसऱ्या दिवशी क्रेमलिनपर्यंत पायी जायचे त्यांनी ठरविले. अधिवेशनाच्या हॉलमध्ये लौकर जाऊन चांगली जागा पटकावण्यासाठी क्रुशोव्ह लौकर उठून न्याहारीसुद्धा न घेता निघाले. 'क्रुशोव्ह रिमेंबर्स' पुस्तकात ही आठवण दिली आहे.

या काँग्रेसमध्ये स्टालिन यांनी सत्तास्पर्धेत कामेनेव्ह झिनोव्हिक या आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव केला. क्रुशोव्ह यांनी स्टालिन यांना जोरदार पाठिंबा दिला व तेव्हापासून स्टालिनच्या निधनापर्यंत ते नेहमी स्टालिनच्या बाजूस होते.

पक्षात एकेक वरच्या व जबाबदारीच्या जागांवर क्रुश्चोव्ह चढत गेले. कीव्ह जिल्हा कमिटीवर १९२७ साली त्यांची बदली झाली. दोन वर्षांनी मॉस्कोच्या इंडस्ट्रियल ॲकॅडमीमध्ये शिक्षण घेत असता तेथील पक्षसमितीचे चिटणीस म्हणून त्यांची निवड झाली व कागानोव्हिकमार्फत पक्षाच्या मध्यवर्ती समितीशी त्यांना सरळ संपर्क साधता येऊ लागला. पक्षाच्या १६ व्या काँग्रेसमध्ये १९३४ साली मध्यवर्ती समितीवर त्यांची निवड झाली. एक वर्षाने त्यांना मॉस्कोच्या शहर व विभाग समित्यांचे पहिले चिटणीस नेमण्यात आले. त्यानंतर १९३८ साली पॉलिट-

ब्यूरोचे कँडिडेट सभासद व युक्रेनच्या कम्युनिस्ट पक्षाचे पहिले चिटणीस नेमण्यात आले. एक वर्षाचे ते पॉलिटब्यूरोचे पूर्ण सभासद झाले.

दुसऱ्या महायुद्धात हिटलरच्या नाझी फौजांनी जून १९४१ मध्ये रशियावर स्वारी केल्यावर युक्रेन फार थोडया दिवसात पडले. तेव्हा क्रुशोव्हना लाल सेनेत जनरलच्या हुद्याचे पोलिटिकल कोमिसार करण्यात आले. नाझी फौजांच्या माघारीनंतर युक्रेनच्या राजकीय पुनर्वसनाची कामगिरी क्रुशोव्ह यांच्यावर सोपविण्यात आली. त्यांना तेथील कम्युनिस्ट पक्षाचे पहिले चिटणीस व मंत्रिमंडळाचे प्रमुख नेमण्यात आले. तेथे १९४९ पर्यंत काम केल्यावर क्रुशोव्हना कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीचे चिटणीस नेमण्यात आले. त्यानंतर तीन वर्षात जवळजवळ मालेन्कॉव्ह यांच्या बरोबरीचे स्थान क्रुशोव्ह यांनी पक्षात मिळविले होते.

## सत्तास्पर्धा

स्टालिनच्या निधनानंतर थोडा काळ मालेन्कॉव्ह पंतप्रधान व कम्युनिस्ट पक्षाचे पहिले चिटणीस झाले. बेरिया, मोलोटोव्ह, बुलगानिन व कागानोव्हिच यांना उप-पंतप्रधान नेमण्यात आले. क्रुशोव्ह फक्त प्रेसिडियमवर (पूर्वीचे पालिटब्यूरो) होते. पण स्टालिनच्या निधनानंतर एक आठवडयातच क्रुशोव्ह यांनी मालेन्कॉव्ह यांच्याशी सत्तास्पर्धा सुरू केली. मालेन्कोव्ह यांनी चिटणीस पदाचा राजिनामा दिला व क्रुशोव्ह पहिले चिटणीस झाले. सर्व सत्ता बळकावण्यासाठी स्टालिन यांनी आपल्या चिटणीस पदाचा उपयोग करून घेतला होता. क्रुशोव्ह यांनी त्याच तंत्राचा अवलंब केला. पक्षयंत्रणेत महत्त्वाच्या जागांवर त्यांनी आपली माणसे नेमली. सत्तास्पर्धेतील एक प्रतिस्पर्धी गुप्त पोलिसदलाचे प्रमुख बेरिया यांच्याविरूद्ध त्यांनी गुप्त खटला घडवून आणला. बेरिया यांना मृत्यूची शिक्षा झाली. व त्यांच्या मृत्यूबरोबर गुप्त पोलिसदलाची सत्ता संपुष्टात आली. क्रुशोव्ह यांनी एका प्रतिस्पर्ध्याचा याप्रमाणे निकाल लावला व दुसरा प्रतिस्पर्धी मालेन्कोव्ह यांची सत्ता पंतप्रधान पदापुरतीच मर्यादित केली. पण मालेन्कॉव्ह यांना त्या जागेवरसुद्धा क्रुशोव्ह यांनी फार काळ ठेवले नाही. एप्रिल १९५४ मध्ये मालेन्कोव्ह यांच्या जागी क्रुशोव्ह यांच्याच सूचनेनुसार बुल्गानिन यांना पंतप्रधान करण्यात आले. पण बुल्गानिन यांनाही त्या जागेवर फार काळ न ठेवता पंतप्रधानपद त्यांनी स्वतःकडे घेतले. पक्षाचा प्रमुख आणि सरकारचा प्रमुख दोन्ही अधिकारपदे एकाच व्यक्तीत एकवटल्याने स्टालिनच्या काळाप्रमाणेच सत्तेचे पुनः केंद्रीकरण झाले. सहकाऱ्यांना डावलून स्वतःच सारे निर्णय घेण्याची प्रवृत्ति अशा व्यक्तीत निर्माण होते. स्टालिनच्या बाबतीत तेच घडले आणि हाच दोष क्रुशोव्हच्याही बाबतीत शेवटच्या काही महिन्यात निर्माण झाला होता.

स्टालिनवादाच्या अपप्रवृत्तींचे निर्मूलनाचा प्रयत्न ही क्रुशोव्ह यांची सर्वात मोठी कामगिरी. स्टालिनच्या काळातील दहशत व भीतीचे वातावरण त्यांनी नाहीसे केले. गुप्त पोलिसांचे अधिकार कमी केले. हे खरे पण यापलीकडे ते पाऊल टाकू

शकले नाहीत याचे कारण या अपप्रवृत्तीच्या मुळांशी जाऊन त्याच्या कारणाचा शोध ते घेऊ शकले नाहीत. केवळ स्वतःचे व्यक्तिमहात्म्य वाढविल्याने स्टालिनच्या हातून चुका घडल्या हे क्रुशोव्ह याचे विश्लेषण अपुरे व वरवरचे होते. एकाच व्यक्तीच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण हे या अपप्रवृत्तीचे मूळ. रशियात कामगारवर्गाच्या हुकूमशाहीस कम्युनिस्ट पक्षाच्या हुकूमशाहीचे आणि कम्युनिस्ट पक्षाच्या हुकूमशाहीस एका व्यक्तीच्या हुकूमशाहीचे विकृत स्वरूप स्टालिनच्या काळात आले. याचे कारण लेनिनच्या प्रथा स्टालिन यांनी पुढे चालू ठेवल्या नाहीत. रशियन क्रांतीच्या सुरवातीच्या काळात कम्युनिस्टपक्षांतर्गत लोकशाही आणण्याचा प्रयत्न लेनिन यांनी केला होता पक्षाची काँग्रेस दरवर्षी भरविण्याची पद्धत त्यांनी ठेवली. या काँग्रेसमध्ये प्रत्येक प्रश्नावर पूर्ण चर्चा होत असे. कोणाही सभासदास मग तो पक्षात कितीही खालच्या स्थानावर असला तरी आपली मते मांडून नेत्यावर टीका करता येत असे. वार्षिक काँग्रेसच्या दरम्यानही चर्चा व विचारविनिमयासाठी पक्षाच्या दोन तीन बैठका होत. टीकेच्या मान्यातून लेनिनसुद्धा सुटत नसे. व्यक्तिमहात्म्य नव्हते. लेनिनने भूमिका मांडावयाची आणि बाकी सर्वांना निमूटपणे माना डोलवायच्या अशी परिस्थिती नव्हती. कम्युनिस्ट पक्ष संघटनेचे टीका व आत्मटीकेचे तत्व लेनिन यांनी प्रत्यक्ष अंमलात आणले होते. क्रांतीच्या सुरवातीच्या काळात यादवी युद्ध व दुष्काळाला तोंड द्यावे लागले, पण या कठीण परिस्थितीतही कम्युनिस्ट पक्षाची वार्षिक काँग्रेस लेनिन यांनी कधी लांबणीवर टाकली नाही. पण स्टालिन यांनी या सर्व प्रथा धाब्यावर बसविल्या. त्यांनी एवढी दहशत निर्माण केली होती, की स्टालिनच्याविरुद्ध टीकेचा एक शब्द बोलण्याचे कोणास धाडस होत नसे. हजारो विरोधकांची तुरुंगात रवानगी झाली. एवढे नव्हे तर त्यांच्यापैकी अनेकांना ठार करण्यात आले.

स्टालिनच्या काळातील दहशत क्रुशोव्ह यांनी काहीशी कमी केली खरी पण पक्षांतर्गत लोकशाहीची प्रथा सुरू करण्यात त्यांना व सध्याच्या नेत्यांनाही यश आलेले नाही. पक्ष धोरणावर अजूनही खुली चर्चा होत नाही. रशियन वृत्तपत्रे आणि सुप्रीमसोव्हिएटच्या बैठकीत खुली टीका होते असे कम्युनिस्ट म्हणतात पण ही टीका कारभारातील दोषांवर, धोरणाच्या अंमलबजावणीतील दोषांवर असते, प्रत्यक्ष धोरणावर नसते.

स्टालिनच्या धिःकाराची मोहीम क्रुशोव्ह यांनी सुरू केली पण स्टालिनच्या कार्याचे योग्य मूल्यमापन करण्यात आले नाही. स्टालिन यांचे कोणतेही दोष असोत, फार थोड्या अवधीत रशियाचा औद्योगिक विकास घडवून आणून त्यांनी रशियाचे रूप पालटले हे कोणालाही नाकारता येणार नाही. पण स्टालिनच्या धिःकाराची मोहीम सुरू झाल्यावर स्टालिनची नावनिशाणीसुद्धा कोठे राहू नये यासाठी शहरे व रस्त्यांना दिलेली त्यांची नावे बदलण्यात आली, पुतळे काढून टाकण्यात आले, लेनिनच्या शेजारचे त्याचे थडगे हलविण्यात आले. क्रुशोव्ह यांनीही

आपल्या नव्या धोरणाने रशियाचे रूप पालटले, पण पदच्युत झाल्यावर क्रुशोव्ह यांची कोठे नावनिशाणीही राहिली नाही. स्टालिनच्या काळापासून चालत आलेली कम्युनिस्ट चळवळीतील ही विकृती क्रुशोव्ह दूर करू शकले नाहीत व सध्याच्या नेत्यांनाही त्याबाबतीत यश आलेले नाही.

## भरीव कामगिरी.

शांततापूर्ण सहजीवनाचा पुरस्कार केवळ डावपेचाचा भाग म्हणून नव्हे तर टिकाऊ स्वरूपाचे धोरण म्हणून क्रुशोव्ह यांनी केला हे त्यांचे महत्वाचे कार्य आहे. साम्राज्यशाही असेपर्यंत युद्ध अटळ आहे असा लेनिनचा सिद्धांत होता पण सर्व-संहारक अण्वस्त्रांच्या शोधामुळे परिस्थिती बदलली आहे. अण्वस्त्रांचे युद्ध झाले तर त्यात सबंध जगाचाच संहार होण्याची भीती आहे तेव्हा असे युद्ध प्रयत्नपूर्वक टाळले पाहिजे अशी भूमिका त्यांनी मांडली. सशस्त्र क्रांतिकेल्याशिवाय समाजवाद आणता येणार नाही हा जुना सिद्धांतही आजच्या परिस्थितीत अबाधित नाही असे त्यांनी प्रतिपादले. कम्युनिस्ट चळवळीची आता एवढी प्रगती झाली आहे की शांततेच्या व लोकशाहीच्या मार्गानेही समाजवाद आणणे शक्य आहे. आर्थिक क्षेत्रात भांडवलदार राष्ट्रांशी स्पर्धा करून समाजवादी पद्धतीच श्रेष्ठ व वरचढ असल्याचे जगातील जनतेला अनुभवाने पटवून देता येईल असा त्यांचा विश्वास होता. शांततापूर्ण सहजीवनाच्या या धोरणानुसारच पाश्चात्य राष्ट्रांशी मैत्रीचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. क्यूबातील क्षेपणास्त्रांचे तळ काढून घेऊन जागतिक युद्धाचा प्रसंग त्यांनी टाळला. अण्वस्त्र चाचणीबंदी करार घडवून आणण्यातही क्रुशोव्ह यांनी महत्वाचा वाटा उचलला.

पाश्चात्य राष्ट्रांशी संबंध सुधारण्याच्या क्रुशोव्ह यांच्या या प्रयत्नांमुळे चीनशी मात्र त्यांचे संबंध बिघडले. क्रुशोव्ह यांचे धोरण सुधारणावादी आहे, क्रांतीच्या मार्गापासून दूर नेणारे आहे असा चीनचा आरोप होता. कम्युनिस्ट पक्षांच्या १९५७ व १९६० साली झालेल्या परिषदांत तडजोड मसुदे तयार करून रशिया-चीन संघर्ष मिटविण्याचे तात्पुरते प्रयत्न झाले. अण्वस्त्रांची गुपिते चीनला पुरविण्याचे रशियाने नाकारले यामुळे दोन्ही देशातील संघर्ष अधिकच तीव्र झाला. या संघर्षा-वर निर्णय घेण्यासाठी कम्युनिस्ट पक्षांची जागतिक परिषद भरविण्याची क्रुशोव्ह यांची योजना होती पण अशा परिषदेतून जागतिक कम्युनिस्ट चळवळीत फूट पडेल म्हणून परिषद बोलावण्याची घाई करू नये असे क्रुशोव्ह यांच्या सहकाऱ्यांचे मत होते. क्रुशोव्ह यांच्या पदच्युतीच्या अनेक कारणांपैकी ते एक कारण होते.

सत्तास्पर्धेत समजा क्रुशोव्ह यांचा विजय झाला नसता आणि मालेन्कोव्ह किंवा बेरिया यांच्या हाती सत्ता गेली असती तर क्रुशोव्हप्रमाणेच स्टालिनच्या धिक्का-राची मोहीम त्यांनी हाती घेतली असती का या महत्वाच्या प्रश्नाचा विचार केला म्हणजे क्रुशोव्ह यांच्या व्यक्तिमत्वाचे व नेतृत्वाचे वेगळेपण लक्षात येते. दुसऱ्या

कोणी नेत्याने हे कार्य केले असते असें वाटत नाही. कारण हे नेते नेहमी स्टालिनच्या जवळ रहात. सामान्य जनतेत वावरून स्टालिनच्या कार्यपद्धतीबद्दल तिला काय वाटते हे त्यांनी कधी जाणून घेतलेच नाही. क्रुशोव्हना ही संधी युक्रेनमधील बारा वर्षांच्या वास्तव्यात मिळाली. स्टालिनपासून दूर असल्याने येथे क्रुशोव्हना बरेच स्वातंत्र्य मिळाले. युद्धकाळात युक्रेनच्या जनतेत वावरताना स्टालिनच्या राजवटीबद्दल लोकांना किती तिटकारा आहे याचा अनुभव त्यांना आला. पण असा तिटकारा असूनही नाझी फौजांविरुद्ध लोक लढत होते. युक्रेनमधील या अनुभवाने क्रुशोव्ह बदलून गेले. स्टालिनच्या निधनानंतर सत्ता हाती घेण्यासाठी त्यांनी फार हुशारीने व शेतकऱ्याच्या हिकमतीपणानें पावले टाकली व सत्तेवर घट्ट पकड बसविल्यानंतर पक्षाच्या विसाव्या काँग्रेसमध्ये स्टालिनच्या अपकृत्यांचा परिस्फोट करून स्टालिनच्या धिःक्काराची मोहीम उघडली.

## पदच्युती

क्रुशोव्ह यांना ज्यापद्धतीने पदच्युत करण्यात आले त्यावरून रशियात आणि रशियन कम्युनिस्ट पक्षात खुली चर्चा होऊन लोकशाही पद्धतीने निर्णय घेतले जात नाहीत हे पुनः एकदा स्पष्ट झाले. प्रथम प्रेसिडियमची बैठक झाली. त्यातील निर्णयास मध्यवर्ती समितीने मान्यता दिली. हे सर्व लोकशाही उपचारांचे नाटक करण्यात आले हे खरे, पण एवढ्या महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय घ्यावयाचा तर दोन्ही बाजूंच्या भूमिका वृत्तपत्रात यावयास हव्या होत्या आणि पुरेशी पूर्वसूचना देऊन मध्यवर्ती समितीची बैठक घ्यावयास हवी होती.' क्रुशोव्ह यांना बेसावध अवस्थेत गाठून त्यांच्या विरोधकांनी हा बैठकीचा बनाव घडवून आणला.

क्रुशोव्ह पदच्युतीनंतरच्या सात वर्षांत कोणत्याही नव्या कल्पना, नवे नेते देऊ शकलेले नाहीत. रशिया-चीन संघर्ष मिटविण्यात त्यांना यश आलेले नाही. हंगेरीतील बंड फोडण्यासाठी क्रुशोव्ह यांनी लष्कर पाठविले होते, तर चेकोस्लोव्हाकियातील बंड मोडण्यासाठी नव्या नेत्यांनी तेथे लष्कर पाठविले. प्रत्येक राष्ट्राला आपल्या विशिष्ट परिस्थितीनुसार समाजवादाकडे जाण्याचा स्वतःचा मार्ग अवलंबता येईल हे क्रुशोव्ह यांनी तत्त्वतः मान्य केले होते, पण पूर्व युरोपवरील रशियाची पकड कमी होण्याचा संभव दिसू लागताच त्यांना या तत्त्वचा विसर पडला आणि रशियाच्या आजच्या नेत्यांच्या बाबतीतही तोच अनुभव येत आहे.

स्टालिनचा दहशतवाद क्रुश्चेव्ह यांनी घालविला ही त्यांची मोठी कामगिरी. खुली चर्चा व लोकशाही पद्धतीने निर्णय घेणे हा त्यापुढचा टप्पा. तो गाठण्यात क्रुशोव्ह यांना यश आले नाही, तसेच सध्याच्या नेत्यांनाही आलेले नाही; पण हा टप्पा गाठल्याशिवाय रशियापुढील व आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीपुढील प्रश्न सुटणार नाहीत. दहशत नाहीशी करणे हे या मार्गावरील पहिले पाऊल क्रुशोव्ह यांनी ते टाकले, पण पुढची पावले अजून दृष्टिपथात दिसत नाहीत. ◻ ◻ ◻

# 'ओझ' खटला – ब्रिटनमध्ये उठलेलं वादळ

बाल वाङ्मय म्हणजे 'उंदीरमामा म्हणाला शशलूआ'सारख्या कविता, किंवा थोडया मोठया पोरांसाठी शिवाजी, गांधी, सुभाषबाबू यांच्या कथा, कोडी, सुटीत काय करावे यासंबंधी उपदेश अशी कल्पना डोळयासमोर येते, होय ना?

आमच्या हायस्कूलमधली पोरं आताशा बाबूराव अर्नाळकर वाचू लागलीत तरी पण त्याला कुणी बालवाङ्मय म्हणत नाही.

पण इंग्लंडमधील काही तरुण संतप्त मंडळी म्हणतात, नव्या पिढीला असं जखडून ठेवू नका. त्यांना लैंगिक शिक्षणही दिलं पाहिजे, त्यांना त्यासंबंधी वाचायला दिलं पाहिजे.

हे तर जुनं झालं. लैंगिक शिक्षण द्यावं हे मत बरट्रँड रसेलनेही मांडलं होतं. ही नवी मंडळी त्यापुढे गेली आहेत. बंडू, बबडया, छोटू, गोटू (किंवा यासारखी इंग्रजी नावं) यांना करमणुकीसाठी अश्लील वाङ्मय द्यावं म्हणतात.

आणि यातून मग निर्माण झाला जुन्या आणि नव्या पिढीचा संघर्ष. 'ओझ' (Oz) नावाच्या भूमिगत मासिकाच्या संपादकांना 'प्रस्थापित' 'बुर्ज्वा' ब्रिटिश कोर्टाने शिक्षा दिली आणि संपूर्ण ब्रिटन ढवळून निघालं.

मासिकाचे संपादक २४, ३३ आणि २९ वर्षे वयाचे आहेत. यांपैकी शेवटचा मूळ ऑस्ट्रेलियाचा. नऊ ते पंधरा महिनेपर्यंतची कैद आणि ऑस्ट्रेलियनाला मायदेशी परत जाण्याचा हुकूम, अशी शिक्षा. आरोप होता मुलांना बिघडवणारे अश्लील वाङ्मय प्रसिद्ध करणे.

जज्ज आर्गिलेने आणखी एक शिक्षा दिली – या संपादकत्रयीचे लांबलचक केस कापण्याची. त्यावर पुन्हा वादळ, मग शिक्षा मागे घेतली.

या बंडखोर संपादकांनी आधीच्या अंकात शाळकरी विद्यार्थ्यांना पुढच्या अंकात लेखन आणि संपादन करण्याचे निमंत्रण दिले होते. त्याप्रमाणे अठरा वर्षांखालची वीस मुलं आली. संपादक मंडळाने काहीही सूचना, सल्ला, मार्गदर्शन न देता अंक काढायचा होता.

त्यातून हा अंक निघाला, 'शाळकरी विद्यार्थ्यांसाठी विशेषांक.'

मुखपृष्ठावर समसंभोग्याचा फोटो. आत चावट व्यंगचित्र, छोटया जाहिरातीत एक तरुणीची विवस्त्रावस्थेत मॉडेल म्हणून उभे राहण्याची 'ऑफर', एका पानावर संभोगासनांचे नवे प्रकार, असा सगळा प्रकार होता.

हौशी संपादक मंडळींनी संभोग-स्वातंत्र्याचा पुरस्कार केला होता. म्हणजे अगदी मातागमनापर्यंत!

इंग्लंडच्या शिक्षक संघटनेने तक्रार केली, पाठोपाठ संपादकांवर खटला भरण्यात आला. त्यामुळे झालं काय की या ' ओझ 'कडे चुकूनही नजर न टाकणारी मंडळी हा अंक शोधू लागली.

मागे आचार्य अत्र्यांनी बेळगावच्या त्या अश्लील मासिकावर भाऊ पाध्यांच्या ' वासूनाक्या 'वर किंवा सत्यकथेच्या दिवाळी अंकातील एक दोन कथांवर ' मराठ्या 'तून कडाडून हल्ले चढवले तेव्हा झाला तोच प्रकार.

ओझवरचा खटला तीन आठवड्यावर चालला. आर्गिलेंनी शिक्षा जाहीर केली तेव्हा कोर्टाबाहेर शाळकरी पोरं निदर्शनं करीत होती. आर्गिलेंची प्रतिमा त्यांनी जाळली. बराच गोंधळ उडाला. पोरांच्या निदर्शनांविरुद्ध मध्यमवयीन स्त्री-पुरुषांनी निदर्शने करून आर्गिलेंचे आभार मानले. या सगळ्या गडबडीत जज्ज महाशय मात्र मनातून घाबरले. त्यांनी पोलीस संरक्षण मागितलं. त्यांच्या घरा-भोवती पहारा बसवावा लागला.

या खटल्यामुळे अनेक वाद निर्माण झाले. पैकी पहिला जुन्या पिढीविरुद्ध नवी पिढी. नव्या पिढीचे समर्थक म्हणू लागले, आम्हाला संपूर्ण स्वातंत्र्य हवे. नीति-मत्ता आणि दोन पिढ्यांतील अंतर याविषयीची मतं अशाप्रकारे एकत्रित होत गेली.

या आधी ' लिटल् रेड स्कूल बुक 'चा प्रकाशक रिचर्ड हँडिसाइड (वय २६) याला हे लैंगिक व तत्संबंधीच्या औषधांची माहिती देणारे पुस्तक बाळगल्याबद्दल पन्नास पौंडाची शिक्षा झाली. तेव्हा तो म्हणाला होता, ' लहान पोरांना लैंगिक शिक्षण द्यावं की नाही हा प्रश्न आता उरला नाही, आता उरले आहे ते आव्हान : थोरांना आव्हान करण्याची ताकद लहानात आहे की नाही हा प्रश्न उरला आहे. '

यात सगळा गोषवारा आला.

ही ' परमिसिव्ह सोसायटी ' किती पुढे गेली याचा आणखी एक नमुना हाऊस ऑफ कॉमन्ससमोर नुकताच आला. बारा वर्षे वयाच्या मुलीने गुपचूप गर्भपात करवून घेतला. गोष्ट उघडकीला आली तेव्हा तिच्या आईबापांना आणखी एक धक्का बसला : आपली लाडकी लेक संतती प्रतिबंधक गोळ्या घेत होती. वयाच्या बाराव्या वर्षी !

शाळकरी पोरी अत्याधुनिक ' गर्ली ' मासिकं वाचतात, त्यातून ' मार्गदर्शन ' मिळवितात, ही त्यातून बाहेर आलेली माहिती !

ओझ मासिकाच्या खटल्यातून वृत्तपत्र स्वातंत्र्यावरही चर्चा निघाली. हे स्वातंत्र्य म्हणजे काय वाट्टेल ते लिहायचे स्वातंत्र्य आहे का ? त्यावर नैतिक बंधन आहे की नाही ?

गेल्या वर्षी मराठी पत्रकार संघटनेने जिल्हापत्रांच्या पत्रकारांसाठी ठिकठिकाणी शिबिरं घेतली, त्यावेळी वृत्तपत्रासंबंधी कायद्यांची माहिती देण्यात आली, तेव्हा

अनेक जुन्या पत्रकारांनाही प्रथमच कळलं की, हातात नियतकालिक असलं म्हणजे काय वाट्टेल ते छापता येत नाही.

पण या ठिकाणी तसा प्रश्न नव्हता. संपादकांना कल्पना होतीच. मतभेद फक्त होता : नैतिकता म्हणजे काय ? आणि आम्ही छापतो त्या मजकुरामुळे ती नक्की बिघडणार आहे का ?

यासाठी डेन्मार्कचं उदाहरण मांडण्यात आलं. लैंगिक किंवा अश्लील वाङ्मयावरची बंधनं उठविल्यानंतर या देशात काहीही आपत्ती आली नाही, उलट समाजाला त्याचा उपयोगच होतो आहे, असा दावा होता.

'ओझ'च्या संपादकांवर भरलेला खटला एका अर्थाने प्रातिनिधिक आहे. न्यूयॉर्क टाईम्सने पेंटॅगॉनची गुप्त कागदपत्रे प्रसिद्ध करणे किंवा मुंबईच्या नवाकाळच्या संपादकांनी बातमीदाराचे नाव आणि बातमी कुठून मिळाली याची माहिती देण्यास नकार देणं अशा घटनातून त्या त्या सरकारविरुद्ध, न्यायसंस्थेविरुद्ध आव्हान दिल्यासारखे होत असते. ओझचे संपादक त्या मालिकेत येतातच. पण त्यांचे आव्हान सरकार किंवा न्यायसंस्थेपुरतेच मर्यादित नाही, तर परंपरा आणि नीतिमत्तेच्या कल्पनेविरुद्ध हे आव्हान आहे. हे आव्हान आणि संपादकांनी हाती घेतलेली मोहीम योग्य की अयोग्य हा प्रश्न वेगळा. प्रत्येक देशात याबद्दलच्या कल्पना वेगळ्या असू शकतील.

खुद्द ब्रिटनमध्येच अनेकांना वाटतं, ओझ खटला म्हणजे राष्ट्रीय कलंक आहे !

ते असो.

लहान मुलांना लैंगिक शिक्षण द्यावे का यावर इतकं वादळ उठत असताना हा विनोद का आठवावा ?

बालवाडीत नाव दाखल केलेला गंपू आईला विचारतो,

'माझा जन्म कसा झाला ?'

'देवाने तुला माझ्या हातात दिलं, गंपू.'

बाबांना प्रश्न विचारला, तरी तेच उत्तर.

गंपू आजोबांकडे जातो,

'आजोबा बाबांचा जन्म कसा झाला ?'

'देव देवून गेला.

'आणि तुमचा ?'

'तसाच रे बेटा.'

गंपूने त्या रात्री रोजनिशीत नोंद केली, 'आमच्या तीन पिढ्यांचे आयुष्य फुकट गेलेले दिसते. लग्न कशासाठी करतात, शरीरसुख म्हणजे काय आणि प्रसुती म्हणजे काय याचा कुणालाच पत्ता नाही.'

□ □ □

# दुष्काळ.... पण नाण्यांचा !

**प्रतिनिधी**

सुटे पैसे देणे ही सर्वांचीच डोकेदुखी होऊन बसली आहे. पूर्वी १० पैशांच्या तिकिटासाठी १० रुपये दिले तरी ९ रुपये ९० पैसे परत मिळत असत. आता मात्र रुपयाची नोट काढली की कंडक्टरच्या कपाळावर आठया पडू लागतात. सुटे पैसे द्या म्हणून तो सांगतो. आपल्याकडे (व त्याच्याकडेही) नसले तर आपला स्टॉप येईपर्यंत मिळाले तेवढे पैसे तर देईन, नाहीतर डेपोत जमा करीन असे तो सांगतो. पण हे मान्य नसेल तर खाली उतरावे लागते. पदोपदी सुटया नाण्यांमुळे लोकांची अडवणूक होते. अगदी छळवादच चालू आहे. कोणताही दुकानदार वा फुटकळ वस्तू विकणारे अथवा भाजीवाले, प्रथमच सुटे पैसे देण्याबाबत गिऱ्हाईकाला सांगतात. नसेल तर वस्तू खरेदी करू नका म्हणून चक्क सुनावतात. त्यांच्यापेक्षा वस्तूची गरज आपल्याला अधिक असल्यामुळे 'अडला हरी...' अशी आपली अवस्था होते.

पण यात तसा त्यांचा दोष नाही. त्यांनाही सुटे पैसे मिळणं दुर्मिळ झालं आहे. बस कंडक्टर्सचेच पहा. पूर्वी प्रत्येक कंडक्टरला डयुटी सुरू होताना पाच रुपयांची सुटी नाणी मिळत असत. ते प्रमाण गेल्या जानेवारीत ३ रुपयांवर आले होते, तर आज २ रुपये मिळाले तर मिळाले नाही तर नाही अशी अवस्था आहे. रिझर्व्ह बँक प्रत्येक दिवशी बी. ई. एस्. टी. ला ५००० रुपयांची सुटी नाणी देते, पण त्यांच्या सेवेत ७ हजार कंडक्टर्स आहेत; मग ही चिल्लर कशी काय पुरी पडणार? म्हणूनच 'बेस्ट'चे नवे चेअरमन श्री. किसन मेहता यांनी कुपन पद्धती अंमलात आणायचे ठरविलं होतं. पण ही योजना मागे घेण्यात आली आहे. कारण त्यामुळे प्रश्न सुटण्याऐवजी तो अधिक बिकटच झाला असता.

मुंबईत अनेक ठिकाणी, विशेषतः उपहारगृहांतून कुपन्स देणे चालू झाले आहे, पण ते कायदेशीर चलन आहे काय अशी समस्या निर्माण झाली आहे. फोर्टमधील

एका दुकानात परवा एक वृद्ध गृहस्थ गेले. त्यांचे बिल ४० पैसे झाले. त्यांच्याकडे फक्त एक रुपया होता. तो त्यांनी दिला, पण ६० पैसे परत मिळण्याऐवजी त्यांना १० पैसे देऊन ५० पैशांचे कुपन दिले गेले, पण बसने घरी जाणार कसे म्हणून त्यांनी पोलिसांकडे तक्रार नोंदविली. पोलिसांनाही कुपन्स कायदेशीर चलन होऊ शकतील का; यावर त्यांच्या कायदेपंडीतांचे मत घ्यावे लागले. तात्पुरती प्रश्नांची सोडवणूक म्हणून त्यांच्या बिलाचे पैसे पोलिस स्टेशनच्या सब-इन्स्पेक्टरने भरले व त्यांचा रुपाया परत दिला.

एका उपहारगृहात नाविन्यपूर्ण कुपन आढळले. समजा १·२० पैसे बिल झाले आहे. पण '८० पैशांचे हे कुपन आहे' असे म्हणण्याऐवजी '२० पैसे दिल्यावर रुपाया परत मिळेल.' असे कुपन दिले जाते.

दक्षिण-मध्य मुंबईच्या काही भागात त्या भागातील बहुतेक सर्व दुकानांतून चालू शकतील अशी कुपन्स निघाली आहेत. म्हणजे हे प्रतिचलन झाले, मग सरकारी चलनाला आता या कुपन पद्धतीने काही किंमत उरणार आहे का असा संभ्रम निर्माण होण्याचीच ही परिस्थिती त्या भागात निर्माण झाली आहे, असेच म्हणावे लागेल. हे सर्वच अत्यंत गंभीर आहे.

'टाईम्स'मध्ये बुधवारी नाणे-टंचाईसंबंधीची एक बातमी आहे. क्रॉफर्ड मार्केट-जवळ असलेल्या एका उपहारगृहाच्या मालकाने मराठी, हिंदी, गुजरातीत सूचना-फलक रंगविले आहेत की, ग्राहकांनी सुटे पैसे द्यावेत नाहीतर पाच पैसे जादा आकार द्यावा लागेल. याचे कारण हे की १०० रुपयांचे सुटे पैसे मिळविण्याकरिता त्याला दलालाला १२० रुपये द्यावे लागतात.

संपूर्णपणे नोटात व्यवहार होण्यासाठी एक तर जादा वस्तू खरेदी कराव्या लागतात वा वस्तू कमी करून हे तंत्र सांभाळावे लागते. काही दुकानदारांनी हा व्यवहार सुरळीत चालण्यासाठी काही वस्तूंची भाववाढ करून प्रश्न थोडाफार सोडविण्याचा (अर्थातच त्यांना फायदेशीर होईल अशा रीतीने) प्रयत्न केला आहे. फेरीवाले, चणेवाले वगैरेंना नाणे-टंचाईचा फारच जबर तडाखा बसला आहे. मेट्रो-

---

देशातील एकूण चलन सुमारे साडेबेचाळीस अब्ज इतके आहे. त्यापैकी १२७ कोटी रुपये नाण्यांत आहेत.

खराब झालेली वा झिजलेली नाणी रिझर्व्ह बँक मागे घेऊन मोडीत काढीत असते, त्याची भरपाई करावी लागते. लोक निरनिराळ्या प्रकारे व कारणांनी पैशांचा गैरवापर करतात. त्यामुळेही चलनात तूट येते. पैसे हरवि-ण्यामुळेसुद्धा हा साठा कमी होत असतो.

टंचाईपूर्वी रिझर्व्ह बँक महिन्याला सुमारे ५० लाख रुपयांची नाणी 'इश्यू' करीत होती.

जवळील एका पेपरवाल्याकडे 'बुलेटिन' व 'इव्हिनिंग न्यूज ऑफ इंडिया'चे अनेक अंक पडून होते, कारण सुटे १२ पैसे देण्याचा प्रश्न आहे हा.

नाणे-टंचाई झाली खरी, पण अनेक टॅक्सीवाले समंजस झाले आहेत. काही टॅक्सीवाले रुपयावर ५० पैशांपेक्षा अधिक बिल झाले असेल आणि तेवढे सुटे पैसे नसतील तर ५० पैसेच किंवा असतील तेवढे सुटे पैसे घेतात. तर रुपयांवर ३० किंवा ४० पैसे बिल झाले असेल तर साधारणपणे दहा-वीस पैसे जादा घेऊन ५० पैसे देण्याची विनंती गिऱ्हाईकाला करतात. पण हा सर्वस्वी ते गिऱ्हाईकाच्या खुषीचा प्रश्न मानतात एवढे मात्र खास

वेटर्सनाही टंचाईची चांगलीच झळ पोहचली आहे. त्यांचेही उत्पन्न कमी झाले आहे. पण मोठ्या हॉटेल्समध्ये त्यांची चंगळ होत आहे. सुटया नाण्यांऐवजी त्यांना बंदे रुपये टिप म्हणून मिळतात. काही ठिकाणी सुटया पैशांऐवजी पोस्टाची तिकीटे वा कार्डे मिळतात. काही लोक टिप म्हणून वेटर्सना तीच तिकीटे वा कार्डे परत करतात. मग एक तर रुपयांपर्यंतची तिकीटे वा कार्डे झाली की ती काऊंटरवर देऊन ते रुपया बंदा करून घेतात किंवा पत्रे लिहिण्याकरिता त्यांचा उपयोग करतात.

भिकाऱ्यांचेही हाल चालू झाले आहेत. पण काही दिवसांपूर्वी एका भिकाऱ्याला याबाबत विचारताच तो म्हणाला की, एका फेरीवाल्याला १ रुपयाच्या बदल्यात तो ८० पैसे देतो. ही एक प्रांजल कबुलीच नाही का ?

रेल्वेच्या तिकीटांच्या खिडक्याही अनेक वेळा याबाबत असहकार पुकारतात. चर्नी रोड येथील एक मग्रूर तिकीट क्लार्क सुटे पैसे दिले तरच तिकीट देतो नाही-तर बेपर्वा वृत्तीने चक्क नकार देतो.

रिझर्व्ह बँकेत जिथे नाणी मिळतात त्याला, तर आता मासळी बाजाराचेच स्वरूप आले आहे. अनेक लोकांच्या भल्या मोठ्या रांगा, आरडाओरड हा तेथील रोजचा तमाशा. चार-पाच महिन्यांपूर्वी या गोंगाटाने खूप त्रास होतो म्हणून तेथील कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांकडे तक्रारही केली होती. आता त्यांनाही याची सवय झाली असावी.

तेथील रांगांमध्ये दलाली करणारे व साठेबाज यांचेच प्रमाण अधिक असावे असे पाहाताक्षणीच वाटू लागते

ग्रीस व थायलंड या देशांसाठी मुंबईची टांकसाळ नाणी पाडीत होती हे आता-पर्यंत सर्वांनाच माहिती झाले आहे. जानेवारी ७१ पर्यंत हे काम पूर्ण करण्याची भारतावर जबाबदारी होती. त्यामुळे भारतीय नाणी पाडण्याच्या कार्यक्रमात थोडा खंड पडला खरा, पण नाणी वितळवून त्यांचा धातू विकणे, वीस पैशांची नाणी वितळ-वून त्याच्या बांगडया, पेनची निब्स वा भांडी बनविणे, चोरटया मार्गाने परदेशी नाणी पाठविणे आणि आल्या संधीचा पूर्ण फायदा उठविण्यासाठी साठेबाजी करणे

असे चाळे समाजकंटकांनी सुरू केल्यामुळे टंचाईला अधिक गंभीर स्वरूप प्राप्त झाले.

देशात मुंबई, अलिपूर (प. बंगाल) व हैद्राबाद येथे टांकसाळी आहेत. अलिपूर, हैद्राबाद येथील टांकसाळीत अविरतपणे काम सुरू असून नाण्यांचे उत्पादन वाढविण्यात येत आहे. तर मुंबईच्या टांकसाळीत नऊ तासांचो एक अशा दोन पाळ्या करण्यात आल्या असून १२ लाख नाण्यांऐवजी ३५ लाख नाणी पाडली जात आहेत.

गेल्या वर्षी ५५ कोटींची नाणी पाडण्यात आली होती. यावर्षी ती १८५ कोटी पाडली जातील. केंद्रिय गुप्तचर विभागाने सुटया नाण्यांबाबत होणारे गैरप्रकार व व्यवहारांचा छडा लावण्याचें काम हाती घेतले असल्याची घोषणा दोन दिवसांपूर्वीच केंद्रीय मंत्री श्री. के. आर्. गणेश यांनी केली. साधारणपणे या वर्षाअखेर तरी नाणेटंचाई दूर होईल अशी आशा रिझर्व्ह बँकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने माझ्याकडे व्यक्त केली. आपणही अशी आशा बाळगायला हरकत नाही. तोपर्यंत हा त्रास सहन करावा लागणार आहे. ☐

# 'ओनम कम्स टू बॉम्बे'

'ओनम' म्हणजे केरळची दिवाळी. आपली दिवाळी, म्हैसूरचा दसरा किंवा बंगालची कालिपूजा जेवढ्या दणक्यात साजरी होते तेवढ्याच दणक्यात ओनम केरळात साजरा होतो. हिंदूबरोबर तेथील ख्रिश्चन्सही उत्साहाने त्यात भाग घेतात, मुंबईतील बंगाली वा तामिळ समाज त्यांचे सण खास वैशिष्ट्यपूर्णरीतीने मुंबईत नेहमीच साजरे करतात. यावर्षी प्रथमच 'ओनम' येथे साजरा झाला. मूळ भारतीय संस्कृती उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत वा पूर्व-पश्चिमेस एकच आहे. पण वेगवेगळ्या ठिकाणी ती वेगवेगळ्या रूपात साकार होत असते.

'ओनम'च्या मागे पुराण-कथा आहे. असूर राजा महाबळी (बळी) केरळात राज्य करीत होता तेव्हा सर्वत्र आबादीआबाद होती. चोऱ्या, लांडीलबाडी होत नव्हती. दुधामधाचे पाट केरळात वहात होते. वामनावताराची कथा पुढे घडते आणि महाबली पाताळात जातो. महाबली या सणाच्या दिवसांत केरळातील घराघरातून हिंडतो अशीही लोकांची भावना आहे. महाबलीच्या केरळात आता जरी अठराविश्वे दारिद्रय वास करीत असले तरी महाबलीला समाधान वाटावे म्हणून कर्ज काढून का होईना पण 'ओनम' सुंदर रितीने व दणक्यात साजरा करण्यात येतो. त्याबद्दल मल्याळी भाषेत एक म्हण आहे 'कानम विठ्ठुम ओनम उन्नानम'.

दिवाळीत महाराष्ट्रात रांगोळ्या घातल्या जातात तर फुलांचे अपार वेड असलेल्या केरळात रांगोळ्यांप्रमाणेच दारात फुलांची डिझाईन्स (अथ्थापूव्) तयार

केली जातात. केरळांतील हे सुगीचे दिवस. सर्वत्र हिरव्या रंगाचे राज्य. अशा धुंद दिवसांत ' ओनम ' साजरा होतो. कोचीनच्या दक्षिणेला असलेल्या अलेप्पी येथे पारंपारिक पद्धतीने सर्पाकृति होड्यांच्या शर्यती होतात. ओनमचे दिवस बेहोशीत जगले जातात.

' हॅन्डीक्राफ्ट डेव्हलपमेन्ट कार्पोरेशन ऑफ केरला 'चे ' कैराळी ' नावाचे एक एम्पोरियम मुंबईत आहे व त्यांनी ' ओनम कम्स टू बॉम्बे ' (' मिनी ' ओनम) मुंबईत साजरा केला. केरळच्या जीवनाचे जास्तीतजास्त दर्शन घडविणे आणि केरळच्या कलाकारांनी ग्रामोद्योगात तयार केलेल्या सुंदर सुंदर वस्तूंचा खप वाढविणे हा यामागचा उद्देश होता. परदेशी प्रवाशांची तर ' कैराळी 'तील सुबक वस्तू घेण्यासाठी एकच झुंबड उडाली. ओनमच्या दिवसांत ज्यांनी कमीतकमी ५० रुपयांची खरेदी केली त्यांना ' कैराळी 'तर्फे संध्याकाळी कार्यक्रम पाहाण्याचे आमंत्रण देण्यात येई. याचवेळी एक छोटा (मिनी) फॅशन-शोही होई. बळी व वामन—तीन पावले जमीन मागणे—हा, त्याचप्रमाणे कैकोट्टीकली हा केरळचा अत्यंत आवडता नृत्य प्रकारही सादर केला जाई.

महाराष्ट्र राज्य सरकारने इतर राज्यांत किती एम्पोरियम्स सुरू केले आहेत हे फक्त सरकारलाच माहिती असेल, पण दिल्लीतील कॅनॉट प्लेसमध्ये जिथे बहुतेक राज्यांची—जयपूर एम्पोरियम, म्हैसूरचे कावेरी वगैरे—एम्पोरियम्स आहेत तसे महाराष्ट्राचे ' कोयना ' वा ' कृष्णा ' एम्पोरियम असावे असे वाटत नाही.

केरळ व महाराष्ट्राचा किनारपट्टीचा भाग हे भौगोलिक दृष्ट्या जवळ जवळ सारखे आहेत. बांबू, माड यांचे उत्पन्न दोन्ही ठिकाणी भरपूर, पण नारळाच्या झाडाचा कल्पवृक्ष म्हणून खरा उपयोग केरळच करीत आहे. नारळाच्या करवंटीचा उपयोग कोकणात तपेलीतील गरम पाणी काढण्याच्या ढवळीपुरताच किंवा काथ्याचा उपयोग बिछाना करण्यापलिकडे फारसा केला जात नाही.

केरळात याच टाकावू करवंट्यांना तेथील कलावंतांचा हात लागताच त्यांचे रूपांतर सुबक अशा ॲश ट्रे, टेबल लॅम्पस् व इतर सुंदर सुंदर वस्तूत होते. कचऱ्यातून पैसा मिळविला जातो. काथ्याचा व बांबूचा उपयोग चटया वगैरेसाठी केला जातो, म्हशींची शिंगेही वस्तू करण्यासाठी वापरली जातात.

महाराष्ट्राने असा काही प्रयत्न का करू नये ? महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन संचालनालयाच्या संचालिका श्रीमती मालती तांबे, पर्यटन व तत्सम विषयात तज्ज्ञ आहेत. अलिकडेच त्यांनी प्रवाशांना आकर्षक वाटतील व त्यांना माफक दरात विकत घेता येतील अशा महाराष्ट्र संस्कृतीदर्शक वस्तू तयार करून घेतल्या आहेत. त्यांनी या ' टाकावू ' वस्तूंकडेही लक्ष द्यावे असे वाटते. कोकणातील लोकांना घर बसल्या करता येणारा हा ग्रामोद्योग निश्चितच फायदेशीर पडेल. केरळ या वस्तूंची निर्यात करीत आहे.

◻ ◻ ◻

आस्तिक–नास्तिक

देवीदास बागूल

# विसरो नका रंकासी

एखादा माणूस आपला शत्रू जरी असला तरी तो आपल्या घरी आला म्हणजे आपण त्याचे तोंडदेखले तरी आगतस्वागत करतो. त्याचे कुशल विचारतो. प्रकृतीची चौकशी करतो. धंदापाण्याबद्दल विचारपूस करतो. वरवर का होईना, पण आपण त्याच्याबद्दल बोलतो. आणि विशेष म्हणजे त्याचे वर्म न काढण्याची काळजी घेतो. त्यासाठी मुद्दाम प्रयत्न करावे लागतात, टोचूनखोचून न बोलण्यासाठी संयम करावा लागतो, हे कबूल. पण तो संयम आपण शिष्टाचार म्हणून का होईना करतो. याचा अर्थ असा नव्हे, की आपण फार सज्जन असतो, संत असतो. आपण असतो साधी संसारी माणसं! अरेला कारे केलं तर ते आपल्याला फारसं वावगं वाटत नाही. अशी परतफेडीची वृत्ती असलेले आपण लोकही प्रसंगी शत्रू आपल्या घरी आला तर थोडा वेळ रीतभात पाळतो. मग समजा एखाद्या सज्जन माणसाच्याच घरी कोणी शत्रू आपणहून शरण आला तर तो कसा वागेल? खरं सांगायचं म्हणजे त्या संताच्या बाबतीत असा प्रश्न विचारणंच मूर्खपणाचं ठरेल. तो संत अगदी मनःपूर्वक प्रसन्न होऊन त्या शत्रूचं प्रफुल्लीतपणे स्वागत करील. त्याच्याशी जिव्हाळ्याच्या गोष्टी बोलेल. असतील नसतील त्या सर्व उपायांनी त्याची सेवा करील. त्याला रुचणाऱ्याच गोष्टींचा उल्लेख करील आणि खुपणाऱ्या गोष्टी बाजूस ठेवील.

आणि समजा, तो माणूस शत्रू असण्याऐवजी मित्र असला तर? अगदी 'समान-शीलेषु व्यसनेषु सख्यम्' या प्रकारातला असला तर? तर मग काही विचारूच नका! अगदी सर्व भावे आनंदाचं भरतं येईल. संवादसुखाचा एकच कल्लोळ उठेल. हृदयाचा हृदयाशी संवाद होईल. आणि शेवटी दोघेजण एकरस होऊन निर्भर आनंदाने डुलत राहतील. शेवटी 'आनंदी आनंद गडे जिकडे तिकडे चोहीकडे' अशी अवस्था होऊन ते दोघे शांतीच्या साम्राज्यात विहरत राहतील.

पण नाही, कधीकधी संतांच्या बाबतीत विपरीत अनुभव येतो. त्यांच्याकडे काही आत्मसुखाच्या गोष्टी बोलण्यासाठी जावं तर आत्मसुखाच्या गोष्टीऐवजी भलत्याच

गोष्टी ऐकून घ्याव्या लागतात. मुख प्रफुल्लित होण्याऐवजी मुखभंग होण्याचाच प्रसंग ओढवतो. खोटं वाटत असेल तर खुद्द तुकाराम नावाच्या संतालाच विचारा. तो म्हणतो,

वारकरी पायापाशी । आले त्यासी विनविले ।।
काय काय ते आइका । विसरों नका रंकासी ।।
चिंतावोनि चिंता केली । हे राहिली अवस्था ।।
तुका म्हणे संवसारा । रुसलो खरा यासाठी ।।

म्हणजे त्याचे असे झाले की, तुकारामाची विठ्ठलभक्ती ऐकून वारकरी लोक तुकारामाकडे आले. त्यांना वाटले असावे की, तुकाराममहाराज वारीबद्दल काही चार शब्द सांगतील. पंढरपूरचे माहात्म्य वर्णन करतील. ' जाय जाय तू पंढरी । होय होय वारकरी ' असे सांगून ' पंढरीचे वारकरी । ते अधिकारी मोक्षाचे ' असे आश्वासन देतील. आपण वारकरी आलो म्हणून आनंद व्यक्त करून कथाकीर्तन करतील. साधुसंत घरी आले म्हणून दसरा दिवाळी साजरी करतील आणि ' माझिये जातीचे मज भेटो कोणी । आवडीची धणी फेडावया ' ही तळमळ शांत झाल्यामुळे ते घरी आलेल्या वारकऱ्यांना म्हणतील की, ' शेवटची विनवणी संतजनी परिसावी ।। विसर तो न पडावा । माझा देवा तुम्हासी ।। '

पण प्रत्यक्षात झाले भलतेच !

पंढरपूरचा महिमा, विठ्ठलाचे नामसंकीर्तन, संतसंग, आत्मापरमात्मा ह्या पारलौकिक गोष्टी बाजूलाच राहिल्या आणि उलट भलतीच ऐहिक गोष्ट ऐकून घ्यावी लागली.

त्या वारकऱ्यांना तुकाराम सरळसरळ म्हणाला की, ' काय काय ते आइका । विसरो नका रंकासी ।। ' वारकऱ्यांनो, मी काय काय सांगतो ते नीट ऐका. मी फक्त एवढेच सांगतो की, गोरगरिबांना, दीनदुबळ्यांना, दलितपीडितांना विसरू नका.

वारकरी तुकारामाकडे आले कशासाठी आणि मिळाले काय ? आले होते पारलौकिकाच्या गोष्टीसाठी, पण ऐकाव्या लागल्या ऐहिकाच्या गोष्टी; आले होते पंढरपूरच्या दिशेसाठी, हुकूम मिळाला गावातच फेरा घालण्याचा; वाटले होते कृपेचा वर्षाव होईल, पण घ्यावा लागला सेवेचा वसा.

म्हणजे भरवशाच्या म्हशीला टोणगाच झाला म्हणा की ! ज्याने विठ्ठलभक्तीचा मक्ता घेतला असे आपण समजत होतो त्यानेच जर असा लौकिकाचा मार्ग सांगितला तर तक्रार तरी करणार कुठे ? माळ्यानेच जर बाग उजाड करायचे ठरविले तर फुलझाडांनी पाहायचे तरी कोणाकडे ? औषध घ्यायला आलेल्या माणसाला कुपथ्य सांगितले तर काय, बोलणार तरी काय ?

वारकरी आणि रंकाची सेवा ह्या दोन गोष्टींचा संबंधच काय ? तुकारामाचे डोकेबिके तर फिरले नव्हते ना ? वारकऱ्यांना तो समाजसेवक वगैरे समजला की

काय ? बारकऱ्याने जर दीनदुबळयांची सेवा करण्याचे ठरविले तर मग पंढरपूरच्या वाळवंटात विठ्ठलाच्या नावाने कोण कीर्तन-नर्तन करील ? संतांचे मार्ग कोण झाडील ? परमात्म्याला आत्म्याच्या पाळण्यात कोण झोके देईल ? संसारावर चिरा कोण ठेवील ?

यावर तुकाराम म्हणतो की, या सर्व गोष्टींचा मी पूर्ण विचार केला आहे. वरील अभंगाच्या तिसऱ्या चरणात तो म्हणतो की, " चिंतावोनि चिंता केली । हे राहिली अवस्था ।। " ह्या सर्व गोष्टींचा खूप विचार केला; विठ्ठलाला शरण गेले पाहिजे, त्याचा विसर न पडला पाहिजे, नामसंकीर्तनासारखे सोपे साधन नाही, पंढरपूरला सगळया पापांचा नाश होतो, इत्यादी सगळया गोष्टींचे भरपूर चिंतन केले, पण शेवटी मात्र, " हे राहिली अवस्था । " म्हणजे असे की, तात्पर्य एवढेच सापडले की, त्या सर्व गोष्टींच्या अगोदर ह्या जगात रंकांची अवस्थाच माझ्यापुढे उभी ठाकली आहे. रंकपण, रंकांची हलाखी जोपर्यंत समूळ नष्ट होत नाही तो-पर्यंत बाकीच्या गोष्टी बोलण्यात मला सुख नाही. तुकाराम पुढे म्हणतो की, अगदी खरंखरं सांगू का ? त्या आधी एक प्रश्न विचारतो? मी संसारावर का रुष्ट झालो असेन ? परमेश्वरप्राप्तीसाठी रुष्ट झालो असे कोणास वाटेल ! छे छे, ती बातच सोडा. मी संसारावर रुसलो याचे खरे कारण या संसारात अजून कोणी रंकाची काळजी घेत नाही, दीन-दुबळयांची कोणी वास्तपुस्त करत नाही, त्यांच्या झोपडीची वारी कोणी करत नाही. जोपर्यंत या जगात रंक आहेत, पीडित-दलित लोक आहेत तोपर्यंत जिवाला पंढरपूरची वार्ताच रुचत नाही. म्हणून हे वारकऱ्यांनो, तुम्हाला नम्र विनंती की, ' विसरू नका रंकासी । '

घरी आलेल्या वारकऱ्यांशी अध्यात्मचर्चा, विठ्ठलनामसंकीर्तन करण्याऐवजी रंकांच्या हलाखीची आठवण करून देणारा तुकाराम हा आस्तिक म्हणावा की नास्तिक ? रंकांच्या पुढे विठ्ठलाची मातब्बरी न मानणारा हा तुकाराम नास्तिक म्हणावा की, दीनदुबळयांच्याबद्दल माणुसकीच्या नात्याने काळजी करणारा, मानवी जीवनावर विधायक आणि ऐहिक निष्ठा ठेवणारा तुकाराम आस्तिक मानावा ? स्वतःची आत्मोन्नत्ती साधू पाहणारे वारकरी आस्तिक की जिवंत माणसांची दखल घेणारा तुकाराम आस्तिक ?

या जगांत इतके वारकरी झाले, संत झाले, पण अजून जगातल्या रंकांची, दुबळयांची गांजणूक संपलेली नाही. उलट ती गांजणूक नवनवी रूपे घेऊन माणसाची छळवणूक करते आहे. ही छळवणूक जोपर्यंत चालली आहे, तोपर्यंत पंढरपूरची वारी करणे, पुण्या-मुंबईस कृष्णमूर्ति, आचार्य रजनीश ह्यांच्या साधनाशिबिरांना गर्दी करणे ह्या गोष्टी करण्यात काहीच माणुसकी नाही. हे सर्व साधक जर तुकारामाकडे गेले तर माणुसकीचा गहिवर असलेला तो तुकाराम फक्त एवढेच सांगेल की, ' विसरू नका रंकांसि ' !

□ □ □

“ अहो, पागनीस या इकडे ” ‘ तो ’ करवादला आणि टक्कल पडलेल्या डोक्या-वरचे उरलेले केस ताठ झाले. टेबलावर मूठ आपटताना बिन हाताच्या खुर्चीचा तोल गेला.

पागनीसला त्याचं चिडणं अपेक्षित होतं. संवाद नित्याचा झाला होता. ओव्हर-टायपिंग झालं होतं आणि काही शब्दांचे कंस मुद्दामच त्यानं टाइप केले नव्हते.

“ पागनीस ऽ ऽ ”

“ ......... ”

“ अहो मी तुम्हाला हाक मारली, बहिरे झालात काय एवढ्यात ?

पागनीस उठला आणि शुंभासारखा त्याच्या पुढ्यात उभा राहिला आणि “ का ऽ य ? ” म्हणून उगीचच वेड पांघरलं.

भडकणं आणि झुरत राहणं हा त्याचा स्वभाव होता. आसरानी, दानवे, करंदी-

# “ लीव्ह फिफ्टी टू ”

**मनोहर गोविंद तळेकर**

कर, बापट, सुशीला कारखानीस, पागनीस, लक्ष्मण प्यून आणि ‘ तो ’–अष्टग्रहीच आणि त्याशिवाय लिखिते राहिलाच. इन मीन नऊ जणांचं तर डिपार्टमेंट.

“ बघा मी किती स्वच्छ अक्षरात ड्राफ्ट केलय्, ” तो ताडताड बोलत होता, प्रवेश रंगत होता. “ साधं टाईप करता येऊ नये तुम्हाला ? का तुम्ही मुद्दाम करता ? मला कळत नाही काय ? का माझं डोस्कं फिरवता ? टेल् मी इफ् यू डोंट वाँट टू डू माय वर्क. ”

“ बरं आता मी काय करू ? ” पागनीसचा सेकंड गियर !

“ काढा तुमच्या पायातला जोडा आणि हाणा माझ्या टकलावर. तुम्हाला काम देण्याची चूक केल्याबद्दल. ”

वास्तविक हाच विचार पागनीसच्या मनात गंमत म्हणून आला होता. कालच त्याने ४०·९५ ला बाटा घेतले होते.

त्यानं भिरकावलेले कागद घेऊन पागनीस टाईपरायटरवर आला. स्वतः स्थित-प्रज्ञ राहून दुसऱ्याला भडकावणे म्हणजे पागनीसच्या आवडीचा खेळ. ‘ पागनीस, मानतो बुवा तुला ’–अष्टग्रहींची एकमेकांशी नेत्रपल्लवी.



पागनीसला हाकलल्यावर त्याला आठवण झाली " सालं ' लिव्ह फिफ्टी टू ' च्या गोळ्या घ्यायच्या आहेत. लंचनंतर लगेच घ्यायला हव्या होत्या." २ वाजायला आले होते. लक्षातच नाही राहिलं. ह्या कामाच्या गोंधळात. चूक त्याची नव्हती आणि चूक त्याची नव्हती म्हणून त्याला स्वतःची चीड आली. टेबलाच्या खणातली बाटली काढताना त्यानं सभोवार पाहिलं. दानवे, करंदीकर, पागनीस...साले नुसते येऊन चकाट्या पिटतात ऑफिसात. कामे करायला नकोत हरामखोरांना आणि पगार काय एकेकांचे.

गोळ्या गिळायला पाणी हवं होतं. लक्ष्मणचा नेहमीप्रमाणे पत्ता नव्हताच. क्लास फोर ऑफिसर ! भडव्याला डिसोझापुढे उभा केला पाहिजे. सुशीलेला पाणी देईल, लोणी देईल. सिनेमाची तिकिटे काढून आणून देईल. टरटरलीय् साली आणि मी पाणी मागितलं की,..." साब हमारा काम नहीं...पगार घेतोस त्याची काही लाज ?"

" कसल्या गोळ्या घेता ?" दानवेची टेबलाजवळ येऊन चौकशी.

" लीव्ह फीफ्टी टू. "

दानवे विचारायचं म्हणून विचारत होता. त्याच्या फिरक्या घेण्यात दानवेला गंमत वाटायची.

त्याला हे माहीत नव्हतं असं नाही. त्याला ते कळत होतं. तरीही तो दानवेशी बोलायचा. मनापासून बोलायचा. तो मनापासून बोलायचा कारण दानवे त्याचं ऐकत राहायचा. आफ्टर ऑल मॅन् इज अे सोशल ॲनिमल. मनुष्य समाजाशी तुटक वागला तरी त्याला भाणूस लागतोच आपलं मनोगत सांगायला. व्यथा मनीची भडाभडा ओकायला.

" किती गोळ्या घ्यायच्या ?"

" रोज चार."

" म्हणजे महिन्याला १३० झाल्या "–दानवेने हिशोब केला.

" बी. ए. ला गणित घेतलं होतं ?" ' त्या ' चा तिरकस प्रश्न.

" छे हो. मी इतिहास घेऊन बी. ए. झालो, का बरं ?"

" म्हणूनच तुमचं गणित बरोबर आलं ! "

संवाद वळण घेत होता. सहकाऱ्यांच्या गालावर खळी. ' चालू दे. '

दानवेकडे आज काम कमी व म्हणून वेळ भरपूर होता.

" फार महाग असेल नाही हे औषध ?" दानवेचा पुढचा चेंडू.

" अहो महाग ?" विचारू नको. एका गोळीला ८ पैसे. "

" आजकाल औषध कंपन्यासुद्धा लोकांना लुबाडतात नुसत्या "–दानवेची सहानुभूति.

एवढ्यात लक्ष्मण उगवला. दानवेने पाणी आणायला सांगितल्यावर पाणी तत्परतेने आणले गेले. दानवेने पाणी आणायला सांगितले म्हणून मी पाणी आणले हा उपकारकर्त्याचा लक्ष्मणच्या चेहऱ्यावरील हावभाव ' त्या ' नं जाणला; पण कुठेतरी स्वार्थ साधल्याची भावना जागी असते म्हणून ' तो ' ह्या पाणउताऱ्यावर काहीच बोलला नाही. गोळ्या घोटाबरोबर गेल्या एकदाच्या घशाखाली.

तेवढ्यात दानवेला डिसोझाचं बोलावणं आलं. ' तो ' गबाळ्यासारखा टकलावर हात टेकवून दानवेच्या टाईट पँट, टेरिलिन शर्टातल्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत राहिला. बरं आहे बुवा ह्या शिच्याचं. ना मूल ना बाळ, बायको भोसडीच्याची सुंदर आणि कमावती, ८०० रुपये पगार. काम नाही ×× च. बँकवाली बायको. तिची ४०० रुपये मिळकत.

ऑडिटला नोट पाठवायची होती, त्याच कागदावर ' त्या ' नं दानवेचं मासिक बजेट काढलं. ५०० रुपये शिल्लक !! म्हणूनच लेकाचा माजला आहे. टकलाचे केस पुन्हा उभे राहिले.

त्याच्या लक्षात् आलं ऑडिटच्या पेपरवर दानवेचा हिशोब–दूध, वाणी, भाडे, रोजचा सिनेमा आणि त्याच्या नखरेल बायकोचा गजऱ्यावरचा खर्च–तो भानावर

आला. टेबलात खोडरबर नव्हता. त्याच्या वस्तू कशा जिथल्या तिथे असतात. साला आपण कुणाकडे जात नाही, वस्तू हाती लागत नाहीत. हा काय चावटपणा ? सुशीला कारखानीसचाच असणार.

" अहो कारखानीस ! "

वेंधळी मुलखाची. स्वतःच्या वस्तू जपायला, नीट ठेवायला नकोत. ऑफिसात काकोडकर वाचायला पाहिजे आणि बाहेर प्रेम करा. बाईची जात म्हणजे बोलायची सोय नाही. आज हिचं असंच. जेवणाच्या डब्यांत चमचा ठेवला नाही. गधडी. तूप एवढं नखाएवढं आणि गुळाची ढेप घातलेली. "

" अय्या, मी किनई विसरलेच तुमचा रबर परत करायला. सो सॉरी "— सुशीलेचा किनरा आणि गोड आवाज, ऐकून मधुमेह व्हावा. वर लटका मुरका. लिखितेची दिलकी धडकन वाढली. करंदीकर त्या गुळाच्या ढेपीसारखा विरघळला.

" हे बघा, आठवण राहात नसेल तर यापुढे काही नेत जाऊ नका. "

सुशीला कोडगी होती—' त्या 'च्या दृष्टीने. तिने आणखी एक मुरका मारला आणि पागनीसच्या अंगावरून सुगंधाचे फवारे उडवीत निघून गेली.

"...आमचे येथे श्रीकृपेकरून......" टेबलात कुणाचीशी कुंकुमपत्रिका पडली होती, "...कृपया आहेर आणू नये..." काय डचांबीस आहेत "...स्वीकारला जाणार नाही. " महाकोडगे लोक...अरे देतय कोण् इथे ? कुणाची इस्टेट वाया जातेय ? माधव आणि मिलिंदच्या लग्नाला अजून वीस वर्षे आहेत. तोपर्यंत मी निवृत्त होणार आणि मी आहेर देत राहू ? माझ्या लग्नाला कोण आलं होतं आणि मी कृपा कारणारा कोण लग्नाला हजर राहून ? ढोंगी बगळे, स्वतःच्या ह्या लाडक्या तत्वज्ञानावर ' तो ' खूष होऊन हसला.

छे ! त्याला एकदम मग उबगच आली. पुन्हा एकवार त्यानं तो पत्रिका पाहिली. फारच आकर्षक छापली होती. काय जरूर होती ? साधी छापून काय लग्नं अडतात? ' भोजनासही यावे ' ...लोकांना काय, बारसं असो नाही तर बारावा असो, फुक्कट जेवायला त्यांचं काय सरतय् ? ती जेवणं, तो पोषाख, ते दागिने...एखाद्या चोरानं संधी साधून सगळं लंपास केलं की बसा कोकलत...परवाच कायसं पेप्रात आलं होतं.

दानवे—लिखितेला ' त्या 'च्या ह्या स्वभावाचं कुतुहल होत. त्याच्या माणूसघाण्या स्वभावाचं एक आकर्षण त्यांना वाटायचं. दोघेही मोठे उस्तादोंके उस्ताद.

कँटीनमध्ये विषय निघायचा—

" टाईम्समध्ये काल वाचलंत तुम्ही ?"

" काय ?" तो. तो ह्यावेळी घरून आलेल्या डब्यातलं केळ दोन्ही टोकाकडून खात असतो. समजा, कुणी अर्धं मागितलंच तर ? आपण कुणाचं घेत नाही आणि कुणाला देत पण नाही. हो !

" फ्रीजच्या किमती वाढणार ह्या बजेटला. " दानवे.

" तुम्ही घेऊन टाका फ्रीज. नाहीतरी तुम्ही लिकर परमीट काढायचं म्हणालात ना परवा ?" लिखिते चावी बळकट करतो.

" माझी इच्छा नाही. कुणी भेट देत असेल तर घेऊ. वीजेचं बील काय येतं ?"

" येईल २५–३० रुपये, अहो वापरावर आहे."

" तर ते बील फ्रीज भेट देणारा भरत असेल तर फ्रीज स्वीकारू. उगीच जागा अडायला नको." तो.

दानवे–लिखिते थंडगार पडलेले असतात. अशा वेळी पोळीचा तुकडा मोडत पागनीस त्यांची बाजू घेतो.

" बरोबर आहे तुमचा मुद्दा. हवाय् कशाला फ्रीज ? घरी बायको–मुलं थंडगार पाणी पिणार आणि आजारी पडणार आणि बिले कोण भरत बसणार डॉक्टरची?" पागनीस.

" बरं बुवा, आम्ही ह्या बोनसला फ्रीज घेऊ, तुम्ही सेलेब्रेट तर करायला याल ?" –दानवेला नवा मुद्दा सुचतो.

पाणी पिण्यासाठी उचललेल्या ग्लासात पागनीसला दिसू लागते...दानवेचा फ्रीज आला आहे. त्यानं बायकोला माहेरी पाठवून कोंबडीचा रस्सा बनविला आहे.


## मुसाफिर

- एस. टी., रेल्वे, एअर लाइन्स तिकिटांची रिझर्वेशन्स मिळवून देऊ.
- सिनेमागृहे व नाटयगृहे ह्यांची तिकिटे मिळवून देऊ.
- धार्मिक-क्षेत्रे व प्रेक्षणीय पर्यटनस्थळे ह्यांच्या प्रासंगिक सहली आयोजित करतो.
- शाळा-कॉलेज, महिला मंडळे, क्लब्स यासाठी संपूर्ण सहली आयोजित केल्या जातील.
- महाबळेश्वर-माथेरान येथील हॉटेल बुकिंग, तसेच स्वतंत्र बंगले वा खोल्या भाड्याने मिळविण्यासाठी व्यवस्था केली जाते.
- मुंबईत अथवा परगावी जाण्यासाठी आलिशान अॅम्बेसेडर गाड्या भाड्याने देऊ.
- आर. टी. ओ टॅक्स, टेलिफोन व इलेक्ट्रिक बिले भरणे व तत्संबंधी कामे केली जातात.

वरील उपलब्ध सेवांसाठी अथवा अधिक माहितीसाठी संपर्क साधा–

**मुसाफिर**

गणेश निवास, गणेश पेठ लेन, खांडके बिल्डींग नं. ९ समोर प्लाझा सिनेमानजिक, दादर, मुंबई २८.
टेलिफोन नंबर ४५८४६७

कार्यालयाची वेळ–सायंकाळी ५ ते ८ फक्त.

परोठे मागविले आहेत. चिल्ड व्हिस्की आहे, बियर आहे. नक्षीकामाचे ग्लास फस फसत आहेत, टू युवर हेल्थ होत आहे..."

अशा वेळी तो उत्तरतो... "येईन मी...बसचं आणि ट्रेनचं भाडं देत असाल तर, उगीच जाण्यायेण्याचा खर्च रुपया, दीड रुपया खर्चून झिंगत पडायला सांगितलंय कुणी. त्यापेक्षा ८ दिवसाची मेथी–माठाची जुडी...आज ताकातली, उद्या पीठ घालून, परवा नुसतीच परतून..."

पागनीसच्या हातातला ग्लास खळकन् खाली पडतो. त्याचं केळं संपलेलं असतं. तूपगुळाचे हात चाटत तो बेसीनकडे गेलेला असतो. त्याची फिरकी घेतल्याबद्दल दानवे, लिखिते व पागनीस स्वतःचीच कीव करत असतात.

"ह्यानं आईस्क्रीम खाल्लंय् का रे कधी ?"

"सिगारेट मिळविण्यासाठी काडेपेटी बाळगणारा हा माणूस."

टेरेलिनचा पहिला शर्ट शिवल्यावर त्याची बायको खूप दिवसांनी मोकळी हसली होती.

"ह्या शर्टात तुम्ही खूप सुंदर दिसता !"

"म्हणजे मी सुंदर नाही असं म्हणायचंय् तुला ?" त्याचा तिरकस विनोद.

"तसं नव्हे, पण आज अगदी राहवलं नाही म्हणून म्हटलं."

"अगं, तुझं वय काय, माझं वय काय ? माणसानं कोणत्या वयात काय करायचं, बोलायचं, ह्याला नियम आहेत, शिस्त आहे."

"मी चुकले बरं." त्याची बायको हिरमुसली होऊन स्टोव्हमध्ये तेल भरायला घरात गेली. त्याला विरोध आवडत नसे हे तिला माहीत होते.

"अगं, हल्ली इस्त्रीचे दर वाढले आहेत. टेरेलिनचा शर्ट घरी धुतला की अंगात अडकवला. काय फायदा असतो ह्या लॉर्ड्वाल्यांना. हरामखोर !" टेरेलिन शर्ट शिवण्यामागील त्याचा रहस्यस्फोट.

घरी, दारी, ऑफिसात, बाजारात लोक त्याला छळत होते. 'त्या'च्या तत्वाला धक्के बसत होते. आयुष्य ही एक चौकट आहे किंवा बे दुणे चारच हे जसे गणित आहे तसं आयुष्य हे आखीव आहे. बुद्धिबळात उंट तिरकाच चालतो तसं माणसानं आयुष्याच्या चौकटीतून चाललं पाहिजे हे त्याचं तत्वज्ञान होतं. लोक तसं वागत नव्हते म्हणून तो त्यांच्यावर संतापत होता. त्याची त्याला चीड येत होती. पण तो रागावत होता म्हणून लोक त्याच्यावर रागावत नव्हते. उलट ही ठरीव आयुष्याची चौकट फोडून बाहेर पडत होते. करंदीकर साधा कारकुंडा, पण हनीमूनला गोव्याला विमानाने गेला होता. लिखिते रिट्झमध्ये पार्ट्या झोडत होता. दानवेने दोन हजारांचा रेडियोग्राम आणला होता ! पागनीस ह्या बोनसला स्कूटर घेण्याची भाष करत होता. सुशिला दररोज नव्या साड्या नेसत होती. अंगावर सेंटच्या बाटल्या उपड्या करत होती. लक्ष्मण शिपायाच्या हातावर नवं घड्याळ दिसत होतं.

मग 'त्या'लाही 'तसं' वाटायचं कधीतरी – उत्तम सूट शिवावा, पहिल्या वर्गाच्या प्रवासाचा आनंद भोगावा, रोमँटिक कादंबऱ्या मागवाव्यात. दररोज तूप-गूळ खाऊन कंटाळलेल्या ओठी लावावे अंड्याचे ऑम्लेट. बायकोला त्या नवीन डिझाईनच्या पाटल्या कराव्यात. पोरांना क्रिकेटचा सेट आणून द्यावा किंवा करताहेत हट्ट तर जाऊ दे त्यांना ट्रीपला. आणि आपणही बायकोला मंगळसूत्राच्या वाट्या उलट्या करून जावे घेऊन मधुचंद्राला पुन्हा कुठेतरी. अगदी चंद्रावरसुद्धा.

आठ दिवसांनी दानवे, लिखिते, पागनीस, करंदीकर लंच टेबलजवळ जमा होतात. 'त्या'ला विचारतात –

'घेतला का हो मिक्सर?'

'तुम्ही 'फ्लाईंग रानी'ने जाणार होता ना?'

'स्मगल्ड गोल्ड हवय् नं तुम्हाला?'

'एवढ्यांत नको' – डब्यात बायको दही द्यायची विसरलेली असते म्हणून त्याचा रक्तदाब वाढलेला असतो.

आज मात्र सारेच त्याच्यावर चिडलेले असतात.

'हा असाच झुरत मरणार.'

'७०० रुपये पगार आहे मुर्दाडाला, पण अळवाच्या फतफत्यापलिकडे पाह्यलंय् काय?'

'अरे ह्याला फुकट पाजली तरी तीर्थासारखी चाटत राहील.'

'मला ह्याच्या बायकोची दया येते रे. कसं करत असेल ती?'

'तो' मात्र डिपार्टमेंटमध्ये आलेला असतो. लक्ष्मण जाग्यावर नसतो. स्वत: पेला भरतो. त्याला लीव्ह फीफ्टी टू घ्यायचं असतं. बाटलीची किंमत वाढलेली असते म्हणून 'तो' झुरत असतो. तरीही 'तो' ते रोज घेत असतो. कारण डॉक्टरांनी सांगितलेले असते 'सहा महिन्यांत नक्की गुण'. आणि फक्त ते घेण्यासाठी तो जगत होता.



जयवंत चुनेकर

# पुस्तके

## ००७५ जनू बांडे

विडंबन आणि उपहास यांचे सहज साधलेले मिश्रण

रहस्यकथा वाचणारा वाचकवर्ग इआन फ्लेमिंग आणि त्याचे वाङ्मयीन अपत्य 'जेम्स बाँड' यांच्याशी चांगलाच परिचित आहे. त्यामुळे 'जनू बांडे' आणि जेम्स बाँड यातील नामसादृश्यावरून 'जनू बांडे' हा जेम्स बाँडचा मराठी अवतार असावा, असा समज कदाचित् निर्माण होण्याची शक्यता आहे. पण जनू बांडे म्हणजे मराठी जेम्स बाँड नव्हे किंवा त्याची भ्रष्ट नक्कलही नव्हे. आणि तरीही जेम्स बाँडच्या कथा वाचताना जितकी उत्सुकता वाटते, जेवढा 'इंटरेस्ट' वाटतो तितकीच उत्सुकता, तेवढाच 'इंटरेस्ट' रमेश मंत्री यांचा हा जनू बांडे वाचताना वाटतो. ह्या जनू बांडेला रहस्यकथेबरोबरच आणखी एक वेगळे परिमाण लाभले आहे आणि ते म्हणजे विनोदाचे. अत्यंत रोचक विनोदाचे. किंबहुना 'जनू बांडे'मध्ये रहस्य गौणच आहे. महत्त्व आहे ते त्यातील विनोदाला.

तसं पाहिला गेलं तर मराठीमध्ये रहस्यकथांचा प्रकार हा काही नवीन नव्हे. पण काही सन्मान्य अपवाद वगळता हा प्रकार समर्थपणे हाताळणारे लेखक फारच थोडे. त्यातून रहस्यकथेच्या बीजाला विनोदाचा पेहराव चढवणे, ही बाब तर कठिणच. रहस्यकथा – विशेषत: जेम्स बाँडसारख्या Romance ने ठासून भरलेल्या – वाचताना, त्यातील अतिमानुषी नायकाची साहसे वाचताना त्या साऱ्याचा विडंबनासाठी फार चांगला उपयोग करून घेता येईल, असे कित्येक वाचकांना वाटले असण्याची शक्यता आहे. सुदैवाने श्री. रमेश मंत्री यांच्यासारख्या विनोदी लेखन करणाऱ्या अलिकडील पिढीच्या लेखकाला हे जाणवले आणि ते त्यांनी समर्थपणे व्यक्तही केले. मराठी विनोदात हा प्रकार निःसंशयपणे नवा. त्या विनोदात ताजेपणा आहे.

माझ्या आठवणीप्रमाणे हा जनू बांडे प्रथम 'मोहिनी'मध्ये अवतरला (मात्र याचा पुस्तकात कुठे उल्लेख केलेला आढळला नाही!) कदाचित त्याच्या त्या फुटकळ स्वरूपामुळे तो वाचकांच्या स्मरणातून गेला असण्याची शक्यता आहे. आता

जनू बांडेच्या त्या कथा ग्रंथनिविष्ट झाल्याने त्यांना एकसंधता आल्यासारखे झाले आहे. त्यांना एक बांधीव स्वरूप लाभले आहे.

## अस्सल जनू

जनू बांडे हा या साऱ्या कथांचा नायक आहे हे उघडपणे आलेच. पण तो कुठेही अतिमानुष वाटत नाही. एखाद्या सामाजिक कथा-कादंबरीतल्याप्रमाणे तो एक साधा माणूस वाटतो. आणि हा साधेपणाच त्याला जेम्सबाँडपेक्षा वेगळेपणा देतो. म्हणूनच सुरुवातीला म्हटले, की जनू हा जेम्स बाँड नव्हे. वा त्याची नक्कलही नव्हे. रहस्यकथेत नायकाने योजलेल्या क्लृप्त्या, शत्रूवर मात करण्यासाठी वापरलेली साधने यांच्या भाऊगर्दीत विनोदाचा वापर एकंदर दुर्मिळच. या ठिकाणी मात्र रहस्याचा पार्श्वभूमीसारखा उपयोग केला आहे, आघाडीवर आहे तो विनोद.

जेम्स बाँड आणि जनू बांडेच्या या कथा यांमध्ये वरवर दिसणारे साम्य पाहिले म्हणजे पहिल्यावरूनच दुसरा उचलला आहे, असे वाटण्याची शक्यता निर्माण होते. बाँड कथांमध्ये प्रत्येक प्रकरणात त्याची एकेक मैत्रीण असते – तशी जनूचीही आहे, तिथे हेरखात्याचा प्रमुख 'एम' आहे – तसा इथे 'ण' आहे, तिथे फिलीक्स लिटर आहे – तसा इथे छबकडचा आहे. पण त्यांची चित्रणे मात्र इतकी भिन्न आहेत की हे साधर्म्य इथेच संपावे. त्या व्यक्तिरेखांची ही नावेच जरी पाहिली तरी लेखकाचा त्या उभ्या करण्यामागचा हेतू तेव्हाच लक्षात येतो.

या संग्रहात एकूण दहा कथा आहेत आणि त्या प्रत्येकीत रहस्य आहे. ते उलगडण्यासाठी जनू बांडेची नेमणूक करण्यात आली आहे. रहस्यविषय अत्यंत गंभीर स्वरुपाचा, महत्त्वाचाच असतो. पण ते रहस्य उलगडताना (श्री. मंत्री यांनी निर्माण केलेल्या) ज्या Situations मधून जनू जातो, त्यामुळे या रहस्याचे रूप त्याचा चेहरामोहराच पार बदलून जातो. आणि मग अंगावर काटा आणणाऱ्या, गूढ रहस्याऐवजी मागे उरतो तो निव्वळ विनोद. हलका फुलका, मनसोक्त हसविणारा! एरव्ही रहस्यकथेत, ती वाचत असताना मनावरचा ताण वाढत राहतो. जनू बांडेच्या कथा वाचताना मात्र हा ताण अनुभवावा लागत नाही. आणि तरीही त्यातल्या रहस्याबद्दलची उत्सुकता वाढतच राहते. यासाठी कोणत्या एकाच विशिष्ट कथेचे उदाहरण द्यायला हवे असे नाही. कारण बहुतांश कथांच्या वाचनानंतर येणाऱ्या अनुभवांचा तो एक अविभाज्य घटक आहे. एखाददुसऱ्या विशिष्टकथेचाच उल्लेख हवा असेल तर 'ताजमहालवर बाँब' किंवा 'विलक्षण शस्त्रक्रिया-मेंदूची अदलाबदल' या कथांचा करता येईल. त्यातही 'ताजमहालवर बाँब' या कथेतल्या रहस्याचा 'बनाव'टपणा हा या प्रकाराचा कळस आहे. आपल्या 'प्रेक्षणीय' मुलीचं लग्न जनूशी व्हावं अशी हेरखात्याच्या प्रमुखाची इच्छा असल्याने, जनूला बढती मिळावी व त्यासाठी त्याला एक उत्तम (!) कामगिरी सांगावी, यासाठीच केवळ ताजमहालवर बाँब टाकण्याचा बनाव घडवून आणण्यात

येतो. म्हणजे जनू या कामगिरीत यशस्वी व्हावा अशी योजना पहिल्यापासूनच तयार ठेवण्यात येते !

या संग्रहातल्या पहिल्या कथेबद्दलही असेच म्हणता येईल. जनूची ओळख रमेश मंत्री यांनी करून दिली आहे तीच मुळी मोठ्या खुबीदारपणे. वास्तविक अतिशय साध्या सरळ भाषेत जनूचे वर्णन केले आहे. पण हा साधेपणाच नेमका विनोद निर्मितीस कारण होतो. उदाहरणार्थ, हे वर्णन पाहा : जनू बांडे गुप्तहेर होईल असे खुद्द त्यालासुद्धा वाटले नव्हते. कारण त्याने ही बातमी स्वत:पासूनसुद्धा गुप्त ठेवली होती. गुप्तहेर खात्यात या कानाची बातमी त्या कानाला कळता कामा नये, आणि एक हात काय करतो, ते दुसऱ्या हाताला कळता कामा नये, असा शिरस्ता असतो. त्यामुळे जनू बांडेला एका कानानेच ऐकण्याची सवय करून घ्यावी लागली. तो मोटारसुद्धा एकाच हाताने चालवीत असे. कारण त्याच्याबरोबर मोटारीतून प्रवास करणाऱ्या सुंदर तरुणीला कुरवाळण्यासाठी त्याला दुसरा हात रिकामा ठेवावा लागत असे.' हे सारेच सरळ वर्णन आहे. पण ते ज्या ढंगाने केले आहे तो ढंग मात्र खास वेगळा आहे. या कथेतले रहस्य आहे जागतिक महत्त्वाच्या राजकीय नेत्याच्या खुनाच्या कटांचे. त्याचे धागेदोरे उकलण्यासाठी जनू येतो आणि प्रत्यक्षात विश्वसुंदरीच्या (काल्पनिक) खुनाच्या कटाचा मागोवा घेतो! हा सर्वच प्रकार मनसोक्त हसवणारा आहे, हे आणखी स्पष्टपणे सांगण्याची गरज नाही.

## कमालीची सहजता

मंत्री यांच्या या साऱ्याच लेखात एक कमालीची सहजता आहे. त्यांच्या लेखनात, याचा मला अभिप्रेत असलेला अर्थ म्हणजे त्यांच्या विनोदात. यातला विनोद किंवा विनोद निर्मितीसाठी योजलेली पात्रे—प्रसंग ('पंतप्रधान, अशीतशीचा जनूशी सामना' या कथेचा अपवाद वगळता) अ–कृत्रिम आहेत. मंत्री यांनी आपल्या या लेखनात रहस्यकथेचा बाज कुठेही सोडलेला नाही आणि तरीही तिच्यातल्या हलक्याफुलक्या विनोदाचे स्वरूप कुठे हीन पातळीवर येत नाही. विनोदी लेखनात, लेखक कच्चा असेल तर उथळपणाचा, हीन दर्जाचा विनोद करण्याचा मोह होण्याचा फार मोठा संभव असतो. म्हणून या बाबीचा आवर्जून उल्लेख! अशा रहस्यकथांत नेहमीच येणारा साधनांचा, क्लृप्त्यांचा तपशील मंत्री पकडून ठेवतात. पण त्याला विडंबन आणि उपहास यांची जोड दिल्याने त्या तपशिलाला एक वेगळेच परिमाण लाभते. उदाहरणार्थ : होटेलातील आपल्या राहत्या जागेचे जनू गुप्तहेराच्या पद्धतीनुसार निरीक्षण, तपासणी करतो. यांत्रिक साधनांची फोडतोड करतो. अशातच त्याला एक सूचना दिसते म्हणून तो तपासणी थांबवतो : 'या खोलीत ठेवलेले टेपरेकार्डर, ट्रान्समिटर, कॅमेरे वगैरेची मोडतोड करण्याची पॅसेंजर्सची प्रवृत्ती आहे, असे आढळून आले आहे. गुप्त-हेरांनी तीनपेक्षा अशा अधिक यंत्रांची मोडतोड करू नये अशी नम्र विनंती आहे.'



ही पहा-
कपडे धुण्यासाठीं
डिटर्जंट शक्तिशाली वडी
कपडे कितीहि चोळले तरी स्वच्छ निघतच नाहीत मुळी. मला वाटतं, या पाण्यामुळें होत असावं असं.
अग, पण मी याच पाण्याने धुते ना कपडे ? मग माझे कपडे कसे स्वच्छ निघतात? हां, पण मी साबण मात्र वापरीत नाही.
असं ! मग वापरतेस तरी काय तू !
आता मिळू लागलेली डेट डिटर्जंट वडी.
काय असतं तीत एवढं ?
तिच्यात असते डिटर्जंट शक्ति. तिनं फेस तर चांगला येतोच पण शिवाय साबणापेक्षा ती कितीतरी प्रभावी असते. तिनं कपडे स्वच्छ नि उजळ निघतात. नीळ किंवा इतर तसलं काही वापरण्याची आवश्यकता नसते.
अगदी खरं ! डेट डिटर्जंट वडीने साबणापेक्षा दीडपट कपडे धुतले जातात. त्यामुळे तिचा वापर करणं खूप काटकसरीचं होतं !
NEW! def
डेट डिटर्जंट वडी
५०% कपडे अधिक धुणारी
अन् तेही साबणापेक्षा अधिक शुभ्र.
पाणी कसेहि असो—अगदीं क्षारयुक्त असलें तरी !
स्वस्तिक ऑईल मिल्स्, मुंबई

सहजता हा श्री. मंत्री यांच्या या विनोदाचा एक विशेष सांगितलाच. पण आणखीही एक महत्त्वाचा विशेष आहे. (आणि इतका महत्त्वाचा आहे, की खरे तर तो यापूर्वीच सांगायला हवा होता.) हा विनोद सहज आहे हे तर खरेच, पण त्याची जात ढोबळ नाही. तो Subtle नाही, पण विडंबन (Parody) आणि उपहास (Satire) यांचे लीलया साधलेले मिश्रण मात्र त्यात आहे. आणि ते रहस्यकथेसारख्या विनोद मूलतःच नाकारणाऱ्या कथा प्रकारात चपखलपणे वापरले आहे, हे श्री. मंत्री यांचे मोठे यश आहे.

## परदेशी वातावरणाची पार्श्वभूमी

उपहास हा एखाद्या व्यक्तीबद्दल असला तर तो बोचरा होण्याची, त्या विनोदाला हीनता येण्याची शक्यता असते. पण तो प्रवृत्तींबद्दल असला, तर मात्र त्यातून निर्माण होणारा विनोद अधिक मोकळेपणाने, उदारपणाने भोगता येतो. एका विशिष्ट वातावरणाशी हा विनोद सतत बांधून ठेवल्यामुळे तो एखादा अपवाद वगळता, उथळ वाटत नाही. हे विशिष्ट वातावरण म्हणजे रहस्याचे होय. खेरीज बहुतेक कथांतून घटनांना जी पार्श्वभूमी दिली गेली आहे ती आहे परदेशी वातावरणाची. सर्वसामान्य वाचकाला त्याची कल्पना नसते, तिथल्या स्थळांची आचारविचारांची कल्पना नसते. त्याला काही ठराविक गावे-नावे माहीत असतात. मंत्री परदेशी वातावरणात राहिले असल्याने त्यांनी आपल्या सूक्ष्म दृष्टीने टिपलेल्या तिथल्या वैशिष्ट्यांचे, स्थळांच्या नावांचे, व्यक्तींच्या नावांचे, बेमालूम विडंबन केले आहे. या दृष्टीने या संग्रहातील सर्वच कथांतील स्थळांची, व्यक्तींची नावे पाहावी. (यालाही पुन्हा अपवाद 'पंतप्रधान अशीतशीचा जनूशी सामना' या कथेचा.) या दृष्टीने 'हॉलीवूडमध्ये जनू बांडे' या कथेचे वाचन करावे. अमेरिकेच्या फिल्मी दुनियेबद्दल (आणि एकंदरच अमेरिकन संस्कृतीबद्दल) आपण खूप काही (खरे-खोटे, बरे-वाईट) ऐकलेले असते. ह्या दुनियेतल्या व्यक्ती-प्रवृत्ती यांचे मंत्री यांनी अत्यंत सहजपणाने चित्रण केले आहे. Exaggeration आणि वास्तव यांचे बेमालूम मिश्रण केले आहे. त्यासाठी त्यांनी बिनदिक्कतपणे फ्रँक सिनात्रा, एलिझाबेथ टेलर, रिचर्ड बर्टन यांसारख्या बड्याबड्या व्यक्तींनाही वेठीस धरले आहे. मात्र त्यांच्याबद्दल कुठेही अनुदारता न दाखवता ! आणि हे अधिक महत्त्वाचे. या सगळ्याबरोबरच भारतीय जीवनातील प्रवृत्तींचाही उपहास त्यामध्ये आहे. योगी, योगसाधना आणि त्यामागचे फॅड हे मंत्री यांचे येथे लक्ष्य आहे. कथेच्या अखेरीस असलेल्या परिच्छेदातून तर अमेरिकन जीवनातील चांचल्य, वेग यांचा उपहास अधिकच भेदक होतो !

'छबकड्या' हा जनूचा सहकारी (!), मात्र तो या कथात फक्त दोनदाच लुडबुडतो ! छबकड्याची रमेश मंत्री यांनी करून दिलेली ओळख म्हणजे आपल्या सर्वांना चिरपरिचित मत्री माहात्म्याचा प्रचंड उपहास आहे ! मात्र इथेही तो कोणा

एका व्यक्तीचा नसून त्याचे लक्ष्य आहे, ते 'प्रवृत्ती.' शेवटची 'विश्वबंधुत्वाविरुद्ध जनू बांडेचा सामना' ही संपूर्ण कथाच एका महान तत्त्वाचा तीव्र असा उपहास आहे! त्यातही जनूच्या खात्याचे प्रमुख 'ण' ज्या प्रकारे आणि ज्या पातळीवर 'विश्वबंधुत्वा'चे विश्लेषण करतात, ते अत्यंत भेदक आहे.

'जनू बांडे'च्या या कथांत वापरलेल्या तपशिलासंबंधी अधिक विस्तृतपणे सांगण्याची आवश्यकता आहे, असे वाटत नाही. श्री. मंत्री यांनी कथा खुलवण्यासाठी रहस्यकथेला आवश्यक तो बारीकसारीक तपशीलही चतुराईने वापरला आहे हे प्राय: प्रत्येक कथेच्या वाचनानंतर लक्षात यायला हरकत नाही. हा तपशील वापरताना Exaggeration चाच उपयोग त्यांनी केला आहे. पण तो या साऱ्याच कथांचा जो बाज त्याला पूरकच ठरतो. याची एकदोन उदाहरणं द्यायला हरकत नाही. पहिलीच कथा घ्या भारतीय विश्वसुंदरीचा खून होणार या कल्पनेनं पछाडलेला जनू 'त्या' ठिकाणी जमलेल्या प्रत्येक विश्वसुंदरीलाच (ती गुप्तहेर आहे असे समजून) सरळ सरळ विचारतो, 'तुम्ही आमच्या सुंदरीचा खून करणार आहात काय?' आणखी एका कथेत ('कंबक्ती देशातील क्रांति') जनूचा माग काढत एक अरब येतो, त्याचा खून करण्याच्या उद्देशाने. त्याला जनू अगदी 'निक्षून' सांगतो, 'मारेकऱ्या! चालता हो; नाहीतर माझ्या गोळीला बळी पडलासच म्हणून समज' आणि तो अरब याबरोबर भेदरून जातो व काढता पाय घेतो!

## सरवटे यांची करामत

या पुस्तकाच्या बाबतीत आणखी एका गोष्टीचीही दखल घेणे आवश्यक आहे, अन्यथा त्या पुस्तकावर तो अन्याय ठरेल. रमेश मंत्री यांनी शब्दात काढलेले जनू बांडेचे हे अविस्मरणीय Caricature–उपहासचित्र श्री. वसत सरवटे यांनी अधिक 'देखणे' केले आहे. श्री. सरवटे यांच्या चित्ररेखाटणांनी या पुस्तकाच्या एकदर स्वरूपात अधिक भरच टाकली आहे. श्री. मंत्री यांचा विनोद जेवढा सहजोद्भव वाटतो तेवढाच श्री. सरवटे यांनी चित्रबद्ध केलेला जनूही जिवत वाटतो. इतका, की त्याविना या पुस्तकात एक मोठी उणीव भासावी!

सुरुवातीसच सांगितल्याप्रमाणे श्री. मंत्री यांनी मराठी विनोदाचे या पुस्तकात घडवलेले नवे दर्शन आणि श्री. सरवटे यांची त्याला लाभलेली चित्रांची जोड यामुळे '०००५ जनू बांडे' हे पुस्तक निश्चितपणे वाचनीय झाले आहे आणि त्याने दर्जेदार विनोदी वाङ्मयात भर घातली आहे, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. ◻

'०००५ जनू बांडे' : रमेश मंत्री : मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई : कि. रु. १२॥.



# बर्मी फ्रंट

लेखांक : सहा

कर्नल आ. भा. जाधव

इवेलेच्या पूर्वेला सुमारे पाच मैलावर असलेल्या मिनेवा गावावर आज मोठ्या प्रमाणात हल्ला चढवण्याचं ठरलं. या एकाच गावावर हा हल्ला होणार नसून त्याला जोडूनच असलेल्या कोक्को आणि त्याच्या शेजारच्या बीन नावी गावावरही व्हायचा आहे. दुष्मनने या भागात चांगला तगडा डिफेन्स लावला आहे. सर्व प्रकारची पायदळ पलटणींची हत्यारे, तोफखाना, एवढेच नव्हे तर टँकर्सना बरबाद करणाऱ्या मोठ्या तोफाही डागल्या असून अँटीटँक आणि अँटी पर्सनेल माईंस सुद्धा चौफेर पेरल्या आहेत. दुष्मनची संख्या दीड हजारावर आहे.

इतक्या बलशाली सेनेबरोबर लढा देण्यासाठी आमच्या फौजेलाही तशीच पक्की तयारी करणं क्रमप्राप्त होतं. ही झुंज अहोरात्र ४८ तास चालेल व त्यासाठी मोठी किंमत द्यावी लागेल असा आमच्या डिव्हिजन कमांडरचा कयास होता.

आमची सेना जय्यत तयारीनिशी निघाली. या हल्ल्यात आर. ए. सी.चा टँक स्क्वाड्रन आणि सेवंथ लाईट कॅव्हलरीचा एक असे दोन टँक स्क्वाड्रन भाग घेणार आहेत. पायदळातर्फे गुरखा रायफल्स, राजपुताना रायफल्स आणि रॉयल केंटस या तीन पलटणी लढणार आहेत. या व्यतिरिक्त सबंध डिव्हिजनचा तोफखाना दिमतीला हजर असून हवाई जहाजेही बाँब वर्षाव करायला सज्ज आहेत.

ठरलेल्या वेळेला हरीकेन बाँबर्सनी शत्रूच्या डिफेन्सवर बाँब टाकले. त्यानंतर तोफखाना आपल्या प्रचंड गोळ्यांनी आस्मानात आणि धरतीवर आवाज घुमवू लागला. ठिकठिकाणी आगी लागल्या. धुराचे लोट गगनाला जाऊन भिडले. आर. ए. सी.च्या 'सी' स्क्वाड्रनची 'ली' टँक्स तिन्ही गावावर प्रत्येकी एक ट्रूप व बरोबर आमच्या कंपनीचे प्लटून याप्रमाणे चाल करून मोक्याच्या जागा धुंडून दुष्मनच्या बंकरवर मारा करू लागली.

सेवंथ कॅव्हलरीची चपळ स्टुअर्ट टँक्स (लाईट टँक्स) दुष्मनच्या पिछाडीला जाऊन पिसाटासारखी इकडून तिकडे त्याच्या गोटात शिरून गोळ्या झाडू लागली.

राजपुताना रायफल्सनी मिनेवावर आणि गुरख्यांनी कोक्कोवर एकाच वेळी हल्ला चढवला. या दोन्ही पलटणींची फत्ते झाल्यावर दोन्ही गावामधून जाऊन केंटस बिननावी गावावर हल्ला चढवणार होती.

तीन तास घनघोर संग्राम चालला. कोणाचा पायपोस कोणात राहिला नाही. कोण, कोठे, काय करत आहे याचा थोडावेळ पत्ताच लागेना. मिनिवा – कोक्कोचे अक्षरश: पानिपत झाले. दोन्ही सेनांचे अपरिमित नुकसान झाले. दुष्मनाच्या पिछाडीला हैदोस घालणारी दोन स्टुअर्ट टँक्स अँटीटँक माईन्सवरून गेली. त्या फुटल्यावर ही दोन्ही टँक्स बरबाद झाली. त्यातील एक तर पेट्रोल पेटल्यामुळे जळून गेले.

टँकचे चार सवार आतल्या आत भाजून खलास झाले. दुसऱ्या टँकचे दोन सवार गतप्राण झाले. दोन री टँक्सही बरबाद झाली. त्यांचे पाच सवार जखमी झाले.

दुपार झाली तसा युद्धाचा जोर थोडा कमी झाला. चारी बाजूने बेजार झालेल्या दुष्मनाची त्रेधा तिरपीट उडाली. जेवढी ताकद होती ती त्याने सारी खर्च करून पाहिली पण जेव्हा इलाज चालेना तेव्हा तो आपली जागा सोडून सैरावैरा धावू लागला. त्याचे कैक जवान मारले गेले. बरेच जखमी झाले. थोड्यांनी हत्यार टाकून हात वर केले.

सायंकाळी पाच वाजता तिन्ही गावांचा कब्जा आमच्या सेनेच्या हाती आला. सर्व कारभार आटपल्यावर आढावा घेतला तेव्हा आढळून आले की या लढाईत आमच्या सेनेचे ९८ जवान मारले गेले. १२५ जखमी झाले. दुष्मनाची ३०० प्रेते मोजली गेली. ४५ कैदी पकडले. जखमींचा अंदाज लागला नाही.

आजचे युद्ध इतक्या लवकर आटपेल असं वाटलं नव्हतं.

---

## २६ फेब्रुवारी ४५ — मुंज : ८

---

काल फत्ते झाल्याबरोबर रातोरात आजच्या हल्ल्याची तयारी करण्यात आली. मध्यरात्री ब्रिगेड हेडक्वार्टर्समधून हुकूम आला की आज सकाळी मिनेवाच्या दक्षिणेला असलेल्या नियाँन गाँन व चांगीवा या गावावर एकाचवेळी दोन स्वतंत्र हल्ले चढवायचे. या दोन गावांमधून चाँग हा २५ फूट रुंदीचा नाला पूर्व-पश्चिम वहातो व पुढे तो इरावतीला मिळतो. हा नाला टँक ऑबस्टीकल असल्यामुळे टँक्स पार करण्यासाठी ब्रिजींग टँकची आवश्यकता होती. ब्रिजींग टँक येऊन पूल बनेपर्यंत काही वेळेचा अवधी लागणार होता. पण डिव्हिजनल कमांडरला शक्य तो कमी वेळात सर्व कामे होऊन पाहिजे होती. याचं मुख्य कारण म्हणजे, धांदल उडालेल्या शत्रूला जुळवाजुळव करायला सवड मिळू नये.

रात्री ब्रिजींग टँक नाल्यात आणून ब्रिज फिट करून पहाटे सूर्योदयाबरोबर टँक्स नाला पार करून गेली.

या हल्ल्यात बलूच पलटण, 'सी' स्क्वाड्रनची दोन टँक्सट्रूप्स व आमची दोन प्लटून्स भाग घेणार होती.

नियाँन गाँनकडे एक टँक्स ट्रूप, मेजर डनलॉपबरोबर आमची एक प्लटून आणि बलूचच्या दोन कंपन्या पहाटे साडेपाच वाजता रवाना झाल्या. व चांगीवाकडे उरलेले टँक ट्रूप, माझे प्लटून आणि बलूचच्या दोन कंपन्यांनी कूच केले.

गावाजवळ येताच ट्रूप कमांडर लेफ्टनंट रॉनी रॉबर्टचे टँक एका भल्या दांडग्या खड्ड्यांत फसले. रॉबर्ट टँकमधून बाहेर आला. त्याचे सवार व माझ्या प्लटूनचा

एक सेक्शन टँक बाहेर काढायच्या कामावर लागले. उरलेले दोन सेक्शन्स मी या टोळीला संरक्षण देण्यासाठी डिफेन्समध्ये लावले. अपेक्षेप्रमाणे दुष्मनचे स्नायपर्स टँकचे काम करणाऱ्या टोळीवर गोळ्या झाडू लागले. तशातूनच न डरता ही टोळी झपाट्याने खड्डा रुंद करायचे काम उरकत होती. या अवधीत टँकचा एक व माझे तीन जवान जखमी झाले. आमचे जवान दिसेल त्या स्नायपरवर मारा करतच होते. आता रॉबर्ट व मीही फावडी घेऊन कामाला लागलो. इतक्यात दुष्मनने डिसचार्जर कपमधून सोडलेले एक ग्रिनेड आमच्या टोळीच्या जवळ येऊन फुटले. त्यातील एक तुकडा रॉबर्टच्या पाठीत घुसला. तरी पठ्ठ्याने काम तसेच जारी ठेवले. जखमेतून रक्तस्राव होतच होता. त्याला पट्टी बांधून मी म्हटलं

—"रॉनी यू गो टू दि रेजिमेंटल एड पोस्ट
वीथ माय ऑर्डर्ली. आय विल कंप्लीट दि जॉब."

पण त्यानं ऐकलं नाही. तशाच घायाळ स्थितीत जिद्दीने काम केलं; टँक खड्या-बाहेर काढून ज्या बाजूने दुष्मनच्या गोळ्या येत होत्या त्या बंकरवर टँक चढवून तो बरबाद केला.

मी रॉबर्टजवळ जावून पाहिलं तर मोठ्या मुष्कीलीनं तो श्वासोच्छवास करत होता. आता मात्र त्याचं काही न ऐकता मी त्याची रवानगी एम. डी. अेस. ला (मेन ड्रेसिंग स्टेशन) केली.

आता आजूबाजूच्या बंकर्समधून मशीनगन व रायफलचा गोळीबार सुरू झाला. टँकनी जागा पकडून गन्स व ब्राऊनिंगचा फायर सुरू केला. त्यांच्या स्पोर्टमध्ये बलूचच्या कंपन्या पुढे सरसावल्या व त्यांनी चांगीवावर हल्ला चढवला. या संग्रामात नायक मथुराच्या सेक्शनमधील दोन जवान शत्रूच्या मशीनगनच्या गोळ्यांना बळी पडले. बलुचींनी हल्ला तसाच पुढे रेटत नेऊन शत्रूला पूर्वेकडे पळवले.

संध्याकाळी सात वाजता आम्ही हारबरला परतलो. माझे दोन व डनलॉपचे तीन असे पांच जवान गमावून आम्ही आलो होतो.

आज 'होळीचा सण'. आमचे जाट जवान हा सण मोठ्या धूमधडाक्यात साजरा करतात. आज गोड खीर, हलवा वगैरे मिष्टान्न खायचे, लखमीचंद, टेक-चंद वगैरेंच्या रागिण्या गायच्या वगैरे बेत त्यांनी काल संध्याकाळी रचले होते. पण आज सकाळीच कामगिरी लागली. त्यातून या सणाच्या दिवशी आम्ही पाच जवान गमावले. लंगरमध्ये गोड खीर बनावली होती, पण कोणी खाल्ली नाही.

पाडव्याला आपण उंच गुढ्या उभारतो. आजही आम्ही चांगीवावर आमच्या बांधवांचं बलिदान देऊन विजयाचा झेंडा लावला. पण कुणाचा? आमचा? छे. आम्हाला कुठं निशाण आहे? खरंच केंव्हां आम्ही, आमचें, अगदी खास आमचे म्हणून समजले जाणारे निशाण देशावर फडकवणार? आणि ते लावतेवेळी इतकेच काय पण यांच्या शतपट रक्त सांडायलाही आम्हाला अभिमान वाटेल. आणि ज्या

दिवशी आमचं हक्काचं निशाण हिंदभूमीवर ताठ मान करून मोठ्या दिमाखानं आस्मानात राहील तोच आमचा पाडवा.

## २७ फेब्रुवारी ४५

आज सकाळी सेथी या चांगीवाच्या दक्षिणेला असलेल्या गावावर हल्ला करण्याचा हुकूम मिळाला. सर्व तयारी करून निघणार इतक्यात तेथून दुष्मन पळाल्याची खबर आली. राजपुताना रायफलसच्या पलटणीने या गावात डिफेन्स घेतला. मी पॅडी ओकॉनर व बटस सेथीत चक्कर मारून आलो. येथ मोठमोठे पगोडे आणि मंदिरे आहेत. पगोड्यावरचे नक्षीकाम अप्रतिम आहे. आत ध्यानस्थ बसलेल्या बुद्धाचे भव्य पुतळे आहेत. संध्याकाळी ह्वारबर सेथीला हलवल.

## २८ फेब्रुवारी ४५

परवा दिवशी रॉनी रॉबर्ट एम. डी. एस. ला पोचताच तो फार सीरियस असल्यामुळे त्याला ताबडतोब विमानाने कोमिल्ला हॉस्पिटलमध्ये पाठवले. त्याच्या लंग्जला जखम झाली. दोन बरगड्याही तुटल्या आहेत. त्याला कोमिल्लाला पोचायला एक तास जरी उशीर झाला असता तरी तो वाचला नसता असे एम.डी. एस. चा डॉक्टर कॅप्टन चॅटर्जी म्हणत होता.

आज मी रॉनीला पत्र लिहिलं.

## १ मार्च ४५ · झुंज : ९

डनलॉपचा ताप आज नॉर्मल झाला. पण अशक्तपणा बराच आला आहे. न्यूमनने त्याला आणखी तीन दिवस बंकरच्या बाहेर न पडण्याची ताकीद दिली आहे.

येदाँ या सेथीच्या दक्षिणेला सात मैल अंतरावर असलेल्या गावावर आज राजपुताना रायफल्स हल्ला चढवणार आहे. मदतीला टँकची दोन ट्रूप्स व आमची दोन प्लॅटून्स आहेत.

या हल्ल्यात आमचे काम सोपे आहे. येदाँपासून ३०० यार्डावर टँक्स मोक्याच्या जागा पकडून गावावर झीरो आवरच्या पूर्वी साडेदहा ते साडेअकरा गोळ्यांचा वर्षाव करणार. शत्रूच्या टोळीने टँकवर अँटी टँक ग्रिनेड, मोलोटॉव्ह कॉकटेल वगैरे

फेकू नये म्हणून आमच्या प्लॅटून्सनी बचावासाठी त्यांच्याभोवती कडे केले आहे. टँकनी आपली कामगिरी चोख बजावली.

ठीक साडे अकरा वाजता 'राज रिफ'ने स्टार्ट लाईन क्रॉस केली. त्या उघडचा मैदानातून दुष्मनच्या गोळयांची तमा न बाळगता बेदरकारपणे तो तमाम जवानांचा दर्या धीमेपणाने पुढे पुढे सरकत होता. त्यांची चढाई एखाद्या पंख पसरलेल्या गरुडासारखी चालली होती. प्रत्येक नेता आपआपल्या टोळया मोठ्या कुशलतेने पुढे पुढे नेत होता. 'बोलो श्री रामचंद्र की जय'चा गगनाला जाऊन भिडणारा जयघोष करत संगीनी रोखून जमिनीवर हुकूमत गाजवत डोळयात अंगार चेतवलेले मिशांना पीळ भरलेले, ताठ कण्याचे ते शूर राजपूत दुष्मनवर तुटून पडताना पाहून माझ्या शरीरावर रोमांच उभे राहिले. येदाँ फत्ते झाले.

## २ मार्च ४५ झुंज : १०

नंबर सिक्स्टीटू ब्रिगेड हेडक्वार्टर्स काल संध्याकाळी येदाँला आले. दोन टँक ट्रूप्स आणि आमची दोन प्लटून्स यांना आज सकाळी सात वाजता ब्रिगेड हेड-क्वार्टर्सला रिपोर्ट करण्याचा आदेश मिळाला.

तेथे गेल्यावर समजले की, गुरखा रायफल्सची एक पलटण टँक्स व आमच्या प्लटून्सच्या सहाय्याने टाँजी आणि येलेवर हल्ला चढवणार आहे. फत्ते झाल्यावर शत्रूला तसाच पुढे साग्येटकॉनपर्यंत रेटत नेण्याचा विचार आहे. डिव्हिजनचा तोफ-खाना आणि हरीकेन बॉम्बर स्क्वाड्रन इतर कामगिऱ्यात गुंतले असल्यामुळे हे भिडू आमच्या खेळात भाग घेणार नव्हते.

टाँजी आणि येलेच्यामधून पूर्व-पश्चिम एक चाँग वहातो. नाला पार करायला टँक्सना कोणती सोयीची जागा आहे हे पाहण्यासाठी लेफ्टनंट बेटस, मी आणि गुरखा पलटणचे पायोनियर प्लटून कमांडर सुभेदार वीरबहादूर गुरुंग, चार जवानां-सह एक रेक्की पेट्रोल घेऊन चाँगवर गेलो.

येदाँच्या दक्षिणेला येलेच्या टप्प्याबाहेर गुरुंगच्या कन्सल्टेशनने बेटसने दोन जागा हेरल्या. थोडयाशा खटपटीने येथून टँक्स नाला पार करू शकत होती. गुरुंगने ताबडतोब पायोनियर प्लटून (या प्लटूनमधील जवान छोटी मोठी कन्स्ट्रक्शन, डिस्ट्रक्शन, पाणीपुरवठा, माईन्स लावणे, काढणे वगैरे प्रकारची छोटी छोटी इंजीनियरिंगची कामे करण्यात ट्रेंड केलेली असतात. प्रत्येक पायदळ पलटणीत अशा प्रकारचे एक प्लटन असते.) पुढे आणून कामाला सुरुवात केली. जरूर पडेल तेथे बेटसने दिग्दर्शन केले.

साडेनऊ वाजेपर्यंत बेटसचे टँक ट्रूप आणि माझे एक प्लटून चाँग पार करून

येलेपासून सुमारे ७०० यार्डावर दाट झाडींत लपून पोझिशन घेऊन बसले. त्याचप्रमाणे ओकॉनरचे टँक ट्रूप आणि आमचे दुसरे प्लटून टाँजीच्या वायव्येला दबा धरून बसले.

गुरख्यांच्या दोन रायफल कंपन्यांनी लेफ्ट हूक घेऊन ठीक १० वाजता स्टार्ट लाईन पार करून उत्तरेकडून टाँजीवर हल्ला चढवायला सुरुवात केली. आमच्या टँकच्या तोफा, ब्राऊनिंग गन्स आणि गुरख्यांच्या थ्री इंच मॉर्टर व मशिनगन्सनी फायर सपोर्ट द्यायला सुरुवात केली. गुरखे ' जय गुरखाली 'च्या डरकाळ्या फोडत पुढे जात होते. ते टाँजीपासून तीनशे पावलांवर येईपर्यंत शत्रूने एकही गोळी फायर केली नाही. आणि त्यानंतर त्याने एकदम साऱ्या ॲटोमॅटिक वेपन्स, रायफली, डिस्चार्जर ग्रिनेडस वगैरे फायर अक्षरशः पावसासारखा पाडला. डोळ्याचं पातं लवतं न लवतं तेवढ्यात गुरख्यांचे तीस-चाळीस जवान धारातीर्थी पडले. त्यांचा ॲडवान्स स्थगित झाला. दुष्मनने आमच्या टँक ट्रूप्सवरही गोळाबारी सुरू केली.

ओकॉनरने त्याचे ट्रूप शत्रूच्या बंकर्सवर फायर करत पुढे काढले. माझे प्लटूनही पुढे चालले. टँक्सनी दुष्मनचे चार बंकर्स फोडून काढले. गोळ्यांचा वर्षाव पाडला. बेटसचे ट्रूपही टाँजीवर पश्चिमेकडून चालून गेले. या झुंजीत माझे पाच जवान धारातीर्थी पडले व आठ जखमी झाले. झाडावर, घरांच्या छतावरून बसलेले स्नायपार्स जमिनीवरून सरपटणाऱ्या आमच्या सेनेला व्यवस्थित नेम घेऊन टिपत होते. तशाच स्थितीत सारे गुरखे उठले. कुकऱ्या हातांत घेऊन आमच्या टँकच्या बरोबरीने पुढे चालून ते दुष्मनवर तुटून पडले. जागजागी कुकऱ्या, संगिनीसह हँड टू हँड फाईट सुरू झाली. ग्रिनेडस फुटून सैनिक गारद होऊ लागले. आगी लागून बंकर, भांडारे जळू लागली. टाँजी हस्तगत होताच गुरख्यांच्या दुसऱ्या दोन रायफल्स कंपन्या येलेवर चालून गेल्या. तेथेही मोर्चामोर्चात घुसून त्यांनी दुष्मन कापून काढला नि येलेवर कबजा केला. येले काबीज होताच ओकॉनरचे टँक ट्रूप व माझे प्लटून सॅग्येटकॉनमध्ये गेले. तेथे दबा धरून बसलेला शत्रू हुसकून काढून त्याचे पारिपत्य केले.

या सबंध लढाईत दुष्मन पळाला नाही. त्यानं शेवटची गोळी, शेवटचा जवान अशी निकराची लढत दिली. या लढाईत दुष्मनचे दोनशेवर जवान मारले गेले. गुरख्यांचे ४५ मारले गेले. ६० वर जखमी झाले. माझ्या कंपनीचे ६ मारले गेले व १३ जखमी झाले.

या संग्रामात हवालदार मोलूराम, नाईक समुद्रसिंग आणि हवालदार दर्यासिंगनी खूप शौर्य गाजवले. मोलूने रायफल आणि इक्वीपमेंट फेकून दुष्मनचा फायर होत असताना रणांगणावरून प्रत्येक वेळी एक असे तेथे तडफडत असलेले तीन घायाळ जवान मागे आणले.

एका झाडाच्या मोठ्या खोडातल्या पोकळीत बसलेल्या व ग्रिनेड फेकणाऱ्या

दुष्मनच्या स्नायपरला त्याच्या ग्रिनेडची वा बंदुकीच्या गोळीची पर्वा न करता समुद्रसिंग त्या झाडाजवळ गेला आणि पोकळीत ग्रिनेड फेकून त्याने दुष्मनला जागच्या जागी स्वर्ग दाखवला. या स्नायपरने आमचे बरेच बळी घेतले होते.

लढाई संपल्यावर अमर झालेले वीर एकत्र केले. जखमींना आर. ए. पी. त पाठवले. त्यांची हत्यारे आणि इक्वीपमेंट जमा केली. वीरगती पावलेल्या जवानांना चाँगजवळ खड्डे खणून त्यांचा अंत्यविधी करत असतानाच आमच्या बटालियनचे कमांडिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल रॉबर्ट आणि सुभेदार मेजर शीसराम मेजर डनलॉपसह तेथे पोचले. त्या तिघांनी या शहीदांना मानवंदना दिली. जखमींची विचारपूस केली. बेटस आणि ओकॉनरने कर्नलपुढे जवानांचे बरेच कौतुक केले. जवानांना कर्नलने शाबासकी दिली. समुद्रसिंग आणि मोलूराम यांनी गाजवलेल्या मर्दुमकीबद्दल मी त्यांची मिलिटरी मेडलसाठी शिफारस केली.

' गेले पाच सहा दिवस बच सारखा कामगिरीवर जातो आहे, कारण मी बीमार होतो. ' असे डनलॉप कर्नलना बोलताच कधी नाही ते म्हातारबुवा माझ्याकडे बघून गोड हसले नी डनलॉपला म्हणाले—

' ज्युनियर, आय ॲम टेकींग बच विथ मी
फॉर ए कपल ऑफ डेज रेस्ट. '

हारबरला पोचल्यावर मी मनसोक्त स्नान केलं. स्वच्छ कपडे घातले नी ताजा-तवाना झालो. कर्नलनं माझं बरंच टपालही आणलं होतं. आबा, मा, दादांची पत्रं वाचतांना सतत सहा दिवस आलेला थकवा कोठल्या कोठे पळून गेला.

आज दर्यासिंगचं प्रमोशन होऊन तो जमादार बनला. मोलूराम कंपनी हवलदार मेजर बनला. समुद्रसिंग हवलदार झाला. या तिघांनी रात्री त्यांच्या बंकरमध्ये हलवा-पुरीची मेजवानी दिली. कर्नल, डनलॉप, न्यूमन वगैरेपण आमच्याबरोबर होते. त्यांनी जवानांबरोबर जमिनीवर बैठक मारून रम घेतली आणि हुक्का ओढला. कर्नलचं काहीतरी बिघडलेलं दिसतंय. बराच हसत होता. चेष्टा करत होता. हे पाहून डनलॉपनं हळूच हसून मला डोळा मारला.

---

## ३ मार्च ४५ — इवेब्रोतील दोन दिवस

---

कर्नल रॉबर्टबरोबर मी आज सकाळी इवेबोला बटालियन हेडक्वार्टर्सला आलो. तेथे हजर असलेल्या सर्व दोस्तांना भेटलो व नंतर प्रेमच्या बाशात जाऊन कॅपकॉट-वर पडलेल्या त्या धुडावर अंग झोकून दिलं. तशी ती नाजूक इवलीशी कॉट काड-कन तुटली आणि आम्ही दोघेही जमिनीवर आदळलो. मग काय प्रेमच्या तोंडाचा पट्टा सुटलाय म्हणता.

इतक्यात तेथे लेफ्टनंट सुनीलकुमार बानर्जी आला. त्याला उद्देशून प्रेम म्हणाला, ' ए, बॅनर्जी, तू बचको मिलनेके लिये तडप रहाथा ना ? तो मिलो इस बेवकूफसे. '

मीही बानर्जीला भेटायला उत्सुक होतो. त्याच्याबद्दल मी बरंच ऐकलं होतं. आम्ही एकमेकांशी हस्तांदोलन केलं व गप्पा मारत बसलो.

सुनील मध्यम उंचीचा काळा सावळाच आहे. पण त्याचा विशाल भालप्रदेश आणि टप्पोरे चमकदार डोळे चटकन नजरेत भरतात. भाषा विषय घेऊन कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या एम ए. झालेल्या या हुषार ऑफिसरला ओठातील एक कोपऱ्यात सतत जळती सिगरेट खुपसून ठेऊन व डोळे किंचित् आकुंचित करून बोलायची सवय आहे. संभाषण कलेत तो प्रवीण आहे. कोणताही विषय तो पद्धतशीर व सफाईदारपणे हाताळतो. त्या सोनेरी बारीक चष्म्याआड लपलेले त्याचे चमकदार डोळे एखादा मुद्दा हिरीरीने मांडताना मधूनच विस्फारित होतात. मेजर डनलॉप-बरोबर सुनील, आराकान फ्रंटवर स्काऊट प्लटून कमांड करत होता. तेथील लढाईत त्याने उत्कृष्ट कामगिरी बजावली. वैयक्तिक शौर्य आणि कौशल्यपूर्ण नेतृत्व गाजवल्याबद्दल त्याला 'मिलीटरी क्रॉस' हे मानाचे पदक बहाल करण्यात आलं होतं. प्रसिद्धीची हाव न धरणारा, स्वतःची शेखी न मिरवणारा असा हा अगदी साधा ऑफिसर आहे. जवानांचा फार लाडका आहे.

आराकान आघाडीवर असताना सुनीलचे स्काऊट प्लटून तेथे लढणाऱ्या डिव्हिजनच्या हेडक्वार्टर्सला असणाऱ्या डिफेन्स कंपनीच्या मदतीला संरक्षणासाठी ठेवले होते.

या डिव्हिजनल हेडक्वार्टर्सवर एका मध्यरात्री दुष्मनने मोठ्या प्रमाणात अचानक हल्ला करून घेरा टाकला. रात्र काळोखी होती. पाऊस पडत होता. शत्रूचा जोर होता. अंधाराचा फायदा घेऊन चटकन ती जागा सोडून दुसरीकडे जाण्याचे डिव्हिजन कमांडरने ठरवले. या वेळी हाच निर्णय योग्य होता. डिफेन्स कंपनी कमांडर आणि बॅनर्जीला बोलवून त्याने हेडक्वार्टर्सचा सर्व स्टाफ व काही महत्त्वाची कागदपत्रे दूर जाईपर्यंत ही जागा लढवण्याची आज्ञा केली.

बॅनर्जीने तावडतोब स्काऊट प्लटूनची सर्व कॅरियर्स ऑल राउंड डिफेन्समध्ये लावून, त्यावर मशीनगन्स, ब्रेनगन्ससारखी स्वयंचलित हत्यारे चढवून शत्रूचे सारे मार्ग रोखून धरले. डिफेन्स कंपनीच्या जवानांनी मोक्याच्या जागा पकडून पुढे चाल करून येणाऱ्या शत्रूवर मारा करायची सिद्धता ठेवली. प्रत्येकाजवळ दहा, बारा हँड ग्रिनेडस, काहींजवळ डिसचार्जर कप, टू इंच मॉर्टर वगैरे हत्यारे जय्यत तयारीत ठेवली. शत्रूने मोठ्या दणक्यात त्यांची हत्यारे चालवून पुढे यायला सुरुवात करताच, बॅनर्जीने एकदम २५, ३० व्हेरी लाईट पिस्तुले फायर करून चाल करून येणाऱ्या दुष्मनवर प्रकाशाचे झोत फेकायला सुरुवात केली आणि सर्व स्वयंचलित हत्यारांच्या गोळ्यांचा त्यांच्यावर पाऊस पाडला. स्वतः एका कॅरियरामध्ये स्वार

होऊन शत्रूच्या गोळ्यांची पर्वा न करता जागजागी जाऊन जवानांना जोष देऊन ती जागा एकांड्या शिलेदारासारखी तो लढवत राहिला. दुष्मनचे अतोनात नुकसान झाले तरी मागे हटेना. तोही हट्टाला पेटला आणि डिफेन्स बॉक्समध्ये घुसला. कोणाचा पायपोस कोणात उरला नाही. हातघाईची लढाई सुरू झाली. बॅनर्जीने सर्व कॅरियर्स या टोकापासून त्या टोकापर्यंत जो शत्रू दिसेल त्यावरून एखाद्या स्टीम रोलरप्रमाणे फिरवली. ही घनचक्कर लढाई तीन तास चालली. एवढ्या अवधीत डिव्हिजन हेडक्वार्टर्स स्टाफ व जनरल, इच्छित स्थळी सुखरूप पोचले. पहाटे दुष्मनला परत जावे लागले. उजाडल्यावर बानर्जीने पाहिले तो त्याच्या आणि दुष्मनच्या जवानांच्या प्रेतांचा जागजागी खच पडला होता. रक्ताचे पाट वहात होते. या लढाईत डिफन्स कंपनीचे व स्काऊट प्लटूनचे ४९ जवान मारले गले. जखमींना आर. ए. पी.त पाठवले.

अशा या घनघोर संग्रामात सुनीलनं आपलं चित्त विचलित होऊ दिलं नाही. ओठांच्या कोपऱ्यात खुपसलेल्या अर्धवट जळत्या सिगरेटचे झुरके मारत, हसऱ्या मुद्रेने त्याने आपले जवान व सामान एकत्र केले. या धकाधकीत त्याच्या अंगावरचे कपडे फाटले होते व सामान जळून गेले होते. तो मग कपड्यांच्या शोधात डिव्हिजन कमांडरच्या कॅराव्हानमध्ये गेला. जनरलचे सर्व कपडे, सामान, रिस्टवॉच वगैरे तेथेच होते. त्याने त्यातील एक शर्ट व पॅंट अंगावर चढवला व दोन सेट बरोबर ठेवले.

सर्व आवराआवर झाल्यावर या तुकडीने डिव्हिजन हेडक्वार्टर्सला रिपोर्ट केले. जनरल त्यांच्या कामगिरीवर फार खूष झाला. बॅनर्जीने गाजवलेले शौर्य, चिकाटी आणि प्रसंगावधान लक्षात घेऊन त्याला ऑन दि स्पॉट ' मिलीटरी क्रॉस ' हे पदक बहाल केलं. बॅनर्जीशी हस्तांदोलन करत जनरल, मिष्कीलपणे म्हणाला–' बाय दि वे, यंग मॅन, धिस शर्ट अँड ट्राऊझर्स अॅपीयर्स टु बी माईन. '

त्यावर खाली वाकून पॅंटचा एक पाय घोट्यावर सरकवत बॅनर्जी म्हणाला– ' यस सर. अँड दीज स्टॉकिंग्ज अँड धिस रिस्टवॉच इज आल्सो युवर्स. '

यावर जनरल खळखळून हसला नि म्हणाला–' वेल डन बॉय. कीप इट विथ यू. '

असा हा सुनीलकुमार बानर्जी.

आणि तसाच आमचा–

कॅप्टन हरीकेशचंद्र गहलौट.

ए ट्रू स्पेसिमेन ऑफ टफ रग्ड फायटिंग जाट. सहा फूट उंचीचा, प्रमाणबद्ध शरीराचा हा ऑफिसर प्रसिद्ध नट गॅरी कूपरसारखा दिसतो. वृत्तीनं डनलॉपसारखाच स्वच्छंदी, बेडर, शूर आणि उमदा. सतत कठीण कामगिरी अंगावर घेण्याची आवड. जवानांवरून जीव ओवाळून टाकणार.

काही महिन्यांपूर्वीच घडलेला एक समरप्रसंग मोठा रोमांचकारक आहे.

हरीकेश त्या वेळेला आमच्या बटालियनचे थ्री इंच मॉर्टर प्लटून कमांड करत होता. हे प्लटून नंबर २६८ इन्फंट्री ब्रिगेडबरोबर काम करत होतं. आमच्या आघाडीपासून दुष्मनच्या प्रदेशात सुमारे वीस मैल आत 'आवा ब्रिज' या नावाचा महत्त्वाचा पूल होता. पुढील चढाईसाठी त्याचा आमच्या सेनेला अत्यंत उपयोग होणार होता. मागे हटणारा शत्रू हा पूल केव्हाही उडवण्याची शक्यता होती. हरकेशनं ही कामगिरी शिरावर घेतली.

त्यानं सात बैलगाड्या घेतल्या. त्यात प्रत्येक गाडीत तळाला मॉर्टर्स, बाँबस्, स्वयंचलित हत्यारे, ग्रिनेडस, जरूर असणारी इतर एक्सप्लोझिव्ज वगैरे लपवले. वरून गवताचा चारा, ज्यूट चट्या व इतर घरगुती सामान पसरले. जवानांना त्या प्रदेशातील लोकांचे वेष दिले. तसा मेकअप केला. त्या लोकांच्या सवयी आत्मसात केल्या. छोटे सुरे, पिस्तुले, हँडग्रिनेडस अंगावरील कपड्यांत लपवले व एका रात्री बॉर्डर क्रॉस करून जंगलात घुसला. आठ, दहा मैल आत गेल्यावर शत्रूचे एक पेट्रोल त्यांना टकरले. त्यांच्याशी मुकाबला करून त्या सर्वांना मारून हे पुढे सरसावले. पूल दृष्टिपथात येताच पोझिशन घेऊन गाड्या लपवल्या व हे लोक लपतछपत पुलाजवळ जाऊन पुलाचे रक्षण करणाऱ्या टोळीला त्यांनी कापून काढले. अत्यंत धाडसाने आणि गुप्तपणाने सारा कार्यक्रम आटपला. पूल उडवण्यासाठी तयार केलेले डायनामाईट चार्जेस डिस कनेक्ट केले व शाबूत पूल आमच्या लढणाऱ्या सेनेच्या हातात सुपूर्द केला.

हरीकेशने ही स्कीम स्वतः रचून त्याचं नेतृत्व कुशलतेनं, धाडसानं आणि आत्मविश्वासानं केलं. सर्वांनी त्याचं कौतुक केलं. पण त्याच्या या अजोड आणि अमोल कामगिरीबद्दल त्याला किमान 'मिलिटरी क्रॉस' हे पदक मिळायला हवं होतं. हीच कामगिरी जर एखाद्या गोऱ्या ऑफिसरने पार पाडली असती तर त्याला ताबडतोब 'गॅलंटरी अॅवॉर्ड' मिळून भारतातच नव्हे तर परदेशातही प्रसिद्धी मिळाली असती.

माझ्या डोळ्यांसमोर तर अशी दोन-तीन उदाहरणं घडली आहेत की त्या गोऱ्या ऑफिसर्सना सुचवण्यात आलं—

'अरे, तुम्ही नुसतं रणांगणावर जाऊन या. एखाद्या ग्रिनेडचा तुकडा लागून जरी तुम्ही जखमी झालात तरी तुम्हाला पदक देऊन गौरव करू.'


पण हरीकेश मोठ्या मनाचा दिलदार माणूस. सुपाएवढं काळीज आहे त्याचं. तो नेहमी म्हणायचा—

'अरे, मी माझं कर्तव्य केलं. यात विशेष ते काय केलं?'

या ऑफिसरचं भविष्य उज्वल आहे. हा पुढे मोठा सेनानी होईल.

संध्याकाळी मेसच्या बाशांत गेल्यावर कर्नलनं मला जवळ बोलवून घेतलं. ड्रिंक दिलं. हास्यविनोद केला. मला गुदमरल्यासारखं झालं. सुनील व प्रेम माझ्याकडे

# सीमेंट
# कायम टिकाऊ
# असते



आणि एसीसी सीमेंटमध्ये बांधलेले घरही तसेच असते. ते पिढ्या न् पिढ्या टिकते. असे घर म्हणजे तुमची मुले, नातू, पणतू यांच्यासाठी भक्कम वारसाच होय. एसीसी सीमेंट म्हणजे सुरक्षितता, टिकाऊपणा आणि स्थायीपणा.

CMI-1924

तुम्हाला लागणारे सीमेंट मिळविण्यासाठी तुमच्या नजीकच्या **एसीसी** स्टॉकिस्टचा अथवा दि सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड, १२१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई २०, यांचा संपर्क साधा.

तज्ञांची **मोफत तांत्रिक मदत** दि कॉंक्रीट अॅसोसिएशन ऑफ इंडिया, १२१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई २०, यांचेकडून मिळेल.

**ACC**

**शेतकऱ्यांचा सखा**

**दि अॅसोसिएटेड सीमेंट कंपनीज लिमिटेड**
**दि सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड**

पाहून मिष्किलपणाने हसत होते. एकदा तर कर्नलचं लक्ष नाही असं पाहून प्रेमने हळूच डोळाही मारून घेतला. जेवायलाही कर्नलनं मला जवळ बसवून घेतलं. कहर झाला. जवळ जवळ वर्षभर मी पलटणीत आहे पण गेले दोन दिवस सोडले तर हा खत्रूड म्हातारा कधी एकदाही चार गोड शब्द बोलला नव्हता. कधी-मधी बातचीत झालीच तर माझ्या चुकलेल्या कामात खोडी काढण्यातच. मला वाटायचं की ही स्वारी आपल्या बायकोशी बोलताना तरी हसत असेल की नाही कोण जाणे. पण नाही. याला हसायला येतंय.

## ४ मार्च ४५

आज खूप मजा आला. हरीकेश आणि कानन दोघेही श्वेबोला आले. प्रेमच्या बाशांत आम्ही सर्वांनी दिवसभर धुडगुस घातला.

आज अय्यंगारचं पत्र आलं. काननच्या आई-वडिलांचा स्टेला-कानन विवाहाला सक्त विरोध आहे. नो कॉम्प्रमाइज, कानन म्हणतो–

" वॉऽऽटेवर मे हॅपन. आय्याम गोइंग टू मॅरी स्टेऽऽला. '

डीनचंही पत्र आलं. तो एक तारखेला कोमिल्लाला आला. तेथील कॉम्युनिकेशन झोनमध्ये ट्रान्सपोर्ट ऑफिसरचे कामावर त्याची नियुक्ती झाली आहे. त्याचे लिली-बरोबर कोर्टींग जोरात चालू आहे. तो म्हणतो, ' नो वेडींग इन नाईंटीन फॉरटी फाइव्ह. '

## ५ मार्च ४५

आज सकाळी सात वाजता २५ जवानांची टोळी (रि-एनफोर्समेंट) घेऊन मी कंपनीकडे रवाना झालो. या अवधीत आमचे टँक हारबर सेथीहून दक्षिणेकडे वीस मैल सिथे या गावी हलले. इट सीम्स दॅट दि एनिमी इज ऑन दि रन नाऊ.

## ६ मार्च ४५

मेजर डनलॉप दोन प्लटून्स घेऊन कामगिरीवर गेला आहे. सिथेच्या आग्नेय दिशेला ११ मैलांवर पिनया या गावी टँक हारबर आज हलणार म्हणून कंपनी रिअर हेडक्वार्टर व नवीन जवानांची टोळी घेऊन मी पिनयाला आलो. मोर्चे

खोदून डिफेन्स लावला. त्यानंतर नव्या जवानांना एकत्र करून येथे कशा प्रकारे काम चालते याची कल्पना दिली. जमादार दर्यासिगने टँकबरोबर कसे काम करायचे, काय इशारे करायचे वगैरेचे प्रात्यक्षिक दिले आणि सराव करून घेतला.

## ७ मार्च ४५ | झुंज : ११

पाच दिवसांच्या भरपूर विश्रांतीनंतर मी आज पुन्हा स्वारीवर निघालो. नंबर १९ डिव्हिजनच्या फौजा दक्षिणेकडे मजल दर मजल करत पुढे सरकत होत्या. मंडाले कोण सर करतो याबाबत नं. १९, नं. २० आणि नं. २ डिव्हिजन्समध्ये चुरस लागली होती. विशेषतः नं. १९ व २ मध्ये ही चुरस निकराची होती. नं. २ डिव्हिजन ही संपूर्ण ब्रिटिश व नं. १९ ही इंडियन डिव्हिजन होती. मंडालेकडे नं. २ डिव्हिजन पश्चिमेकडून कूच करत होती.

आज कानले वाथिट या मंडालेच्या उत्तरेस सहा मैल दूर असलेल्या 'मदाया-मंडाले' या हायवे ट्रंक रोडवर 'सी' टँक स्क्वाड्रन, आमची कंपनी आणि राजपुताना रायफलसच्या दोन कंपन्या हल्ल्यात भाग घेणार होत्या. दुपारी बारा वाजता कानले वाथिटच्या वेशीजवळ येताच लढाईला तोंड लागले. हे गाव धड खेडे नव्हते वा शहरही नव्हते. गावात छोटी मोठी घरे बरीच होती. लहान-मोठ्या गल्ल्या साऱ्या गावभर पसरल्या होत्या.

राजपुताना रायफलसच्या कंपन्यांनी गावाच्या पूर्व आणि पश्चिमेला पोझिशन्स घेतल्या. टँक्स व आमची दोन प्लटून्स पद्धतशीरपणे गावातून जाऊ लागली. रस्त्यात येणारे अडथळे दूर करून टँक्स पुढे सरकू लागली. घराघरातून आमच्यावर फैरी झडू लागल्या. टँक्सनी व ब्रेनगनर्सनी गोळीबार चालू केला. थोड्याच वेळात राजपुताना रायफल्सची एक कंपनी आमच्या मदतीला आली व घराघरातून लढाईला सुरुवात झाली. ठिकठिकाणी दारे, खिडक्या, गॅलऱ्या, जिने वगैरे उन्मळून पडू लागली. टँक्सनी तेथील तकलादी लाकडी घरांवर धडक्या मारून ती जमीनदोस्त केली. कित्येक ठिकाणी आगी लागल्या. थोड्याच वेळापूर्वी छोटी छोटी, लाल, लाल दिसणारी घरे जळून खाक होऊन त्या मारझोडीत कशीतरी अर्धी मुर्धी उभी होती. त्यांच्यावर भीषण काळी कळा आली होती. तीन तासात खेळ आटपून आमची सेना गावाबाहेर पडली.

गावाजवळून एक मीटर गेज रेल्वे लाईन दक्षिणोत्तर जाते. तिच्याच साहाय्याने जाणारा एक खडकाळ रस्ता आहे. आजूबाजूला शेते पसरली आहेत. गावातील रस्त्यावरील (स्ट्रीट फायटींग) लढाई संपून मैदानावरची लढाई सुरू झाली. येथेही शेताशेतातून, लहानमोठ्या बांधांतून झाडा-झुडुपांतून दुष्मन दबा धरून

बसला होता. राजपुताना रायफल्सच्या कंपन्यांनी ओपन फॉर्मेशनमध्ये रेल्वेलाईनच्या दोन्ही बाजूचा प्रदेश झाडू मारल्यागत साफ करायला सुरुवात केली. जेथे जरूर पडेल तेथे टँक्स क्लोज सपोर्ट द्यायला तयार होती.

रात्री आठ वाजता टँक स्क्वाड्रन आणि आमच्या कंपनीने मियांगु या मंडालेपासून ३ मैलांवर असलेल्या गावाजवळ तळ ठोकला. नं. १९ डिव्हिजनच्या पुढे जाणाऱ्या बाणाचं आम्ही टोक आहोत. आमच्या नजरेत मंडाले आहे. नं. २ डिव्हिजनचा अजून पत्ताही नाही. चार दिवसांपूर्वी नं. २ डिव्हिजनच्याही (अंतराच्या दृष्टीने) मागे असणारी आमची डिव्हिजन लवकरच मंडालेत प्रवेश करणार आहे. आणि विशेष म्हणजे प्रथम टँक्स व बाँबे ग्रिनेडियर्सची 'ए' कंपनी आणि नंतर इतर सेना दुष्मनची तटबंदी फोडून बेदरकारपणे आत घुसणार आहे.

## ८ मार्च ४५ झुंज : १२

नंबर फिफ्टी आर्मर्ड कोअर रेजिमेंटच्या सी स्क्वाड्रन हेडक्वार्टर्सच्या 'चीफटन' नावाच्या टँकवर आरूढ होऊन मंडालेच्या रोखाने दौड मारीत जात असताना मला उगीचच ऐट वाटत होती. शेजारी बसलेला मेजर डनलॉप माझ्याकडे पाहात मिष्किलपणे हसत होता. चीफटनच्या मागून येणाऱ्या बारा टँक्सवर आमच्या कंपनीचे जवान आरूढ होऊन आपआपली हत्यारे सरसावून बसले होते.

मंडाले दृष्टीच्या टप्प्यात येताच सर्वजण टँकवरून उतरले. राजमार्गावरून टँक्स आणि त्यांच्या दुतर्फा रस्त्याच्या कडेने ग्रिनेडियर्स चालू लागले. रांडेपूजवळ आल्यावर ही सेना थांबली.

पहाटेच्या अधुक प्रकाशात मंडाले नगरी पुसट पुसटशी दिसत होती. गुरखा रायफल्स, बलुची आणि सफकस या तीन पलटणी अर्ध्या तासाने येऊन मिळाल्या.

लढाईच्या सोयीसाठी आमच्या सेनेने मंडाले शहराचे पाच ढोबळ विभाग पाडले. शहराच्या मध्यभागी फोर्ट डफरीन हा भुईकोट किल्ला आहे. त्याने जवळ जवळ तीन, चार मैलांचा प्रदेश व्यापला आहे. या किल्ल्यात गव्हर्नमेंट हाऊस, सेंट्रल जेल, इंफंट्री लाईन्स व बरीचशी दफ्तरे आहेत. किल्ल्याच्या मध्यभागी राजवाडा आहे. मीटरगेज रेल्वेची एक लाईन किल्ल्यातील पश्चिमेकडील भागातून दक्षिणोत्तर जाते. किल्ल्याच्या चारी बाजूला जवळ जवळ वीस फूट उंचीची व अठरा फूट जाडीची तटबंदी आहे. तिच्याभोवती मोठ्या खंदकांचे खोल चरे खणून त्यातून पाणी खेळवले आहे. किल्ला सोडून बाकीचे चार विभाग त्याच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तरेकडील प्रदेशात पसरले आहेत.

आजच्या लढाईचा प्लॅन असा होता—

अ) गुरखा पलटण, टँकचे एक ट्रूप आणि ग्रिनेडियर्सचे एक प्लटून यांनी शहराच्या पूर्वेकडील भागातील शत्रूशी सामना द्यायचा.

ब) गोऱ्यांची सफकस पलटण, टँकचे दुसरे ट्रूप आणि आमचे दुसरे प्लटून यांनी पश्चिमेकडून चाल करायची.

क) बलूच पलटण, टँकची उरलेली दोन ट्रूपस् आणि ग्रिनेडियर्सचे उरलेले प्लटून (कंपनी हेडक्वार्टर्ससह) यांनी उत्तरेकडून धडक मारायची.

तिन्ही सेनांच्या तुकड्या आपआपल्या प्रदेशात गेल्या. स्टार्ट लाईन पार करायची वेळ सकाळी सातची ठरली.

उत्तर, पूर्व आणि पश्चिमेकडून पुढे सरकणाऱ्या फौजांनी शत्रूला हुडकून काढून त्याला मारण्याचे वा पिटाळण्याचे काम संध्याकाळी पाच वाजेपर्यंत चालवले. त्यात दोन टँक्स बरबाद झाली. चार सवार प्राणास मुकले. ट्रूप कमांडर लेफ्टनंट शार्प जखमी झाला. पायदळांपैकीही काही मारले गेले. आमचा एक जवान मारला गेला. दोन जखमी झाले. आमच्या सेना क़िल्ल्यापासून चारशे पावलांवर येऊन ठेवल्या.

पायदळ पलटणींनी किल्ल्याच्या भोवती खंदक खोदून पक्का डिफेन्स बनवायला सुरुवात केली. किल्ल्यात दुष्मनचा कडेकोट बंदोबस्त आहे अशी बातमी होती. गजागजावर स्वयंचलीत हत्यारे आणि अंतरा-अंतरावर तोफा डागलेल्या होत्या. आत किती सेना आहे याचा अंदाज लागत नव्हता. त्याच्या आर्मर्ड कार्स (चिलखती गाड्या), टँक्स वगैरे जय्यत तयारीनिशी खडे होते. हे सर्व लक्षात घेऊन, सर्व दृष्टीने जय्यत तयारी झाल्याशिवाय किल्ल्याला धडक मारायची नाही असा निर्णय वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतला.

पायदळ पलटणींनी किल्ल्याभोवती ठाण मांडले. आमची कंपनी टँकवर आरूढ होऊन हारबरला परतली. शहराच्या रस्त्यात, घरा-दारांच्या मजल्यावरून दाटीने उभी असलेली आणि हसून, हवेत हात हलवून आनंद प्रदर्शित करणारी ती ब्रह्मी मुले, स्त्रिया आणि पुरुष पाहून आम्हाला गंमत वाटली. अशा बड्या शहरांतून या लोकांच्या थव्यांतून मार्ग काढत जाणाऱ्या टँकवर मी अधिकच ऐटीने बसलो. विजयाची नशा काही औरच असते.

दोन सेना असलेल्या एकाच शहरातल्या लोकांचे फार हाल होतात. आमच्या सेनेच्या ताब्यात असलेल्या अर्ध्या मंडालेत राहाणाऱ्या नागरिकांचे दुकान वा दफ्तर कदाचित् दुष्मनच्या ताब्यात असलेल्या उरलेल्या भागात असेल. या भागात राहाणाऱ्या मुलांची शाळा त्या भागात असेल. या भागात राहाणाऱ्या कैक लोकांचे नातेवाईक, दोस्त वगैरे त्या भागात असतील. आणि व्यवहाराबाबत तर विचारूच नका. कोणतीही वस्तू घेण्यासाठी तुम्ही नोटांचे पुडके जरी देऊ केलेत तरी तेथील लोक पैसे घेणार नाहीत. त्याऐवजी मीठ, तांदूळ, कपडा वगैरे मागतील. दोन वर्षांत तीनदा राजवट बदलली. त्यात हे लोक चांगलेच होरपळून निघाले आहेत. विश्वा-

साने कोणावर विसंबून राहावे हा त्यांना प्रश्न पडतो.

युद्धकालांत, ज्या भागात लढाई चालते तेथील जनता अति दुर्दैवी असते. दोन्ही पक्षांची विमाने, तोफा आणि सेना त्या भागात चाल करून येत असतात, वा मोर्चेबंदी करतात. तेथील रहिवाशांना नेसत्या वस्त्रांनिशी जीव बचावण्यासाठी पळ काढावा लागतो. लढाई संपल्यावर जेव्हा आशेने ते परत येतात तेव्हा कोणतं दृश्य दिसतं ? घरे-दारे उध्वस्त होऊन, जळून, मोडून, तुटून पडली आहेत. त्यातील सामानाचा मागमूसही नाही. गाई, म्हशी, शेळ्या, कोंबड्या जागजागी मरून पडल्या आहेत. भरघोस उगवलेल्या धान्यांच्या शेतांतून, मोठमोठ्या तोफा, अजस्त्र टँक्स, शेकडो गाड्या, सैनिक फिरल्याने पिके जमीनदोस्त झाली आहेत. त्यातून जी काही थोडी घरे बचावली असतील, चीजवस्तू वाचल्या असतील, धुमश्चक्रीतून शेते निसटली असतील, त्यांचा कबजा तेथे असलेल्या सेनेनें घेतलेला असतो. गुप्ततेच्या नावाखाली त्या जागेच्या मालकाला तेथे शिरकाव करून घ्यायला मज्जाव असतो. या हजारो लोकांपुढे प्रश्न असतो – आजची रात्र कुठं काढायची ? उद्याची भूक कशी भागवायची ?

## ९ मार्च ४५

आज संध्याकाळी टँक हारबर मियांगूहून हलवून मंडालेच्या ईशान्य दिशेला असलेल्या मंडाले हिलच्या उत्तरेकडच्या पायथ्याशी आणले. तेथे हारबर आणण्यात हेतु असा होता की, टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या पोकळीत टँक ठेवता येतील व शत्रूच्या तोफखान्यांपासून त्यांचा बचाव करता येईल. काल रात्री मियांगु हारबरवर दुष्मनच्या तोफखान्याने शेलिंग केले होते व त्यात दोन टँक निकामी झाली होती.

टेकडीच्या शिखरावर बार्क पलटणीची एक कंपनी होती. त्यांच्याशी मिलाप करण्यासाठी मी, हवालदार समुद्रसिंग व दोन जवान संध्याकाळी साडेसात वाजता गेलो. या टेकडीवर एक भव्य पगोडा होता व तेथे जाण्यासाठी सुबक पायऱ्या बनवल्या होत्या. त्या सुमारे चौदाशे पायऱ्या चढून आम्ही टेकडीच्या माथ्यावर गेलो. थकवा आला होता. घामानं शरीरही भिजून गेलं होतं. वॉटर बॉटलमधून दोन घोट पाणी प्याल्यावर आणि अंगावरून थंडगार वाऱ्याची झुळूक गेल्यावर एकदम हुशारी वाटली. कंपनी कमांडर मेजर ब्रुईन माथ्यावरच्या पगोड्यात होता. त्याला आमची माहिती दिली. त्याने रात्री आमच्या भागांकडे येणाऱ्या त्याच्या टोळ्यांचा कार्यक्रम सांगितला.

पगोड्याच्या आवारात मी थोडा वेळ आरामात बसलो. मंदिराचे बांधकाम अंधारामुळे स्पष्ट दिसू शकले नाही. पण आकाशाच्या पार्श्वभूमीवर त्याची भव्यता

उठून दिसत होती. ध्यानस्थ बसलेल्या बुद्धाची सुमारे चाळीस फूट उंचीची मूर्ती स्पष्ट दिसत होती. मंदीरापुढेच लांब-रुंद आणि उंच असा एक भव्य मंडप होता. त्या मंडपात बार्कस पलटणीच्या एका प्लटूनने डिफेन्स लावला होता. तेथे त्यांची हत्यारे, दारूगोळा, ग्रिनेडस् वगैरे साहित्यासह गोरे शिपाई लढण्याच्या जय्यत तयारीत होते. बंदुकांवर संगीनी चढवून पहारा करणारे संत्री फिरत होते. त्यांच्या काळसर छाया ध्यानस्थ बसलेल्या बुद्धावर अस्पष्ट दिसत होत्या. अहिंसा आणि हिंसा तेथे एकत्र नांदत होती.

दक्षिणेकडील अस्मान लाल दिसू लागले म्हणून ब्रुईन व मी त्या दिशेला गेलो. त्या उंच टेकडीवरून खालच्या प्रदेशात मंडाले अस्पष्ट दिसत होतं. फोर्ट डफरीन-वर आमच्या तोफखान्याने आणि हवाई जहाजांनी बंबारी केली होती. त्यात किल्ल्यातील काही भागांना आगी लागल्या होत्या. मंडाले शहरातही थोड्या ठिकाणी आगी लागल्या होत्या. त्यात शत्रूचे दोन मोठे पेट्रोल डंप होते. त्यांचे लाल लाल लोट अस्मानात वर चढत होते. त्या तांबूस प्रकाशात पेटलेले मंडाले भयंकर दिसत होते. ध्यानस्थ बसलेल्या शेकडो बुद्धांचे उत्तम शिल्पकृतीचे मोठमोठे पगोडे या लढाईच्या भडकलेल्या ज्वालेत भस्मसात होत होते.

हिंसा आणि अहिंसा यांचे दुसरे चित्र होतं ते.

## १२ मार्च ४५

गेले तीन दिवस आराम चाललाय. मडाले हिलच्या दक्षिणेला असलेला दुष्मन परवाच पिटाळून लावला. आता तीन मैलांच्या टापूत शत्रू नाही. फोर्ट डफरीन-भोवती तीन पायदळ पलटणी कडे करून बसल्या आहेत. या हारबर प्रदेशात एक मोठा पगोडा व चार प्रशस्त बंगले आहेत. पैकी एका बगल्याचे मालक मेजर न्यूमन व डनलॉपला भेटले व सर्व ऑफिसर्सनी अद्यावत् फर्निचरनी सुसज्ज असलेल्या बगल्यांत राहावे अशी विनंती केली. मी बेटस, ओकॉनर ही ऑफर ऐकून खूष झालो. गेले दोन महिने सतत धरतीच्या पोटांतील गार बंकरमध्ये राहून शरीर आंबलं होतं. आता ऐसपैस हातपाय ताणून पलंगावर आरामात झोपू असे मांडे आम्ही मनाशी रचले. पण डनलॉपने आणि न्यूमनने त्या सद्गृहस्थांची ऑफर साभार नाकारली. आमचे जवान ज्या स्थितीत राहातील तसेच ऑफिसर्सनी राहिले पाहिजे यावर डनलॉपचा कटाक्ष. त्याचं वागणं अगदी योग्य होतं. मला माझ्या वागण्याची लाज वाटली. मी डनलॉपला तसं बोलल्यावर तो हसला नि म्हणाला,

"तू बच्चा आहेस अजून. अनुभवाने आपोआप शिकशील.
ऑल्वेज कीप इन माइंड दॅट इफ यू लूक आफ्टर
युवर ट्रूप्स, दे विल डाय फॉर यू."

आज सकाळी दोन टँक ट्रूप्स, आमची दोन प्लटून्स व पंजाबी रेजिमेंटची एक कंपनी घेऊन एका कामगिरीवर गेलो.

फोर्ट डफरीनच्या नैऋत्य दिशेला एका मोठ्या रस्त्यावर दुतर्फा दुमजली, तीनमजली बिल्डिंग्ज आहेत. या भागात बराच दुष्मन दबा धरून बसला आहे अशी बातमी लागली.

घराघरातून, गल्ली रस्त्यातून दबा धरून बसलेल्या सेनेला दुष्मन कोणत्या मार्गाने चाल करून येत आहे हे चटकन ओळखता येते. हमला करणाऱ्या सेनेला अचानक हल्ला (सरप्राइज् अॅटॅक) चढवता येत नाही. दुष्मन चकित होऊ शकत नाही. अनपेक्षित घडत नाही. टँक्सना ठराविक मार्गाने जावे लागते. त्यांचे फिल्ड ऑफ फायर रिस्ट्रिक्टेड असते. घराघरांतून, रस्त्यांच्या चौकांतून, नाक्यावरून अँटीटँक वेपन्स त्यांच्यावर सहज रीतीने मारा करून ती जाळू व निकामी करू शकतात.

आमच्या सेनेने त्या रस्त्यातून व बाजूच्या दोन गल्ल्यांतून मार्ग काढायला सुरुवात करताच चकमकीला तोंड लागले. आमच्या जवानांनीही ग्रिनेडस्, रायफल्स, स्वयंचलित हत्यारे, वगैरे चालवून खिडक्या, दारे, छपरे वगैरे जागांतून येणाऱ्या फायरला जबाब द्यायला सुरुवात केली. सैनिक आत घुसून घरांची तपासणी करू लागले. पडझड, संगीनीने भोसकणे, ग्रिनेडस् फेकणे, धूर सोडणे, हाताला येतील ते पदार्थ प्रतिपक्षांवर फेकणे, खिडक्या दारे मोडणे, भिंती कोसळणे, असे एकच रणकंदन माजून गेले. इमारतींना आगी लागल्या. रस्त्यावर दगडा-विटांची रास पडू लागली. अनेक सैनिक मारले गेले व जखमी झाले. त्यांतूनच वाचलेले पुढे पुढे जात होते. याच गोंधळात दूर अंतरावर रस्त्याच्या क्रॉसिंगवरून तीन सेव्हन्टी फाईव्ह मिलीमीटर गन्स पुढे येणाऱ्या टँक्सवर फायर करू लागल्या. दोन टँक्स जागच्याजागी बरबाद झाली. त्यांना एकदम आगी लागल्या. आंतील सवार भाजून निघू लागले. प्रसंगावधान राखून आमच्या सात आठ जवानांनी त्यातील अर्धवट भाजलेले पाच सवार बाहेर काढले. तीन सवार जागच्याजागीच जळून भस्मसात झाले. ट्रूप कमांडर लेफ्टनंट बेटसने त्याचे टँक्स या तोफांच्या दिशेने बेदरकारपणे चालवून दोन तोफा उध्वस्त केल्या. आमच्या कंपनीच्या गोवर्धन व प्रल्हाद या जवानांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता या सवारांना जळत्या टँकमधून ओढून काढण्याच्या कामी विशेष शौर्य दाखविले. या दोघांची मी मिलीटरी मेडलसाठी शिफारस केली.

या तीन तासांच्या धुमश्चक्रीत आमचे ९ जवान जखमी झाले. टँक्सचे ५ जवान गारद झाले. पंजाबींचेही थोडे नुकसान झाले. दुष्मनच्या नुकसानीचा अंदाज लागला

नाही. जागेचा कब्जा घेतल्यावर बराचसा खाद्यपुरवठा, हत्यारे व दारूगोळा मिळाला. काही महत्त्वाची कागदपत्रेही हाती लागली. ठिकठिकाणी मरून पडलेले शत्रूचे सैनिक दिसत होते. आमची सेना त्यांची पद्धतशीर तपासणी करून पुढे सरकत होती.

## १६ ते १९ मार्च ४५

आता आमच्या सेनेचे सारे लक्ष फोर्ट डफरीनवर केंद्रित झाले. किल्ल्याच्या बाहेर पाण्याने भरलेला खंदक पार करून किल्ल्याच्या भिंती चढून जाण्याचे अनेक प्रयत्न आमच्या पायदळ पलटणींनी या दोन दिवसात केले. पण ते सारे निष्फळ झाले. शत्रूने त्यांच्या मशीनगन्स, ब्रेन गन्स, ग्रिनेडस वगैरेच्या साह्याने फायर करून या चढणाऱ्या जवानांचे अतोनात नुकसान केले. किल्ल्याच्या तटाला खिंडारे पाडण्यासाठी आमच्या तोफखान्याने साडेपाच इंची मीडियम तोफ पाचशे गजावर आणून फायर केले. पण काही उपयोग झाला नाही. किल्ल्याला चारी बाजूने घेरून शत्रूच्या बाहेर पडण्याच्या सर्व वाटा बंद केल्या होत्या पण आंत घुसण्याचे प्रयत्नांना यश येईना. खरं म्हणजे हा किल्ला बायपास करून पुढे रगूनकडे कूच करता येण्यासारखे होते. पण हा किल्ला बर्मा फ्रंटच्या लढाईतील एक मानबिंदू होता. प्रसिद्धी मिळण्याच्या आणि जवानांच्या मोरालच्या दृष्टीनं तो काबीज करणं अगत्याचं होतं.

## २० मार्च ४५

आज या आघाडीवरील सर्वांत मोठा एअर स्ट्राइक फोर्ट डफरीनवर होणार आहे. ठीक अकरा वाजता स्ट्राइकला सुरुवात झाली. मिचेल बॉबर्सची तीन स्क्वाड्रन्स (३६ विमाने) दोन हजार पौंड वजनाचे अजस्र बॉंब किल्ल्यावर सोडू लागले. बारा बारा विमाने एकदम येत व बॉंब फेकत. ते बॉंब इतके प्रचंड होते की, सहज मोजता येत. बॉंब पडून फुटले की, त्या चोवीस हजार पौंड वजनाचे धूड फुटल्याचा आवाज इतका मोठा होई की, त्यानंतर थोडा वेळ कान सून्न होऊन जात. त्यांच्या धसक्याने आम्ही उभे असलेली मंडाले हिल हादरून जाई. किल्ल्याच्या तटबंदीच्या विटा, झाडे, झुडपे, घरे, रेल्वे लाईन्स, आगगाडीचे डबे वगैरे आकाशात वर उडून जोरात खाली आदळत. क्षणातच धुरळ्याचा दाट पडदा निर्माण होई. तो जवळ जवळ दहा मिनिटे तरंगत राही. त्यानंतर दुसरा स्क्वाड्रन येऊन त्याचीच

पुनरावृत्ती होई. मिचेल बॉबर्सनी अर्धा तास बॉबिंग केल्यावर थंडर बोल्टचे एक स्क्वाड्रन आले. त्यांनी डाईव्ह बॉबिंग सुरू केले. पाचशे पौंड वजनाचे बॉंब इतक्या शिताफीने डाईव्ह करून फेकत, की अचंबा वाटे. त्यांनी वीस मिनिटे बॉबिंग केल्यावर हरीकेन बॉबर्सची दोन स्क्वाड्रन्स आली. त्यांनी पण हात धुवून घेतले. जवळ जवळ तास सव्वा तास हे तांडव चालू होते. किल्ल्याला ठिकठिकाणी आगी लागल्या. तटबंदीला दोन, चार ठिकाणी खिंडारे पडली.

थिबा राजाचा राजवाडा, तुरुंग, गव्हर्नमेंट हाऊस, क्लब, पोस्ट ऑफीस, भांडारे, वर्कशॉप, वगैरे उद्ध्वस्त झाले. काही ठिकाणी प्रचंड आगी लागल्या.

दुपारी एक वाजता टँक्स ग्रिनेडियर्स कंपनी आणि पंजाब रेजिमेंटची पलटण यांनी किल्ल्यात प्रवेश केला. काही अँग्लो बर्मन व ब्रह्मी लोक हातात पांढरी निशाणे व युनियन जॅक घेऊन तटावर येऊन किल्ल्यात शत्रू नाही असा इशारा करू लागले. बराच शत्रू काल रात्री व आज पहाटे खंदकाच्या साहाय्याने पसार झाला होता. किल्ल्यात अमेरिकन आणि युरोपियन सिव्हिलियन कैदी होते.

शत्रूचे बरेच सामान गाड्या, कोठारे, वगैरे विखरून, तोडून मोडून पडले होते.

## २१ मार्च ४५

सकाळी दहा वाजता नंबर नाइनटीन्थ इंडियन डिव्हिजनची फोर्ट डफरीनमध्ये सेरीमोनियल परेड झाली. फोर्टीन्थ आर्मी कमांडर जनरल स्लिमनी किल्ल्यावर विजय-ध्वज लावला. डिव्हिजनला शाबासकी दिली. मंडालेच्या भूमीवर आता एकही दुष्मन राहिला नव्हता. मंडाले खरेखुरे सर झाले.

## २२ मार्च ४५

आज दुपारी साडेबारा वाजता साऊथ ईस्ट एशिया कमांडचे सुप्रीम कमांडर अॅडमिरल लॉर्ड लुई माऊंटबॅटन यांनी टँक स्क्वाड्रन आणि आमची ग्रिनेडियर्सची 'ए' कंपनी यांना टँक हारबरमध्ये भेट दिली.

यापुढे टँकचे व ग्रिनेडियर कंपनीचे १९ नंबरच्या डिव्हिजनबरोबरचे काम संपले आहे. आता आम्ही नंबर २० डिव्हिजनबरोबर पुढील स्वाऱ्यांवर जाणार आहोत.

(क्रमशः)

सौ. पुष्पा भावे



# ' तुघलक 'चा मराठी अवतार

मूळ ऐतिहासिक वा पौराणिक कथावस्तूंवर, त्यांतील घटनात्मक नाट्यावर, मानसिक संघर्षाचे अधिक तरल नाट्य आरोपित करण्याचे अनेक कल्पक यत्न युरोपातील रंगमंचावर मागील युगातच येऊन गेले. आपल्या रंगमंचावर हे यत्न विशेष निष्ठेने झालेले दिसत नाहीत. अजून आपल्या नाटककारांनी ऐतिहासिक वा पौराणिक नाट्यकल्पनेतील घटनात्मक कुतुहलाच्या अभावी निर्माण होणाऱ्या शक्यतेचा शोध घेतलेला दिसत नाही. प्रा. कानेटकरांनी 'रायगडा'त मर्यादित अर्थाने हा प्रयोग केला. श्री. शिरवाडकरांच्या 'ययाति आणि देवयानी' या नाटकात रूढ पौराणिक नाटकाची रचना, आदर्शवादी जीवनतत्त्वज्ञान आणि महाभारतीय कथानकातील दारुण शोकात्मिका यात असह्य विरोध निर्माण झालेला दिसतो. परंतु मराठी रंगमंचावर जे अजून कोणा नाटककाराने यशस्वीपणे केलेले नाही ते, कन्नड नाटककार श्री. गिरीश कर्नाड यांनी आपल्या 'ययाती' व 'तुघलक' या नाटकात, कल्पकतेने, संवेदनाक्षमतेने साधले आहे.

ज्या वर्तमानकालाशी लेखक-वाचक वा प्रेक्षक-कलाकार संबद्ध आहेत त्यापासून त्यांना जरा दूर नेले तर सामाजिक समस्या, तात्कालिक संघर्ष यापलीकडे जाऊन मानवी अस्तित्वाच्या मूळ नाट्याचा वेध घेता येईल; प्रतिकृतिवादी रंगमंचाच्या खुजेपणाच्यापलीकडे जाता येईल, हे श्री. कर्नाड यांनी ओळखले आहे. म्हणून त्यांच्या 'ययाती' नाटकातील पुरु माणसाच्या संघर्षाकडे अलिप्ततेने पाहून आपल्या तारुण्याचे सहज दान करू शकतो; भूतकालाशी, परंपरांशी असलेला आपला संबंध नाकारून चालू क्षणाचे अस्तित्व उपाधीविना जगण्याचा जाणीवपूर्वक यत्न करतो. तुघलक – वेडा महंमद या नावाने शालेय इतिहासामध्ये मनोरंजक वाटणारे एक प्रकरण या नाटककाराने कवीच्या संवेदनक्षमतेने नाटक या स्वरूपात मांडले आहे. तुघलकाचे वेड भूतकालाशी असलेले परपरेचे नाते तोडण्याचे आहे, नवनिर्माण करण्याचे आहे; आणि हे करताना सरजामशाहीमधील कट-कारस्थाने, शिथिल वृत्ती यांच्याशी तो लढतो आहे. त्यापेक्षाही स्वतःच्या रक्तातील परंपरेशी, क्रूरतेशी झगडतो आहे. कोणत्याही उत्तुंग व्यक्तिमत्त्वाला अपरिहार्य असणारा

एकाकीपणा तुघलकाच्या संदर्भात अधिक तीव्र झाला आहे. कोणी भयानें थरथरत त्याच्यापासून बाजूला होत आहे, तर कोणी त्याला वेडा ठरवून त्याला फसविण्याच्या आनंदात मग्न आहे. तुघलकाचा संघर्ष हा एका विशिष्ट काळातील कोणा एका मुसलमान बादशहाचा संघर्ष नाही. जाणीवपूर्वक जगण्याचा यत्न करणाऱ्या कोणाही मानवी जीवाचा चिंतनाच्या पातळीवरील सृजनात्मक स्वप्ने आणि ज्याला स्पर्श होईल त्यांचा चिखल करणारे पार्थिवत्व, यातील हा शाश्वत संघर्ष आहे. मूळ कन्नड नाटकाचा लेखकानेच केलेला इंग्रजी अनुवाद 'Between Two Kingdoms' असे उपशीर्षक घेऊन येतो यांचा अर्थ लक्षणीय आहे. हा केवळ दिल्ली ते दौलताबाद प्रवास नाही हे सूज्ञास सांगायला नकोच !

गतवर्षी वर उल्लेखिलेल्या इंग्रजी अनुवादाचा प्रयोग मुंबईत झाला होता. त्यात कबीर बेदी या नटाने तुघलकाचे काम केले होते. या नाटकाचा पडदा उघडला त्यावेळी एक भव्यकाय पुरुष (तुघलक) किल्ल्याच्या दरवाजासमोर प्रेक्षकांना पाठमोरा उभा होता; सेवक त्याला कपडे करायला मदत करीत होते. या पहिल्याच दृश्याने 'तुघलक' या नाटकातील वातावरण व लेखकाचा दृष्टिकोन प्रस्थापित झाला. केवलात्वामध्ये एकाकी असणारा मनुष्य बाह्य तपशीलाने हळुहळू जगाशी बांधला जातो हे त्या राजवस्त्रे चढविण्याच्या त्या संथ जाणीवपूर्वक क्रियेतून व्यक्त झाले. अजस्त्र महालाचा भास निर्माण करणाऱ्या प्रवेशद्वारानेही हा अर्थ व्यक्त करण्यास मदत केली होती. हा इंग्रजी प्रयोग पाहात असताना असे वाटले होते की, या नाटकाचे मराठी रूपांतर झाल्यास मराठीतील नवे नट व दिग्दर्शक त्यास अधिक न्याय देऊ शकतील. आणि काही दिवसांनी खरोखरच श्री. अरविंद देशपांडे यांच्या 'आविष्कार' या नव्या संस्थेतर्फे 'तुघलक'चे श्री. तेंडुलकरांनी केलेले रूपांतर सादर होणार असे ऐकले तेव्हा 'आविष्कार'च्या या नव्या प्रयोगाविषयी औत्सुक्य निर्माण झाले. तुघलकाचे काम श्री. अरुण सरनाईक करणार हे ऐकल्यावर प्रेक्षकजगतात आश्चर्य व्यक्त करण्यात आले. परंतु ज्यांना 'हा खेळ सावल्यांचा' या नाटकातील श्री. सरनाईक यांचा एस्. के. चा अभिनय आठवत होता, त्यांना श्री. देशपांड्यांच्या या निवडीबद्दल कौतुकच अधिक वाटत होते.

१७ ऑगस्ट रोजी 'तुघलक'च्या पहिल्या प्रयोगाला जाताना अशा अनेक अपेक्षा घेऊनच प्रेक्षक आले होते. हातामध्ये एक देखणी 'वजनदार' स्मरणिका पडली, त्यातील जाहिरातींप्रमाणेच नाट्यप्रयोगास साहाय्य करणाऱ्यांची नामावली दबदबा निर्माण करणारी होती. पडदा उघडला आणि नाटकाला प्रारंभ झाला तोच एका समूहाच्या प्रवेशाने. इंग्रजी प्रयोगातील क्षणार्धात प्रेक्षक आणि नाट्यवस्तूंतील लक्षणीय नाते प्रस्थापित करणारी दृश्यप्रतिमा दिग्दर्शकाने वगळली होती. समूह दृश्यातील सफाईच्या अभावामुळे तर हा नाट्यप्रारंभ विशेष खटकला. श्री. अरुण सरनाईक यांनी मात्र रंगमंचावरील पहिल्या प्रवेशापासूनच 'तुघलका'ची भूमिका

तिच्यातील विविधांगी व्यक्तिमत्त्वाविषयीच्या जाणीवेने पेलली. श्री. सरनाईक यांच्या आवाजाचा नैसर्गिक कमकुवतपणा त्यांनी आपल्या अभिनयाचा सूर खालच्या पट्टीत लावून सावरला. 'तुघलक' या नाटकाची रचनाच अशी आहे की त्यामध्ये तुघलकालाच महत्त्व असले तरी इतिहासकार बरनी, राजकारणी नजीब, संत इमामउद्दीन, फसलेला शिहाबुद्दीन आणि तुघलकाची सावत्र माता यांच्याशी असलेल्या नात्यांमुळे तुघलकाच्या पात्राला विविध कोन प्राप्त होतात. परंतु 'आविष्कार'ने सादर केलेल्या या प्रयोगात, श्री. सरनाईक वजा करता, कोणाही नटाने या नाटकाच्या स्वरूपाची ही समज दर्शविली नाही. आपण या नाटकात दुय्यम आहोत अशाच थिल्लर भावनेने रवी पटवर्धन (बरनी), बाबा खानविलकर (नजीब), विनोद दोशी (शहाबुद्दीन) यांनी कामे केली; तर धूर्त रतनसिंहाचे श्री. श्रीकांत लागू यांनी उभे केलेले रूप आणि स्वरूप विनोदी झाले होते. हा दोष केवळ या नटांचा असणे शक्य नाही. दिग्दर्शक अरविंद देशपांडे यांची समज व नेतृत्व इथे कमी पडलेले दिसले. शेख इमामउद्दीन आणि तुघलक यांच्यातील साम्य दिग्दर्शकाने जाणीवपूर्वक प्रस्थापित केले आणि त्यासाठी श्री. कमलाकर सारंग यांची निवड केली होती; परंतु इमामाच्या व्यक्तिमत्त्वाचे अनाकलनीय असे चुंबकत्व श्री. सारंग व्यक्त करू शकले नाहीत. इंग्रजी प्रयोगात (मला वाटते) श्री. कर्सन डिकुन्हा यांनी हे पात्र फार प्रत्ययकारितेने उभे केले होते. तुघलकाच्या प्रामाणिकतेविषयी संशय निर्माण करणारा त्याच्या भावाचा व पित्याचा अपघाती मृत्यू, त्याच्याशी वेगळे नाते असणारी सावत्र माता, पुढे तिच्यावर येणारा नजीबच्या खुनाचा आरोप, यातील अंतःसंबंध सूचित करून नाटककाराने कौशल्याने तुघलक आणि सावत्र माता यांच्यातील अनैसर्गिक संबंध नर्मतेने व्यक्त केला आहे. परंतु सावत्र मातेचा अभिनय करणाऱ्या सौ. सुनीला प्रधान यांच्या तिरप्या ऐतिहासिक सुराच्या सांकेतिक पद्धतीतून काहीच व्यक्त न झाल्याने तिसऱ्या अंकातील तुघलकाच्या उद्रेकाची अर्थपूर्णता नाहीशी झाली.

श्री. कर्नाड यांनी, तुघलकाच्यानंतर गादीवर येणाऱ्या घियासुद्दीनविषयी काही माहिती उपलब्ध नसण्याचा नाट्यपूर्ण उपयोग केला आहे. तुघलकाच्या प्रत्येक भव्य स्वप्नाचे विडंबन करणाऱ्या, घियासुद्दीनच्या वेषातील अझीझला तुघलक शिक्षा न करता जाऊ देतो – यातून त्यांनी इतिहास सुचविला आहे. धूर्त, व्यवहारी अझीझची भूमिका श्री. नारायण पै यांनी अत्यंत असमंजसपणे सादर केली. तो एखादा भुरटा चोर वाटावा असे त्याचे व्यक्तित्व त्यांनी उभे केले. आझम आणि अझीझचे प्रवेश तर पै आणि कोल्हटकर यांनी एखाद्या श्री. कृ. कोल्हटकरी नाटकातील विनोदी प्रवेशासारखे केले. परंतु या नाटकातील अझीझला कथानकाच्या दृष्टिकोनातूनच नाही तर 'तुघलक'च्या मूलभूत कथावस्तूंच्या संदर्भात महत्त्वाचे स्थान होते. वर उल्लेखिलेल्या प्रवेशातील विनोदाचे नाते तुघलकच्या कारुण्याशी

होते; पण या प्रयोगात ते व्यक्त झाले नाही.

दिग्दर्शक म्हणून श्री. अरविंद देशपांडे यांच्याविषयी मला आदर आहे. त्यामुळेच 'बाकी इतिहास', 'शांतता कोर्ट चालू आहे', 'झाला अनंत हनुमंत' यासारखी नाटके कुशलतेने बसविणाऱ्या त्यांनी या नाटकाच्या दिग्दर्शनात ढोबळ चुका का कराव्यात हे उमजले नाही. त्याहीपेक्षा, नेत्रदीपक निर्मितीचा – हिंदी चित्रपटासारखा – हव्यास त्यांनी का बाळगला, ते कधी काळी त्यांच्या मनी कसे आले, तेच समजत नाही. दिल्ली ते दौलताबाद प्रवास छायानाट्याने दर्शवून टाळी घ्यायला 'तुघलक'सारखे गंभीर नाट्य त्यांनी का निवडले? तापससेन, जितेंद्र अभिषेकी, राजकमल कलामंदिर – इत्यादी श्रेयनामावलीची श्री. देशपांड्यांना गरज काय? तुघलक पाहायला येणारा प्रेक्षक 'ललितकलादर्श'चा प्रेक्षकवर्ग नाही याची जाणीव राखून त्यांनी या नाटकाची निर्मिती हाती घेतली असती, अथवा केवळ स्वत:च्या नाट्यविषयक जाणीवेवर विश्वास ठेवला असता तर तुघलक या नाटकाला न्याय मिळाला असता.

हा अभिप्राय काहीसा कटु आहे, याला एक सबळ कारण आहे. 'रंगायन' या संस्थेतून वेगळे होऊन श्री. देशपांडे आणि त्यांचे सहकारी यांनी 'आविष्कार'ही नाट्यसंस्था स्थापन केली. या संस्थेचे नवे असे हे पहिले नाटक आहे. महाराष्ट्रातील सर्वांत प्रगत प्रायोगिक नाट्यसंस्थेतील दिग्दर्शक, नट जेव्हा व्यावसायिक रंगमंचावर येतात तेव्हा साहजिकच त्यांनी रंगमंच माध्यमाच्या कलापूर्णतेत नवी भर घालावी अशी अपेक्षा असते. याउलट तुघलकसारख्या संवेदनाक्षम नाटकाची निवड करूनही श्री. देशपांडे व्यावसायिक रंगभूमीवरील भव्यतेच्या हव्यासाला बळी पडले आहेत. चित्रपटाच्या क्षेत्रात व्ही. शांतारामसारख्यांचा ऱ्हास डोळ्यांसमोर असताना आजच्या काळात श्री. देशपांड्यांसारख्या रंगभूमीवर सुजाण प्रेम करणाऱ्या कलावंताने त्याच चुका करू नयेत अशी मन:पूर्वक इच्छा आहे. तुघलक या नाटकातून मराठी नाटककार इतिहासाच्यापलीकडे जाण्याची स्फूर्ती घेतील अशी आशा आहे. श्री. अरुण सरनाईक यांची नट म्हणून कुवत नाट्यदिग्दर्शक यापुढे लक्षात घेतील काय?

पृष्ठ ७ वरून

बाबुराव गोखले, बबन प्रभू, वगैरे नाटकवाल्यांना आणि त्याचबरोबर आमच्यासारख्या त्यांच्या उत्साही पाठीराख्यांना दिलासाच आहे! दात्यांना जी जनमानसात पत मिळाली ती खाडीलकर, देवल, गडकरी, वर्तक ह्यांच्या अभिजात कलाकृतींमुळे नि चार पैसे मिळाले ते औंधकरांच्या, जोशीवकीलांच्या नि ताम्हणकरांच्या नाटकांमुळे, हा कबुलीजबाब खुद्द त्यांनीच आपल्या बासष्टाव्या वाढदिवसाच्यावेळी दिला होता. ध्येयवादी नाटकं करून महाराष्ट्र नाटक मंडळी चोवीस हजार रुपयांच्या खड्डयात तेव्हा उतरली होती. ते सगळे चोवीसही हजार फिटून वर कनवटीला दिडक्या लावण्याचा योग आणून दिला शिरपूरच्या जोशीवकीलांच्या 'विचित्र लीला' ह्या विनोदी खेळानेच! बाकी, हा माणूस मात्र आरपार प्रांजळ होता ह्यात शंकाच नाही. नाटकांच्याबाबतीत त्यांचे जे होरे चुकले तेही त्यांनी मोकळ्या मनाने कबूल केले. गडकऱ्यांचं 'प्रेमसन्यास' आणि जोशीवकीलांचं 'विचित्र लीला' जोरदार फटका खाणार हे त्यांचं भाकीत चुकलं. ती दोन्ही नाटकं कंपनीला लाभदायक ठरली. अण्णा कारखानिसांचं 'राजाचं बंड', भोळ्यांचं 'सरलादेवी', काकांचं 'सवतीमत्सर' ही कालानुकूल नाटकं किफायतशीर होतील अशी त्यांची अटकळ होती ती फसली. ही तिन्ही नाटकं कोसळली! मात्र 'सवतीमत्सरा'तल्या श्रीरामप्रभूंच्या भूमिकेने दात्यांना अमाप लौकिक मिळवून दिला हे सत्य आहे, रामाच्या रूपात तर ते म्हणे प्रति प्रभुरामचंद्रच भासत. काणेकर तर म्हणाले. 'खरोखरचा राम दात्यांच्या रामाइतका सुंदर आणि सात्विक होता की काय शंकाच आहे!' त्या पिढीतले सगळेच जाणकार सांगतात की, रामाची भूमिका दाते दृष्ट लागण्यासारखी करीत. रामसौंदर्यातली शुचिर्भूतता आणि मोहकता दात्यांनी डोळ्यातल्या शांत तेजाने साकार करून दाखवली. पां. वा. गाडगीळांसारखा नाटकांच्या भानगडीत न पडणारा पत्रपंडितही मला म्हणाला, 'काय हो ते महाराष्ट्र नाटक मंडळीतले लोक! डावं उजवं करायला मुळी जागाच नाही. गणू शिवर्यांची 'बेबंदशाही'मधली भूमिका करावी तर फक्त दात्यांनीच!' पेंडसे म्हणाले, 'दात्यांचा 'आग्ऱ्याहून सुटका'मधला औरंगजेब पाहून लोकांचं रक्त पेटे. जळगावला दंगल पेटेपर्यंत मजल गेली होती.' ह्या सर्व शिफारसपत्रांचा अर्थ आणि अन्वय एकच आहे: रंगदेवता दात्यांना वश होती. मात्र आपल्याला जे अफाट यश मिळालं त्यात अंगच्या गुणांबरोबर गुरुजनांच्या कित्यांचा, परिस्थितीचा आणि खूपसा योगायोगाचाच भाग आहे, हे न विसरण्याचं भानही त्यांच्यापाशी होतं. योगायोगाची महती त्यांना पूर्णपणे पटली होती.

दात्यांचं उमेदीतलं विजयपर्व संपल्यावर आमचा जन्म झाला, ही काळाचीच

करामत म्हणायची. एखाद्या मोडकळीस आलेल्या गढीच्या एकाच भागाचं प्रवासात आपल्याला सतत दर्शन होत राहावं, तसं आमच्या पिढीला दात्यांचं एकच एक म्हातारवयातलं दर्शन होत राहिलं. रंगभूमीवर आम्ही त्यांना लखलखताना पाहिलं ते दोन-तीन भूमिकांमध्येच. 'खडाष्टक'मधली कर्कशराव, 'आंधळ्यांची शाळा'-मध्ये मनोहर, आणि 'सवाई माधवरावांचा मृत्यू'मध्ये केशवशास्त्री, ह्या त्या तीन थोर भूमिका होत. त्या करण्यात त्यांची हातोटीच होती. त्यांचं अधिक जवळून दर्शन आकाशवाणीवर झालं. तालमीला ते मोठे खाष्ट वाटले. त्यांचं दोन Weak Points ही लक्षात आले. ते पूर्वी नेहमी सूट वापरायचे नि आम्हा मराठी कलावंतां-बरोबर बोलताना शक्यतो इंग्रजी शब्दप्रयोग करायचे ! आपलं शिक्षण पाच बुकां-वरचं संपुष्टात आलं, विद्वानांची पंगत आपल्याला लाभली नाही, ह्या न्यूनगडात्मक अंतस्थ जाणिवेचा तो एक बाह्य उद्रेक असावा, दुसरं काय ? एकदा आकाशवाणी-वर त्यांनी गडकऱ्यांच्या स्वगतवाचनाचा बहारदार कार्यक्रम केला होता. एकदा कै. गोपाळकृष्ण भोब्यांनी दात्यांची सुंदर मुलाखत आकाशवाणीसाठी घेतली होती. परवापरवापर्यंत ते आमच्या स्टुडिओत आमंत्रणावरून येत असत. नुकतंच त्यांचं 'सवाई माधवरावाचा मृत्यू' ध्वनिमुद्रित झालं तेव्हा ते आले होते. अर्थात ब्याऐंशीव्या वर्षीच्या थकलेल्या अवस्थेत. दात्यांचं नाटक बसवणं हासुद्धा एक अनु-भवच असे. प्रथम ते नटांना गोलाकार बसवून नाटकाची चोपडी 'अ'पासून 'ज्ञ' पर्यंत शब्दशः वाचून दाखवीत. मग नाटकाचा गाभा काय आहे, पात्रपरिचय कसा झाला आहे, भावनांचे अरोहावरोह कसे गुंतवलेले आहेत ते नीट समजावून देत. मग पुन्हा संपूर्ण चोपडीची पाच-सहा सामुदायिक पठणं करीत. मग पात्रांमध्ये भूमिका वाटप. मग प्रत्येक शब्दाची, प्रत्येक वाक्याची फोड करून प्रत्येक पात्राला वाक्यांची फेक शिकवत. त्यानंतर रंगभूमीवरल्या हालचाली निश्चित करीत. हे प्राथमिक कुदळकाम झालं की, डोळे मिटून बसत आणि प्रत्येक पात्राला हालचाली करून वाक्यं उच्चारायला सांगत. डोळे मिटून ठेवल्यामुळे त्यांचं चित्त शब्दांच्या फेकीवर एकाग्र होई. शिवाय पात्राचं वावरणं कसं चाललं आहे ते त्यांना शब्द ज्या अंतरावरून उच्चारला जाई, त्यावरून कळे. मूळ नाटकाची रंगावृत्तीही ते फारच चोखंदळपणे तयार करीत. लेखकाला संवादात नाटकाच्या रंगतीच्या दृष्टीने पुन्हा पुन्हा दुरुस्ती करायला लावायला त्यांना काडीचाही संकोच वाटत नसे. सौ. मुक्ताबाई दीक्षितांना त्यांच्या 'जुगार'चे काही काही दुवे त्यांनी सात-सात, आठ-आठ वेळा दुरुस्त करायाला लावले होते. त्यांच्या हातात पडलेलं प्रायः प्रत्येक नाटक त्यांनी, त्यांच्याच शब्दात सांगायचं तर 'दुरुस्त आणि साफसूफ' करून मगच बसवायला घेतलं. खाडीलकर हा ह्या दुरुस्तीचा एकमेव अपवाद होता हे उघडच आहे.

अगदी काल परवापर्यंत दाते कुठल्या ना कुठल्या नाट्यगृहाच्या आसपास

रेंगाळताना अगदी हमखास दिसायचेच. अलीकडे लांब हाताचा बुशशर्ट, पॅन्ट हाच त्यांचा वेष असे. ते बरेचसे खंगलेलेही दिसत. दम्याच्या प्रबळ दुखण्याने त्यांचा देह पार पोखरून काढलेला होता. तरीही ऐंशीवर्षं उलटली तरी गृहस्थ डॉ. भालेराव मार्गावरल्या संघ मंदिराचे जिने चढायचा. जाड काचांचा चष्मा लावून काठी टेकत टेकत जाताना त्यांना रात्रीच्या वेळी पाहिलं की मनात क्षणभर धस्स व्हायचं. वाटायचं, हे नीट जातील ना घरी ? ते जायचे. दादरच्या विजयनगरातलं त्याचं बिऱ्हाड चौथ्या माळ्यावर होतं. ते माळे ते ह्या उतार वयातही रोज चढाउतरायचे. वयाच्या पंच्यहत्तराव्या वर्षापर्यंत ते 'राजकमल' मध्ये नट म्हणून नोकरीवर जायचे. ह्या चित्रपटाच्या धंद्यात ते पस्तीस सालापासून पुढे तीस वर्षं राबले. प्रभातच्या 'अमृतमंथन' मध्ये राजगुरूची भूमिका करून त्यांनी चित्रपटीय अभिनयाचा श्रीकार टाकला. तिथेच 'शेजारी', 'कुंकू' मधल्या उत्कट भूमिका करून शिरपेंच मिळवले. 'प्रभात' मध्ये मात्र ते नोकरनाम्याने नव्हते. के. नारायण काळे, केशवराव भोळे, वसंत ठेंगडी ही कलावंत मंडळी नोकरपटावर होती. दाते ठराविक अल्प मुदतीच्या करारावर असत. एका विशिष्ट चित्रपटापुरताच त्यांचा प्रभातशी करार होई. तो चित्रपट संपला की दाते मोकळे होत. मग पुन्हा नव्या चित्रपटाचा नवा करार होई. 'प्रभात' मध्ये दात्यांचे नाव झाले. त्यांच्या नावाला मूल्य प्राप्त झाले. नंतर त्यांनी शालिनी, रणजित, ग्वालानी, मकरंद वगैरे चित्रसंस्थातून करारावर कामं केली. ज्याला नोकरी म्हणता येईल अशी त्यांनी 'राजकमल' मध्ये वर्षो न वर्षं केली. 'सावतामाळी', 'अंधों की दुनिया', हे राजकमलचे चित्रपट दात्यांनीच दिग्दर्शित केले होते. त्या क्षेत्रात दात्यांना दोन गोष्टी फार नडल्या. एक म्हणजे त्यांचं साफ गावठी हिंदी. दुसरं म्हणजे त्यांचं मालकापुढे मर्यादेबाहेर नरम वागणं. पण कुणी सांगावं, पोटापाण्यासाठी त्यांनी ती कळ सोसलीही असेल! राजकमलची नोकरी गेल्यानंतर मात्र ते दुसरीकडे कुठे गेले नाहीत. त्याची तीव्र आवश्यकताही नव्हती. 'राजकमल' ची चाकरीही त्यांनी निष्ठेने, सालसपणे केली. रोज सकाळी नवाला ते दूधपाव खाऊन निघत. दुपारी न जेवता ते रात्रीपर्यंत काम करीत. रात्री फक्त एकदाच जेवत. त्यांचा आहार म्हातारवयामुळे अगदी साधा असे. एकेकाळी कोल्हापूरी थाटाच्या सागुतीवर चवीने ताव मारणारे दाते आता तेलकट, तुपकट काहीही उष्टावत नसत.

केशवरावांचा गृहस्थाश्रम धन्य झाला होता. ते आता दैनंदिन संसारातून पूर्णपणे अलिप्त झाले होते. एकतर ते दम्याने सदाचेच हैराण झालेले असत. त्यामुळे त्यांची खाट हेच त्यांचं सोईस्कर विश्व झालं होतं. दिवसाचा दिवस ते त्यावर बसून वाचनात काढत. घरातल्या वर्दळीकडे त्यांचं लक्षच नसे. त्यांच्या कामाचं कोणी आलं तर तेवढ्यापुरता ते त्याशी परामर्ष घेत. तो गेला की डोळे हातातल्या पुस्तकात खुपसत. कारखानीस, खाडीलकर, वगैरेंच्या तालमीत तयार झाल्यामुळे दाते

पट्टीचे व्यासंगी बनले होते. त्यांचे वाचन सतत चालू असे. मागच्या पिढीतले खांडेकर, माडखोलकर त्यांना फार आवडत. विशेषतः खांडेकरांच्या वाङ्मयातली ध्येयासक्ती त्यांना अधिक रुचे. नवीनांमध्ये विजय तेंडुलकरांची नाटकं त्यांच्या पसंतीला उतरत. इतर गद्य लेखनात सौ. मृणालिनी देसाईंचं लेखन त्यांना फारच आवडू लागलं होतं. त्यांनी बाईंना पत्र टाकून मुद्दाम भेटायलाही अलीकडेच बोलावलं होतं. जुन्या रंगभूमीबाबत बालगंधर्वांना त्यांचा कायमचाच मुजरा असे. ते नेहमी म्हणत, 'नारायणरावांसारखे नारायणरावच ! परमेश्वराची ती एक देणगी आहे. तिची भ्रष्ट नक्कल करू नका. तुमचं हसू होईल.' हल्लीच्या नटांमध्ये त्यांना डॉ. लागूंचा अभिनय फार आवडे, आणि आशालता वाबगावकरवर तर ते निहायत खूष होते. तिच्या सूक्ष्म अभिनयाने आपणाला मंत्रमुग्ध केलं, असं ते सांगत. तसा सर्वच नवीनांना त्यांचा सतत पाठिंबा असे. अरविंद देशपांडे, नारायण पै, वगैरे 'रंगायन', 'अविष्कार'च्या नटसंचाबद्दल त्यांना फार आपुलकी वाटे. दात्यांचे हात आशीर्वादासाठी सदैव सिद्ध असत म्हणून नवी मंडळी नेहमी त्यांच्या आतबाहेर करीत असत. नटवर्य दाते आणि ही उगवती नवी पिढी ह्यांचं कायमचं नातं जुळवून देण्याचं फार मोठं काम 'सत्यकथे'च्या श्री. पु. भागवत आणि राम पटवर्धनांनी एक्कावनसाली केशवराव दाते गौरवअंक काढून केलेलं आहे.

दात्यांनी देव-देव केलं नाही. ब्राह्मणी कर्मकांडाचा तो भाग त्यांनी पत्नीकडे सोपवला होता. सकाळी स्नानाच्या अगोदर ते काही खात नसत. स्नान केल्यानंतर दहा पंधरा मिनिटं ते ईशचिंतन करीत. तेवढंच त्यांना पुरे. मात्र काही काही माणसांना त्यांनी अगदी देवासारखं मानलं. काका खाडीलकर हे सर्वच नाटकवाल्यांचे देव होते. दात्यांच्या पुरते देवांचे देव होते. 'नाट्य-मन्वंतर' ही काळे, वर्तक काणेकर, डॉ. चिटणीस, ह्या देवबीव न ओळखणाऱ्या तरूणांची नवी नाट्यसंस्था होती आणि दाते त्यांना मिळालेले होते. ही संस्था स्थापन झाल्यावर त्यांना वाटलं आता मराठी रंगभूमीवर जर नवं पर्व सुरू होणार तर अशा शुभारंभाच्या वेळी काकांचे आशीर्वाद घेतलेले बरे. पण हा विचार डॉ. चिटणीसांना वगैरे रुचणंच अशक्य होतं. म्हणून ते काणेकरांकडे गेले. म्हणाले,

'मला वाटतंय, आपण काकांचे आशीर्वाद घेऊ या.'

'त्यात वाईट काहीच नाही. चला. फार फार तर काय, काका 'शुभंभवति'च म्हणणार' काणेकर म्हणाले. दात्यांना जोर चढला. ते काकांच्या कांदेवाडीतल्या बिऱ्हाडी आले. काका होतेच. म्हणाले,

'काय ?'

'आम्ही 'नाट्य-मन्वंतर' नावाची नवी नाट्यसंस्था सुरू करीत आहोत.'

'चांगली गोष्ट आहे ! आगे बढो ! पण नाटकात गाणी आहेत ना ?'

'आहेत.'

'मग ठीक आहे! नाटकात सुंदर संगीत हवं. मग आनंद मिळतो. धंद्यातही जम बसतो. तुमची नटी गाते ना?'

'हो.'

'चांगली गाते?'

'हो.'

'मग भलं होईल तुमचं.'

दाते परत आले. 'नाट्य-मन्वंतर' काकांच्या छुप्या शुभाशीर्वादाने सुरू झालं.


**मर्दानी धर्मेन्द्र व मदमस्त लीना या चित्तथरारक रोमहर्षक चित्रांत प्रथमच एकत्र येत आहेत....**



विनस पिक्चर्स (मद्रास)

**रखवाला**

ईस्टमेनकलरमें

दिग्दर्शक

**ए. सुब्बाराव**

संगीत

**कल्याणजी आनंदजी**

निर्माते

**एस्. कृष्णमूर्ती**

भू.:— **धर्मेन्द्र, लीना चंदावरकर, विनोद खन्ना, प्रकाश पांडे, मदनपूरी, बेबी गायत्री, जगदीप, संजाना.**

| **अप्सरा** | **रेक्स** | **लोटस** | **चित्रा** |
|---|---|---|---|
| २॥।, ६, ९। | १२, ३, ६, ९ | १२, ३, ६, ९ | ३, ६, ९ |
| **पॅलेस** | **सिटीलाईट** | **रुपम** | **नेपच्यून** |
| ११॥।, ३, ६, ९। | १२, ३, ६, ९ | ३, ६, ९ | (वांद्रे) |

**डीफेन्स** (कुलाबा) **मीलन** (सांताक्रूझ) **अंबर–संगम** (अंधेरी) **हंजर** (जोगेश्वरी) **टीपीवाला** (गोरेगांव) **न्यूइरा–संगीता** (मालाड) **जया** (बोरीवली) **नटराज** (चेंबूर) **श्रेयस** (घाटकोपर) **आकाश–कल्पना** (कुर्ला) **कृष्ण** (भांडूप) **गणेश–अशोक** (ठाणे) **कृष्ण** (कल्याण) **सपना** (उल्हासनगर)

— डिलक्स पिक्चर्स प्रकाशन —

घरात दाते फार तृप्त होते ह्याचं श्रेय दात्यांच्या धीम्या स्वभावाकडे जितकं जातं, त्यापेक्षाही वहिनींच्या समंजस, सहकारी स्वभावाकडे आणि काटकसरी वृत्तीकडे अधिकांश जातं. दाते मुंबईत कामाला असत तेव्हा त्यांचा संसार पुण्यातच होता. मग ' राजकमल 'नंतर दादरला आला. दात्यांचा जगाचा बराबाईट अनुभवही उदंड होता. त्यामुळे गृहस्थीबाण्याने संसाराचरण करून त्यांनी ' सदगृहस्थ कलावंत ' ही मिरास मिळवली. बाई, बुवा, बाटली, घोडे वगैरेंच्या ते वाटेलाही कधी गेले नाहीत, कारण ते अण्णा कारखानिसांचा, भागवतांचा कित्ता गिरवीत होते. इथे ते इतर नटवर्यांपासून अलग पडून पार्श्वनाथ आळतेकरांच्या सोज्वळ पंगतीला येतात. त्यांचा थोरला मुलगा रघुवीर ह्याला संसारयात्रा सुखकर व्हावी म्हणून ते बरोबरीच्या मित्रत्त्वाच्या नात्याने सल्ला देत असत. एकदा रघुवीर घरगुती कपडे घालून नाटयगृहात गेला तर दात्यांनी त्यांना बाहेर घालवलं आणि सांगितलं, ' चांगले कपडे घातल्याशिवाय रंगपटात पाऊल टाकायचं नाही. ' चांगले कपडे हा दात्यांचा खास षौक होता. एकदा रघुवीर घरी भांडले आणि न जेवताच कामावर गेले. आता हा फार्स ह्या ना त्या रीतीने घरोघरी होतोच, पण दात्यांना ते खटकलं. मुलगा न जेवता कामावर गेला म्हणून तेही त्यादिवशी जेवले नाहीत. नंतर रघुवीरला म्हणाले, ' तू कुटुंबप्रमुख. तू असं इतरांना नाराज करता कामा नये. कुटुंबातल्या तुझ्या स्थानामुळे तुझे मायेचे कुटुंबीय सुरूवातीला हे वागणं चालवून घेतील. पण तू जर वरचेवर असा त्रागा करायला लागलास तर तेही तुला किंमत देईनासे होतील. मग तुझी स्थिती शोचनीय होईल. लक्षात ठेव. ' संसारी गृहस्थ म्हणून ते फार निस्पृहपणे वागत. फारच भीड पडली तर तिकिटं काढून नाटक-सीनेमे पाहाण्याच्या ह्या काळात ते फारच भीड पडली तर मोफत पासावर चैन करत. घरातल्या कुणालाही ते फुकट नाटक पाहायला देत नसत. सांगलीकरांना त्यांच्या अमृत महोत्सवाच्या सोहोळयासाठी त्यांना मानाने आमंत्रण दिलं. दात्यांनी ते स्वीकारलं. सांगलीकरांनी पहिल्या वर्गाची पाच तिकिटं कुटुंबियांच्या सोईसाठी पाठवून दिली. दात्यांनी त्यातलं स्वतःपुरतं फक्त एकच ठेवून घेतलं नि उरलेली चार तिकीटं साभार परत केली. सांगलीला ते सत्कारासाठी एकटेच गेले. ह्या चक्रमपणाला काय म्हणातात ? ह्याला म्हणतात दक्षता.

चार वर्षांपूर्वी झालेल्या पत्नीवियोगानंतर कुटुंबप्रमुख दाते एकूण विरक्तच झाले. ते हिंडत, फिरत. नाटक-सिनेमे स्वखर्चाने बघत. समारंभांना जात, येत. निद्रानाशाची व्यथा जडल्यामुळे ते खूप उशीरापर्यंत वाचत बसत. रघुवीरांना म्हणत, ' आता आमचं जगणं पुरे झालं. आता आम्ही विंगेत जाऊन कपडे बदलावेत हेच बरं ! ' पण केशवरावांसारख्या लाख माणसाला विंगेत कोण जाऊ देणार ? ते पडल्या पडल्या गीतेचा पंधरावा अध्याय वाचीत, दासबोध वाचीत. नव्यांची विचारपूस करीत.

२५ सप्टेंबर १९७१

दिवस असे पारव्यांच्या थव्यांसारखे भुर्कन चालले होते.

एक दिवस दाते म्हणाले, 'माझ्या हृदयात सुया खुपसल्यासारखं वाटतंय.' डॉक्टरना बोलावणं गेलं. हृदयविकाराच्या ओझरत्या झटक्याचं निदान झालं. दाते अंथरूणाला खिळले. पुढे बरे झाले, पण कुणाशी काही बोलेचनात. पण मुद्‌लात नट असलेला माणूस असा किती दिवस घुमा राहाणार? ते बोलू, फिरू लागले. मंडळीही भेटीला येऊ जाऊ लागली. त्यांची तंद्री लागली तर ते बोलत. नाहीतर ते स्वतःच्या जगात मस्तीत राहात. हातात पुस्तक घेत. त्यांना इतःपर काहीही मिळवायचं नव्हतं. ते तृप्त होते. आपल्या आयुष्यात त्यांनी रग्गड भलाई कमावली होती. त्यांच्या अकलंकित चारित्र्यामुळे हौशी गृहस्थ आपल्या लेकीसुनांना दाते काम करीत असलेल्या नाटचसंस्थांमध्ये काम करायला निःशंक मनाने पाठवीत असत. हा विश्वास ही जर त्यांच्यातल्या संतत्वाची पावती मानली, तर आकडयांच्या मौजा करून पैसे मिळवून देणारे रमी वगैरे छंद दात्यांनी केले, ही त्यांच्यातल्या मनुष्यत्वाचीच झलक मनावी लागेल. नव्हे, ते ओतप्रत माणूसकीनेच भरलेले होते. म्हणून तर आपली धाकटी सून सौ. मुग्धा हिला लहान वयात आपली सेवाचाकरी करावी लागते ह्याची त्यांना खंत वाटे. पण इलाजच नव्हता. त्यांचा धाकटा मुलगा विजय एके दिवशी पुण्याला नाटकाच्या खेळासाठी निघत होता. त्याला म्हणाले, 'जा नि लवकर परत ये.' तो परतला दात्यांचं अंग थोडसं तापलं. ते निपचीत पडून राहिले. औषधपाणी सुरूच होतं. दुपारी ते कपभर चहा प्यायले. मोठ्या सूनबाई सौ. निर्मला कामावरून संध्याकाळी परतल्या. दात्यांची चर्या बघून त्या चरकल्या. म्हणाल्या, 'तुम्हाला बरं वाटत नाही का? दम्याच्या औषधाची पूड देऊ?' दात्यांनी माननेच होकार दिला, तिन्ही सांजा झाल्या. मग पुडी घेतली नि शांतपणे छातीवर हात आडवा धरला. हाच त्या शुचिर्भूत नटवर्याचा जगाच्या रंगमंचावरला अखेरचा निःशब्द अभिनय. इथे मराठी रंगभूमीवरलंच केवळ नव्हे, तर मराठी जीवनातलं एक भव्य भीष्मपर्व डोळ्यांचं पातं लवतं न लवतं तोंवर समाप्त झालं.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) । 50 Paise । Regd. No. M-H 649

# सिझोफ्रेनिया

दुभंगलेले व्यक्तिमत्त्व

भारताचे व्यक्तिमत्त्व दुभंगलेले आहे काय ?

गतकालाकडे पाठ फिरविता येत नाही

आधुनिकता अटळ आहे.

असे अनेक परस्परविरोधी ताण
भारताला आज सहन करावे लागत आहेत.

यामुळे तर आजची कृतिशून्यता,
निष्क्रिय तटस्थता उद्‌भवली नसेल ?

एक शोध : माणूस दिवाळी अंक

मुंबईतील काही नामवंत पंडितांचा
एक परिसंवाद-

## भारताला सिझोफ्रेनिया झाला आहे काय ?